१०४ वी जयंती






पद्मविभूषण

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१६



नंदन निलेकणी

यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६

## श्री. प्रतापशेठ साळुंखे यांना प्रदान

### क्षणचित्रे












# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच. /बी. ओ. एम. - ५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९६, २२८५२०८१, २२०४५६० फॅक्स : २२८५२०८१/८२


## विश्वस्त मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १०. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ११. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धों. महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार
सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव अप्पासाहेब पाटील
१७. मा. श्री. राजेश टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील
२०. मा. श्री. चंद्रशेखर मारुतराव घुले-पाटील
२१. मा. अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. अजित निंबाळकर | विश्वस्त सदस्य |
| ७. | मा. श्री. जीवनराव गोरे | सदस्य |
| ८. | मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील | सदस्य |

## विभागीय केंद्र

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब ऊर्फ शामराव पां. पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, कोकण, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | |
| विभागीय केंद्र, अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख-पाटील |
| विभागीय केंद्र, सोलापूर | अध्यक्ष | श्री. गो. मा. पवार |
| विभागीय केंद्र, अंबाजोगाई | अध्यक्ष | डॉ. द्वारकानाथ लोहिया |
| विभागीय केंद्र, ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |

## विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | सहसंयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |

## मध्यवर्ती कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण सभागृहे व कलादालन रंगस्वर | सरव्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम व्यवस्थापक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | वित्त व लेखा व्यवस्थापक | श्री. महेश चव्हाण |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | आस्थापना व्यवस्थापक | श्री. संजय बनसोडे |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | ग्रंथालय संसाधन व ज्ञान व्यवस्थापक | श्री. अनिल पाझारे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परीक्षक | | मे. सी. व्ही. के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशेब तपासनीस | | चार्टर्ड अकाउंटंट |

# संपादकीय

आज हा अंक आपल्या हाती देत असताना देशातील पाच राज्यांच्या (उत्तर प्रदेश, पंजाब, मणिपूर, गोवा, उत्तरांचल) निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यांचा उल्लेख यासाठी केला, की गेली अडीच वर्षे देशात आणि महाराष्ट्रात सातत्याने कुठे ना कुठे निवडणुका सुरू होत्या. खरं तर, निवडणुकांच्या निमित्ताने समाजासमोरील विविध प्रश्नांची अनेक अंगांनी चर्चा होणं आणि समाजाचे त्यानिमित्ताने राजकीय प्रबोधन होणं अपेक्षित असतं. परंतु, या सर्व कालावधीत ज्या पातळीवर आणि ज्या भाषेत राजकीय पक्षांकडून प्रचारमोहिमा झाल्या, त्यातून एकप्रकारे भ्रमनिरास झाला, असंच म्हणावं लागेल. त्याबाबतदेखील समाजातील जाणत्या मंडळींनी चर्चा करणं गरजेचं आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी जे प्रकार करण्यात आले, ज्या रीतीने पक्षांतरं घडली, पक्षभेदांच्या पलीकडे जाऊन संवाद घडणे आवश्यक आहे. वाढत्या वयोमानानुसार भारतीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी ही प्रक्रिया समाजाच्या विविध स्तरांवर झाली पाहिजे. असो.

मागील चार महिन्यांच्या काळात प्रतिष्ठानच्या मध्यवर्ती आणि बारापैकी अकरा विभागीय केंद्रांवर अनेक प्रकारचे उपक्रम सातत्याने सुरु होते. मागील अंकात नमूद केलेला 'सुवर्णगाथा' उपक्रमाचे महाराष्ट्रात विद्यार्थी वर्गात जोरदार स्वागत झाले. शालेय निबंध स्पर्धांत विद्यार्थ्यांनी १ लाख ८ हजारांपेक्षा जास्त निबंध लिहिले, तर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांत साडेसहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बारामतीत झालेल्या अंतिम स्पर्धेत राज्यभरातून शेकडो स्पर्धक उपस्थित राहिले. गदिमा सभागृहात एका दिमाखदार सोहळ्यात पारितोषिक वितरण सोहळा झाला.

याच सोहळ्यात दरवर्षी दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कारांचेही वितरण करण्यात आले. या अंकात दोन्ही स्पर्धांमधील पुरस्कार विजेत्यांची नांवं आणि माहिती दिली आहे.

यावर्षीचा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय युवा पुरस्कार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ मा. श्री. नंदन निलेकणी यांना प्रदान करण्यात येत आहे. देशातील आधार कार्डचे प्रणेते म्हणून त्यांना आपण ओळखतोच. त्यांच्या कार्याविषयी अधिक माहिती आपल्याला त्यांच्या सन्मानपत्रात वाचायला मिळेल. निवड समितीने निवड किती योग्य केली आहे, याची प्रचिती आपल्याला त्यातून येईल.

याशिवाय इतर अनेक केंद्रांवर शेती कट्टा, शिक्षण कट्टा, चित्रपट चावडी व लोकसंवादाच्या स्वरूपाचे अनेक कार्यक्रम नियमितपणे सुरू आहेत. हा अंक छापत असताना बीड येथे बाल साहित्य संमेलन सुरू होतं. महावीर जोंधळे त्याचे अध्यक्ष आहेत. तर पुढील महिन्यात १५ आणि १६ एप्रिल २०१७ रोजी औरंगाबाद येथे शिक्षण विकास मंचाच्या वतीने राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन होत आहे.

'विज्ञानगंगा' मालिकेत ऑक्टोबर २०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधीत ४ व्याख्यानं आयोजित करण्यात आली होती. त्यांचे विषय 'पाचवी शक्ती' (The fifth force), 'कृष्णविवर'; 'आशिया खंडातील मानव मुळात आफ्रीकन होता का?' 'हल्लीच्या फुलांना वास का येत नाही?' असे होते. फेब्रुवारी महिन्यात डॉ. जयंत नारळीकर 'Lighter side of Gravity' या विषयावर बोलले. ही सर्व व्याख्याने ग्रंथबद्ध करावीत, असाही विचार आहे.

समकालीन घडणाऱ्या गोष्टींबरोबरच भविष्याचाही वेध घेण्याचं काम समाजात प्रतिष्ठानसारख्या संस्थांनी केलं पाहिजे. हा उपक्रम म्हणजे त्याचाच एक भाग आहे.

प्रतिष्ठानचे विश्वस्त, कवीवर्य पद्मश्री ना.धों. महानोर यांची वयाची पंचाहत्तरी पूर्ण झाली. त्याबद्दल त्यांना खूप शुभेच्छा; उत्तम आयुरारोग्य लाभो, हीच सदिच्छा.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदरणीय पवार साहेबांना भारत सरकारच्यावतीने दिला जाणारा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान 'पद्मविभूषण' जाहीर झाला आहे. त्यांच्या कार्य-कर्तृत्वाला विनम्रतापूर्वक सलाम. प्रतिष्ठान परिवाराला या गोष्टीचा सार्थ-अभिमान आहे.



**(सुप्रिया सुळे)**
मानद संपादक

# वार्तापत्र

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

वर्ष : २१ वे / अंक ३९ वा / प्रकाशन : १२ मार्च, २०१७

सल्लागार

**मा. शरद काळे**

**मा. हेमंत टकले**

मानद संपादक

**सुप्रिया सुळे**

कार्यकारी संपादक

**दत्ता बाळसराफ**

सहसंपादक

**सुरेश पाटील**

**अनिल पाझारे**

विशेष सहाय्य

**पद्मभूषण देशपांडे**

सहाय्य

**मीनल सावंत**

**रमेश मोरे**

**मनिषा खिल्लारे**

**प्रज्ञा सागडे**

**महेश साळवी**

**केंद्रातील सहकारी :**

विद्याधर खंडे, संगीता गवारे, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रुपवते, निवृत्ती भोर, संजना पवार, शैलेश चव्हाण, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बाभल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., कांदिवली (प) येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्र. ७१५८७/९९


## अनुक्रमणिका


- माननीय यशवंतराव चव्हाण लेख - My Student Friends ... ६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पारितोषिक - २०१६ मानपत्र ......१०
- शरदचंद्र पवार यांचे कृषीकर्तृत्व आणि पद्मविभूषण ............१२

### मध्यवर्ती कार्यालय व विविध विभाग

- नवमहाराष्ट्र युवा अभियान.....................................१५
- अपंग हक्क विकास मंच .......................................२३
- शिक्षण विकास मंच ..........................................२५
- सृजन ........................................................२७
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान...........................२८
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ..........................३१
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ.....................................३७
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय............................३९
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ..................................४२

### विभागीय केंद्र, कार्यवृत्त

- विभागीय केंद्र, कऱ्हाड ........................................४४
- कृषी व सहकार व्यासपीठ आणि विभागीय केंद्र, पुणे ..........४५
- विभागीय केंद्र, नागपूर.........................................५१
- विभागीय केंद्र, कोकण, रत्नागिरी.............................५५
- विभागीय केंद्र, औरंगाबाद....................................६१
- विभागीय केंद्र, लातूर..........................................६४
- विभागीय केंद्र, अहमदनगर ...................................६८
- विभागीय केंद्र, सोलापूर .......................................७१
- विभागीय केंद्र, अंबाजोगाई ....................................७२
- विभागीय केंद्र, ठाणे...........................................७३
- विभागीय केंद्र, नाशिक ........................................७४
- देवराष्ट्रे अहवाल ...............................................८५
- यशवंतराव चव्हाण राज्य पारितोषिक पुरस्कार प्राप्त मान्यवर ...८६
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मान्यवर .............८७
- सुवर्णगाथा ५०, कायदेमंडळातील ५० वर्षे.....................८८
- सुवर्णगाथा ५० आयोजित राज्यस्तरीय महाअंतिम फेरी पारितोषिक.......................................९०
- प्रतिष्ठानची प्रकाशने ..........................................९४

# My Student Friends...

- Y. B. Chavan

I am grateful to the Chairman of the Governing Body and the Director of the Institute for inviting me to address you at such a momentous event in your life. Let me, however, explain that I do not intend to deliver a sermon. I would prefer to share my thoughts with you on a subject with which you are intimately concerned viz. Role of intellectuals in the social and economic transformation of the country. I have deliberately said that this would be a sharing of thoughts because I know youth does not like advice. Besides, I thnik that having had the privilege of education of a high order, you have gained competence of rationally analyse things on your own.

Our struggle against a tradition bound society with ideas of privileges and discrimination embedded in it, dates back to the closing years of the last century. But in terms of conscious public policies and programmes the struggle started with the attainment of independence. Our acceptance of a democratic government, with universal adult franchise was the first major step to redesign and strengthen the fabric of our society on the principle of equality of all human beings. Democracy did not come in this country as an accident history. It was a conscious choice by our people and the leaders, because only a democratic government can be responsive to the wishes of the people. Such a Government alone can translate these wishes into its policies and actions and give the people a sense of involvement and of fulfilment.

When I talk to you about your role in hastening the social and economic transformation of one country I have in mind three spheres where your contribution will be invaluable. The first is in enriching the democracy of the country, the second in breaking down the social barriers and universalising rational thought and lastly in accelerating the economic development of the country.

Lest I be misunderstood, let me explain that when I talk of your role in democracy, I do not, even indirectly want to suggest that all is unwell with its functioning. Democracy in our country has functioned well during the past twenty years. It has flowered into a full blossom with the Fourth General Elections. They have proved to be an eye-opener to those who had doubts about the success of democracy in India. But at the same time there is always scope for enriching its working and strengthening the roots that it has taken in this country. That is a responsibility which must devolve on the intellectuals.

Democracy essentially involves a dialogue between different opinions and ideologies to arrive at a consensus at a national level. It is, therefore, logical that to be truly national the dialogue must be participated in by most of the people, if not all. While a marked degree of awakening is manifest in the country, the masses do not seem to have been really drawn into the vortex on national debates on policies and programmes. Even the remotest possibility that these do not constitute the considerations in the exercise

of people's franchise is repugnant to the idea of a true democracy. It is our duty to see that the people are educated and enlightened and helped to arrive at conclusions which would be their own. We will have to fight the tendencies which are vestiges of a tradition bound society.

Another sphere in which you, with your education, outlook and ability, have a great part to play is the sphere of social transformation. We inherited a tradition bound society. It had many evil features which denied equal opportunities to all. It has ideas of discrimination and hereditary privileges. Our task is to transform this society into a modern and progressive one which is more egalitarian in concept and practice. We have to create a society where traditions and conventions would have no relevance unless tested on the touch stone of rational and scientific thought.

In the initial period there is bound to be a reaction to such a radical change and determined resistance from vested interests. This is true of all changes. Probably, the reaction and the resistance will be stronger in a country like ours where for centuries education was considered a privilege. The spread of education during the last twenty years has certainly helped in infusing strong progressive thoughts in the country. But a lot more remains to be done because we still find traditions reigning supreme where the forces of change have not pentrated. It is for us who have had the benefit of formal education to wage the last battle against ignorance. I am not talking in terms of mere formal education. The task goes much beyond that, because it encompasses social, political and economic enlightenment. It is the responsibility of articulate intellectuals to go to the people and draw them in an increasing measure into the national debates. Then alone can we claim to have achieved democracy in its purest and ideal form.

Another major task that faces us is the urgent need for accelerating the pace of economic development and of ensuring economic justice. You as the technocrats of tomorrow have a major responsibility for making the wheels of progress roll faster. During the last twenty years considerable thought and effort has gone into laying a sound foundation for industrial progress. But there are certain fields where we have not been able to achieve satisfactory results.

One such problem is that of our continued dependence on foreign countries for technical jobs like project construction as also for different types of machinery and spare parts. Imports, like these constitute a major charge on our hard earned foreign exchange. Besides, in the case of import of technology, most of the contracts accepted by foreign firms are on ' turn-key' basis. Very often these projects are replicas of the ones in the more advanced countries. They are not necessarily ideally suited to the Indian conditions. The urgent necessity in this regard is the development of an indiegenous technology which, while drawing upon the abundant advance made abroad, is capable of innovation and adaptation. Japan's is possibly the best example of what such an indigenous technology can achieve. We have to draw appropriate lessons from their experience. There would have to be a rapid growth of Consultancy and Construction Services in all branches of technology if the shortage·of foreign exchange is not to be allowed to impede the rate of our development.

Another sphere where there is need for emergent action relates to import substitution of machinery and spare parts. A considerable portion of what is now being imported could be fabricated within the country. Even for quality spare parts the tendency seems to be go in for imports. You as the upcoming technocrats have to take up this challenge of designing and producing substitutes for machinery items which are imported today. I need hardly mention the special care needed to maintain the quality of these machines and spares. A certain degree of aprehension about indigenous machines and parts is bound to be there because no one wants to accept the untried. Overcoming this attitude will in itself be a difficult task. But if the quality of the manufactures is also unsatisfactory, the task of promoting import substitution would be rendered extremely difficult.

There are some of the challenges that will have to be tackled before we succeed in ushering in the era of a technological revolution in the country. These challenges, no doubt, demand a complete change in your outlook. Uptil now our intellectuals, including the technocrats have been hankering after white-collar jobs. This attitude will have to be abandoned. What is needed today is a greater aptitude for research, which is more of applied nature than of academic one. It also calls for more of initiative and enterprise for breaking new paths in new directions.

I do not think that this is the right forum for me to talk in detail about the social and political situation obtaining in the country. But at the same time I should not forget that as responsible citizens you have to make a valuble contribution in shaping the affairs of the country. I am sure you all are keenly aware and equally disturbed about the strains arising out of a growing tendency to refuse to appreciate or understand those who differ. I would like to make a special mention of one such unfortunate manifestation of both intolerance and narrow loyalties and that is the growing lack of communal and religious harmony. We have given ourselves a Secular Constitution. Secularism aims at treating religion as an essentially personal affair of the citizen and at ensuring that public policies or the policies of the Government are not based on the dictates of the temporal authorities. This naturally does not suit those who would like the Government's policies to be based on religious dictates rather than on rational thought. There has of late been a spate of communal disturbances. On the majority communities devolves a special responsibility to see that the minority communities do not have to live in a state of instability or fear. All of us, irrspective or our religions, castes of creeds are Indians and Indians alone. Let not our private and personal ideals and ideologies disturb the fabric of the society.

As intellectuals of the country the central task that faces us is the creation and sustenance of an atmosphere where national considerations remain the uppermost in the minds of the people. This challenge will have to be taken up by all of us and concerted efforts will have to be made in the fields of education, politics, administration etc. Then alone would we succeed in building up a society, which in all its facets would be truely Indian. Then alone can we expect to be self-reliant to move forward, socially and economically.

I have tried to put across some of my ideas on what you can do in future to accelerate

the social and economic advancement of the country. I would admit the fruition of my efforts only when my ideas get an echo in your young hearts and when that response gets translated into actions.

This is a momentous hour in your lives. For many of you this may mark the end of your educational career and the beginning of a new era. On the threshold of this new life you may be feeling uncertain and apprehensive. I can understand and appreciate your feelings, particularly because I arrl awar of the difficult employment situation that has been brought about by a slackening of the tempo of development in the country. The Government is also alive to this situation. Several measures have been taken to step up employment opportunities for our engineering graduates. But I would like to make a special mention of the various facilities offered by different State Governments to engineers for setting up small-scale industries. I would like you to view the problem more as a challenge to your ability, initiative and enterprise which must be accepted and met.

Today's is a world of fierce competition. The days when education was the domain of the privileged few are no more. As the benefits of education become available to more and more people, the competition will grow and a greater degree of application, aptitude and specialisatioon will be called for. It, in fact, is an index of the country's progress, a phenomenon which is the mark of modern times. I am sure you all understand and appreciate the demands of a changing society and would be successful in meeting the challenge.

I would conclude by saying, have faith in yourself, have faith in the destiny of the nation, go unhesitatingly into the outer world, and work devotedly and in union, and you will succeed. In your success lies the future of this country.

**संदर्भ : माझ्या विद्यार्थी मित्रांनो...**
स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची दिक्षांत समारंभातील भाषणे, रोहन प्रकाशन

**संकलन :** मोहनराव डकरे.

**संपादक :** प्राध्यापक का. धों. देशपांडे.

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD, 2016

## FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR, SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA

## CITATION

Shri. Nandan Nilekani was born on 2nd June 1955 at Bangalore, Karnataka. His father worked as a General Manager at Mysore and Minerva Mills and subscribed to Fabian Socialist ideals that influenced Nilekani in his early years. Nilekani studied at the Bishop Cotton Boys' School and St. Joseph High School, Dharwad; Karnataka PU College, Dharwad; and received bachelor's degree in electrical engineering from the Indian Institute of Technology, Bombay.

He started his career at the Mumbai-based Patni Computer Systems, where he was interviewed by N.R. Narayana Murthy. In 1981, Nilekani, Murthy and five others left Patni Computer Systems to start their own company - Infosys. In his book, 'Imagining India' he has described himself as an accidental entrepreneur. When he joined in setting up Infosys, he had no dearth of friends and relatives trying to dissuade him from joining such a 'foolhardy venture'. None of them could have imagined that the Company will grow into a global brand in information technology. Nilekani became the Chief Executive Officer of Infosys in March 2002 and served in that capacity till April 2007. Before becoming the CEO, he had held various positions, including Managing Director, President and Chief Operating Officer. During his five-year tenure as CEO, the revenue of Infosys grew six-fold to $3 bn.

Nilekani left Infosys in July 2009 to serve as Chairman of the Unique Identification Authority of India, a Cabinet rank position. As Head of the UIDAI, he was responsible for implementing the Unique Identity Card Project for the nation.

The UIDAI has developed a card known as 'Aadhaar' card which gives to each Indian citizen a unique 12-digit identification number, along with recording the individual's biometrics such as iris scan and fingerprints on UIDAI database. A national identification number is used by governments of many countries as a means of tracking their citizens, permanent residents and temporary residents for the purpose of work, taxation, government benefits, healthcare, etc. For instance, the Social Security Number serves the purpose of National Identity Number in the United States of America. 'Aadhaar' card has been developed as a document that provides a proof of identity and address anywhere in India.

The Unique Identification Project was launched by the Planning Commission. In the initial phase, it was visualized as Unique Identity for below poverty line families. At the same time the National Population Register was being rolled out by the Registrar General of India. Subsequently, the National Population Register and the Unique Identification Number Project were amalgamated. Main feature of the UIDAI is that it enables focusing on the poorer and economically backward communities. The purpose is to develop a system which will ensure that benefits of government schemes reach the target population and any leakages to ineligible persons are prevented. The UIDAI has ensured that there will

be no duplication of data in the database. In the interest of transparency, all data will be available to the public except the personal identity information of a resident. It has employed the latest technology to ensure that the data in this database is safe and secure. Apprehensions have been expressed about the UIDAI getting metamorphosed into Orwellian 'Big Brother' and becoming a tool for surveillance and undue invasion of privacy. However, the UIDAI authorities have dispelled these apprehensions by pointing out that the 'Aadhaar' transactions data is highly encrypted and will be protected under Indian law; further it will not be made available to the security agencies, except in case of suspected national security threat, and that too with approval of a high level oversight committee. In a country like India, which has a large population exceeding 132 crores and bewildering diversity of languages and group identities, 'Aadhaar' stands out as a single identity for all citizens of India, irrespective of caste, creed, language, location or religion. It is truly national in scope, like the Constitution, the Flag and the Anthem. It is a single key to Indian diversity.

In his riveting book 'Imagining India: Ideas for the New Century', Nandan Nilekani had advocated an IT-enabled, accessible national ID system, which would revolutionise the current arrangements for distribution of State benefits and welfare payments and put an end to the prevalent porous distribution mechanism. He visualized IT as less of a tool than a strategy for public policy reforms. At the same time, he emphasized criticality of database design, the governance structure and the process re-engineering needed to build scalable, replicable and seamless user-friendly system. It is a rare case of poetic justice where the person who conceptualized the system was entrusted with the responsibility of setting it up.

As Head of the UIDAI, Nandan Nilekani has the distinction of having provided a single identity to over 100 crore persons by now. It is expected to play a major role in ensuring financial inclusion of persons below the poverty line and persons living in distant, inaccessible areas.

Nandan Nilekani holds high offices in several important institutions. He is a member of the Board of Governors of the Indian Council for Research on International Economic Relations and President of the National Council of Applied Economic Research. His expertise is sought by global institutions like Global World Economic Foundation where he is a Member of the Advisory Board. He is Chairman of EkStep, a non-profit literacy and numeracy platform.

Awards and distinctions conferred on him make a long list. To mention a few, he was awarded honorary Doctor of Law degree by Rotman School of Management at the University of Toronto in 2011. He has received the Joseph Schumpeter Prize for innovative services in economy, economic sciences and politics in 2005. In 2009, he was presented the 'Legend in Leadership Award' by the Yale University – the first Indian to receive such an honour. He was conferred the Padma Bhushan in 2006.

The Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai feels privileged in conferring the Yashwantrao Chavan National Award, 2016 on Mr. Nandan Nilekani for his outstanding contribution to economic development in India.

| | | |
|---|---|---|
| Mumbai | Dr. Anil Kakodkar | Sharad Pawar |
| 12th March 2017 | Chairman | President |
| | Panel of Jury | Yashwantrao Chavan Pratishthan |

# शरदचंद्र पवार यांचे कृषीकर्तृत्व आणि पद्मविभूषण

– **सुनील तांबे** (ज्येष्ठ पत्रकार)

शरद पवार यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाल्यानंतर मराठी प्रसारमाध्यमांमध्ये जी चर्चा सुरू झाली, त्याअनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक काही आकडेवारी आणि माहिती सगळ्यांच्या माहितीसाठी मांडणं आवश्यक आहे, असं मला वाटतं.

रॉयटर्समध्ये नोकरीला लागेपर्यंत सुमारे २० वर्षं मी महाराष्ट्राच्या राजकारणाचं वृत्तांकन करत होतो. २००६ साली मी रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेत वार्ताहर म्हणून नोकरीला लागलो. शेतमालाची बाजारपेठ आणि मुख्यतः वायदेबाजार या विषयाच्या बातम्या देण्याचं काम माझ्याकडे होते. काही महिन्यातच राजेंद्र जाधव माझं काम करू लागला. शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या माहिती सेवेच्या संपादनाची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. २०१४ साली मी 'रॉयटर्स मार्केट लाइट' या कंपनीचा राजीनामा दिला.

शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री होते, त्या काळात मी आणि राजेंद्र जाधव दोघेही वायदेबाजार आणि शेतमालाच्या बाजारपेठांचं वृत्तांकन करत होतो. या काळात आम्ही शरद पवारांना एकदा वा दोनदाच भेटलो असू, तेही काही मिनिटांसाठी. व्यापारी, वायदेबाजारातील गुंतवणुकदार, आयात-निर्यातदार, शेती उत्पन्नाची आकडेवारी देणारे विविध राज्यांतले सरकारी अधिकारी, प्रेस इन्फर्मेशन ब्यूरोची प्रसिद्धी पत्रकं, विविध वेबसाईटस्, शेतकरी आणि पवारांच्या पत्रकार परिषदा हे आमच्या बातमीदारीचे स्रोत होते. त्या काळात आम्ही जमवलेली आकडेवारी आणि डेटा असं सांगतो की, संयुक्त पुरोगामी आघाडीच्या एका दशकाच्या काळात शेती आणि शेतकरी या आघाडीवर भारताने नेत्रदीपक प्रगती केली.

देशाच्या शेतीची सूत्रं शरद पवार यांनी २००४ साली कृषी भवनामध्ये हाती घेतली; नेमका त्याचवर्षी दुष्काळ पडला. नंतरच्या वर्षात आपल्याला गव्हाची आयात करावी लागली. अमेरिकेच्या वायदेबाजारात गव्हाच्या किंमती वधारल्या. त्यावेळी भाजप खासदारांनी गव्हाच्या आयातीत म्हणजे सरकारी खरेदीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले होते. एका उत्साही अभ्यासकाने त्यासंबंधात एक पुस्तिकाही प्रसिद्ध केली होती.

गव्हाच्या उत्पादनात वाढ करायची वा अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण व्हायचं तर अन्नधान्याच्या आधारभूत किंमतीत घसघशीत वाढ करायला हवी, हा धोरणात्मक निर्णय शरद पवार यांनी घेतला. त्यासाठी त्यांनी वित्त मंत्रालयाशी सातत्याने संवाद ठेवला होता. ते पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याही सतत संपर्कात होते. हमी भावात दरवर्षी वाढ करून घेण्यात श्री. पवार यांना त्यामुळे यश मिळालं. २०१४ पर्यंत, म्हणजे एका दशकात गहू, तांदूळ, कापूस, सोयाबीन या सर्व पिकांच्या हमीभावात दुपटीपेक्षा अधिक वाढ करण्यात आली.

| पिक | श्री. पवार पदावर येण्यापूर्वीची किंमत (२००३/०४) | श्री. पवार पायउतार होताना किंमत (२०१३/१४) | फरक टक्के |
|---|---|---|---|
| तांदूळ | ५५० | १३१० | १३८ % |
| गहू | ६३० | १४०० | १२२ % |
| सोयाबीन | ८४० | २५०० | १९८ % |
| कापूस | १७२५ | ३७०० | ११४ % |
| ऊस | ७३० | २१०० | १८८ % |
| हरभरा | १४०० | ३१०० | १२१ % |
| मका | ५०५ | १३१० | १५९ % |
| तूर | १३६० | ४३०० | २१६% |

(Source: Agriculture Ministry, India)

अन्नधान्याच्या हमीभावात वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळालं. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. शरद पवारांनी कृषिभवनाचा निरोप घेईपर्यंत भारत हा जगामध्ये तांदळाचा प्रथम क्रमांकाचा निर्यातदार देश बनला होता. गव्हामध्ये दुसऱ्या क्रमांकाचा निर्यातदार झाला होता.

केवळ आधारभूत किंमत वाढवून, उत्पादन वाढवून भागणार नाही. वाढलेल्या उत्पादनाची निर्यातही झाली पाहिजे, अन्यथा, स्थानिक बाजारपेठेत दर पडतात; हे ओळखून श्री. पवार यांनी वेळोवेळी निर्यातीला पूरक अशी धोरणं राबवली. त्यामुळे २००३/०४ ते २०१३/१४ या दहा वर्षात शेती व संलग्न उत्पादनांची निर्यात ७.५ अब्ज डॉलरवरून ४२.८४ अब्ज डॉलरवर गेली. **(source:** Agricultural and Processed Food Products Export Development Authority) थोडक्यात, पवार पायउतार होताना परदेशात होणाऱ्या शेतमालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांना जवळपास तीन लाख कोटी रुपये मिळत होते. कापसाची निर्यात या दहा वर्षात १२ लाख ११ हजार गाठीवरून ११७ लाख गाठीवर गेली. त्यासाठी बऱ्याचदा पवारांना वस्त्रोउद्योग मंत्र्यांशी संघर्ष करावा लागला.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे खासगी सावकारी व कर्जबाजारीपणा ही मुख्य कारणं आहेत. तसं वेगवेगळ्या अहवालांनी अधोरेखितही केलं आहे. पवारांनी ज्या शेतकऱ्यांचे कर्ज थकलं आहे, अशांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ६० हजार कोटी रूपयांचं कर्ज माफ करून घेतलं. यामुळे कर्ज थकवलेल्या शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज घेणे शक्य झालं. ते एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी पीक कर्जाचा व्याजदर १६ टक्क्यांवरून ६ टक्क्यांवर आणला. बँकांवर कर्जवाटपासाठी दडपण आणलं. त्यामुळे शेतीसाठी दिलं जाणारं कर्ज ८६ हजार ९८१ कोटी रुपयावरून दहा वर्षात ७ लाख कोटी रूपयांवर गेलं. (Government of India budget document)

या सरकारी आकडेवारीवर विश्वास न ठेवणाऱ्यांसाठी आम्ही खाजगी कंपन्यांकडूनही आकडेवारी गोळा केली.

ट्रॅक्टर शेतकरीच विकत घेतात. २००३/०४ मध्ये ट्रॅक्टरचा वार्षिक खप होता १७१,६५७. तो २०१३/१४ वाढून झाला ६३४,१५१. म्हणजेच दहा वर्षात वार्षिक वाढीचा दर (Calculate Compound Annual Growth (CGR)) होता १४ टक्के. मात्र मागील दोन वर्षात पुन्हा खप ढेपाळला. २०१४/१५ व २०१५/१६ मध्ये खपात अनुक्रमे १३ टक्के व ११ टक्के घट झाली. मागील वर्षी खप होता ४९३,७६४. (source: Tractor Manufactures Association)

ग्रामीण भागात मुख्यत: मोटारसायकली वापरल्या जातात. (स्कूटीचा खप कमी आहे. कारण, मोटरसायकल हे मालवाहू वाहन म्हणूनही अनेकदा उपयोगाला येतं. उदा. दूधाच्या चरव्या). २००३/०४ मध्ये मोटारसारकलींचा खप होता, ४१ लाख ७० हजार ४४५, २०१३/१४ मध्ये हाच खप १ कोटी ४ लाख ७९ हजार ८१७ झाला होता (source: Society of Indian Automobile Manufacturers). ग्रामीण भागातून वाढलेल्या मागणीमुळे दुचाकींची विक्रमी विक्री झाली, अशी कारणमीमांसा त्यावेळी बजाज, हिरो होंडा या मोटरसायकल कंपन्यानी केली होती.

गहू, तांदूळ यांच्या उत्पादनवाढीप्रमाणेच भाज्या आणि फळांचं उत्पादनही शरद पवार केंद्रीय कृषीमंत्री असताना वाढलं. फळांचं उत्पादन ४५.२ दशलक्ष टनांवरून ८९ दशलक्ष टनांपर्यंत गेलं. पालेभाज्यांचं उत्पादन ८८.३ दशलक्ष टनांवरून १६२.९ दशलक्ष टनांपर्यंत वाढलं. दूध, मासे, मांस, चहा, कॉफी, मसाले इत्यादी विषयांबाबतची माहिती विस्तारभयास्तव बाजूला ठेवतो. ती इथे देत नाही. पण, तीही आकडेवारी अशीच आहे.

निव्वळ सरकारी आकडेवारीचा अभ्यास केला, तरीही कोणत्याही सरकारच्या एका दशकात शेती आणि शेतकऱ्यांची एवढी प्रगती झाल्याचं आढळत नाही. व्यापार धोरण, वित्त मंत्रालय, नोकरशाही, सार्वजनिक क्षेत्रातील बँका यांच्या सहयोगातूनच ही प्रगती शक्य आहे. त्यासाठी शेती धोरण, शेती मंत्रालय, शेतीतील प्रश्न, त्यांची सोडवणूक यासंबंधात व्हीजन वा दूरदृष्टी असणारं नेतृत्व गरजेचं असतं. त्या नेतृत्वाकडे विविध मंत्रालयांकडून आणि नोकरशाहीकडून सहकार्य मिळवण्याचं संघटनकौशल्यही गरजेचं असतं. योग्य पदावर, योग्य माणसाची नेमणूक करून धोरण आणि कार्यक्रमाचे अपेक्षित निकाल मिळवण्याचं चातुर्यही आवश्यक असतं.

शेती आणि शेतकरी यांच्यापुढचे प्रश्न सुटलेले नाहीत. सरकारी आणि निमसरकारी नोकऱ्या वगळता, बाजारपेठेशी संबंधित कोणत्याही घटकाचे प्रश्न कधीही सुटत नसतात. नवीन प्रश्न निर्माण होत असतात, गुंतागुंत वाढत असते. काही जुने आणि जटील प्रश्न अधिक गंभीर होतात. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न. केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी केलेल्या कामाचा लेखाजोखा निवडक आकडेवारीने मांडण्याचा मर्यादित प्रयत्न हे या लेखाचं स्वरूप आहे. कृषी क्षेत्रातील कामगिरीसाठी शरद पवार यांना 'पद्मविभूषण' देण्यावरून मराठी वर्तमानपत्रांचे संपादक वा ज्येष्ठ पत्रकार आणि सोशल मिडियावरचे मतवाले यांनी जे तारे तोडले, त्यामुळे ही माहीती सादर करण्याशिवाय पर्याय नाही, असं वाटतं.

# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियान चे काम संयोजक दत्ता बाळसराफ, संघटक निलेश राऊत पाहतात. विजय कान्हेकर आणि वैशाली मोटे या समन्वयक आहेत, तर कार्यालयीन संघटक म्हणून सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, रमेश मोरे, मनीषा खिल्लारे, महेश साळवी हे काम पाहतात.

### यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा

**शनिवार, दि. १४ जानेवारी २०१७**

नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक क्रीडा पुरस्कार २०१६ च्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या युवक-युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. सदरील पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. १४ जानेवारी २०१७ रोजी, विद्या प्रतिष्ठान, बारामती, जि. पुणे येथे संपन्न झाला. पुरस्कार वितरण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे अध्यक्ष मा. खा. शरदचद्रंजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी खजिनदार मा. आ. हेमंत टकले, मा. आ. सुनील तटकरे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक व प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा मा. खा. सुप्रिया सुळे, विद्या प्रतिष्ठाच्या विश्वस्त सौ. सुनेत्रा पवार, कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक नीलेश राऊत, विजय कान्हेकर, बारामतीचे नगराध्यक्ष योगेश जगताप, महेश तपासे आदी उपस्थितीत होते.

२०१६ सालचा 'यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार' आंतरराष्ट्रीय धावपटू ललिता बाबर, सातारा यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे होते. या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' युवक व युवती - क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय रोईंगपटू दत्तू भोकनळ, तळेगाव रोही, ता. चांदवड, जि. नाशिक व आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू अभिलाषा म्हात्रे, मुंबई यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनिय कार्याबद्दल श्री. संतोष गर्जे, बीड (बालग्राम सहारा अनाथालय परिवार) व हेमलता तिवारी, मुंबई (स्वराधार, मुंबई) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वरूप रोख २१ हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह असे होते.

यासोबतच प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धे'च्या विजेत्यांनाही पुरस्कार देण्यात आले. त्यात कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा, जि. नाशिक यांच्या 'बांधिलकी' या नियतकालिकास प्रथम पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रु. १०,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. द्वितीय पुरस्कार नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी यांच्या 'प्रेरणा' या

नियतकालिकास देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रु. ५,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. तृतीय पुरस्कार न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या 'स्पंदन' या नियतकालिकास देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप रु. ५,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते.

उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय मानवत, जि. परभणी यांच्या 'मानवता' या नियतकालिकास, उत्तेजनार्थ द्वितीय पारितोषिक कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, उरून-इस्लामपूर, वाळवा, जि. सांगली यांच्या 'ज्योती' या नियतकालिकास, तर उत्तेजनार्थ तृतीय पारितोषिक न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या 'स्पंदन' या नियतकालिकास देण्यात आले. या उत्तेजनार्थ पुरस्काराचे स्वरूप रु. २,०००/- चा धनादेश व प्रमाणपत्र असे होते. या स्पर्धेकरीता सादर केलेल्या नियतकालिकांचे जतन यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये करुन ते विद्यार्थी व अभ्यासकांसाठी उपलब्ध केले जातात.

सर्व पुरस्कारार्थींचे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या राज्यस्तरीय कार्यकारी समितीने अभिनदंन केले.

## युवा पुरस्कार विजेत्यांचा अल्प परिचय

- **ललिता शिवाजी बाबर (धावपटू - यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार)**

वयाच्या अकराव्या वर्षापासून ललिता बाबर यांनी विविध क्रीडा स्पर्धांमधून पारितोषिके पटकावली. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी पाच हजार मीटर धावण्याच्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. या स्पर्धेतील घवघवीत यशामुळे ललिता बाबर यांना रेल्वे विभागाने नोकरीत सामावून घेतले. रेल्वे विभागात त्यांना श्री. मेल्वीन आणि श्री. भास्कर भोसले यांचे मार्गदर्शन मिळत राहिले. त्यांना आजपर्यंत विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकूण सात कांस्य, सहा रौप्य तर सुमारे तेरा सुवर्णपदके प्राप्त झाली आहेत.

चीन, दक्षिण कोरिया इत्यादी देशांमधील स्पर्धांमधून नवनवे ललिता बाबर यांच्या नावावर जागतिक विक्रम आहेत. आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स महासंघाच्या सन २०१६ साठी ३००० मीटर स्टीपलचेस या क्रीडा प्रकारात जागतिक क्रमवारीत ललिता बाबर यांनी अव्वल स्थान मिळवले. सध्या त्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी. ए.च्या तृतीय वर्षात शिकत असून मागील सहा वर्षांपासून त्यांनी बंगळुरू येथील रशियन क्रीडा प्रशिक्षक डॉ. निकोल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत.

- **दत्तू बबन भोकनळ (रोईंग पटू - यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार)**

५ एप्रिल १९९१ रोजी नाशिक जिल्हा, चांदवड तालुक्यातील तळेगाव रोही येथे एका गरीब कुटंबात दत्तू भोकनळ यांचा जन्म झाला. आई आशाबाई आणि वडिल बबन भोकनळ यांच्या आर्थिक हलाखीच्या परिस्थितीमुळे दत्तू यांना इयत्ता ८वीनंतर शिक्षण सोडावे लागले; परंतु परत तीन वर्षांनी त्यांनी १०वीची परीक्षा दिली व त्यात ते उत्तीर्ण झाले.

२०११ साली दत्तू भोकनळ यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर घरातील आर्थिक परिस्थितीचा विचार करून दत्तू भोकनळ यांनी सैन्यदलात जाण्याचा निर्णय घेतला. २०१२ साली ते सैन्यदलात भरती झाले. नौकायन या क्रीडाप्रकारासाठी त्यांना सैन्यदलात वरिष्ठांनी प्रेरित केले. अल्पावधीतच दत्तू भोकनळ यांनी राष्ट्रीय आणि

आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पारितोषिके प्राप्त केली. २०१४ साली झालेल्या एशियन गेम्समध्ये दत्तू भोकनळ पाचव्या स्थानावर होते. २०१५ च्या एशियन चॅम्पीयनशिपमध्ये त्यांनी रजत पदक प्राप्त केले. २०१६ सालच्या रियो ऑलिंपिकसाठी त्यांची निवड झाली. त्यामध्ये त्यांनी जगातील ३२ देशांमधून तेरावे स्थान पटकावले. २०१६ साली यू.एस.ए. चॅम्पियनशिप स्पर्धेत त्यांना सुवर्ण पदक मिळाले. या व्यतिरीक्त राष्ट्रीय पातळीवरील २ सुवर्णपदके भोकनळ यांच्या नावावर आहेत.

- **अभिलाषा शशिकांत म्हात्रे (कबड्डी पटू – यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार)**

अभिलाषा म्हात्रे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील पेण येथे २८ नोव्हेंबर १९८७ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव सौ. शुभांगी आणि वडिल श्री. शशिकांत म्हात्रे. एक लहान भावासह त्यांचा छोटा परिवार आहे. कबड्डी या खेळामध्ये अभिलाषा यांना शालेय जीवनापासूनच आवड होती.

शालेय जीवनात त्यांनी विविध पातळीवर स्पर्धा करत कबड्डी खेळामध्ये प्राविण्य मिळवले. २००७ साली खेळत असताना त्यांना दुखापत झाली. त्यावेळी त्यांना हेलन मेरी यांची खूप मदत झाली. दुखापतीतून बाहेर पडून त्यांनी स्वत:ला परत कबड्डीमध्ये झोकून दिले.

राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी स्पर्धक म्हणून त्यांची २००२ साली निवड करण्यात आली. त्याचा त्यांनी फायदा घेत यश संपादन केले. त्याचबरोबर आसाम, बिहार, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र अशा विविध राज्यांमध्ये झालेल्या राष्ट्रीय तथा आशियाई कबड्डी स्पर्धांमध्येही त्यांनी प्रथम, द्वितीय स्थान पटकावले.

आतापर्यंत अभिलाषा यांनी चार कांस्य पदकांसह दोन रजत आणि पाच सुवर्णपदके प्राप्त केली आहेत. त्यांना २०१५ साली अर्जुन भारत सरकारचा पुरस्कारही मिळाला. सध्या अभिलाषा नवी मुंबई महापालिकेत शिक्षण विभागात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

- **हेमलता तिवारी (यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार)**

रिक्षाचालकाच्या सामान्य कुटुंबात मुंबई येथे १९ मे १९९१ रोजी हेमलता तिवारी यांचा जन्म झाला. मुंबईच्या 'लोकल'मधून प्रवास करीत त्यांनी अर्थशास्त्र विषयात पदवी घेतली, त्याचबरोबर मराठी विषयात पदव्युत्तर पदवीसह औपचारीक समुपदेशनाचीही पदविका प्राप्त केली. २००६ साली हेमलता यांच्या वडिलांचे निधन झाले. अर्थार्जनाची निकड म्हणून त्यांनी २०१० पासून सेवाभावी संस्थेत काम सुरू केले. परंतु, काहीतरी वेगळे करून दाखविण्याची ऊर्जा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यातच त्यांना भविष्यातील कार्याचा सूर सापडला. पोटाची खळगी भरण्याकरिता लोकलमधून गाणी गात आणि विविध वाद्ये वाजवत भिक्षा मागणाऱ्या लोकांना त्यांनी एकत्रित केले. त्यात काही दृष्टीहीन, तर काही दिव्यांगांसह सर्वसामान्य बेरोजगारही होते. परंतु, कलेचे त्यांच्यामधील निसर्गदत्त देणे ओळखून त्यांना एकत्र आणून त्यांना मंच मिळवून देण्याचा प्रयत्न हेमलता यांनी सुरू केला. त्यातून त्यांनी स्वरांचाच आधार घेणाऱ्या या लोकांसाठी २०१२ साली 'स्वराधार' या ऑर्केस्ट्राची निर्मिती केली. रेल्वे आणि लोकलच्या प्रवासात जे लोक कायम उपेक्षित राहिले, अशा २०० लोकांना एकत्र करून त्यांनी एक अनोखा उपक्रम सुरू केला. याच कलावंतांपैकी १४ वर्षाच्या बालकलाकारास त्यांनी 'स्वराधार'च्या माध्यमातून 'इंडियन आयडॉल' या स्पर्धेत पाठविले. या मुलातील कलागुण आणि आवाज ऐकून संगीतकार विशाल ददलानी यांनी त्या मुलास संगीत शिक्षणाकरीता दत्तक घेणे, हे 'स्वराधार'चे व पर्यायाने हेमलता तिवारी यांचे यश आहे.

हेमलता तिवारी यांना त्यांच्या कार्याची दखल घेत विविध संस्थांच्या पुरस्कारांसह, 'एच.आर. क्लब'ने 'वूमन गेम चेंजर अॅवार्ड' तथा नामांकीत संस्थेच्या नायिका पुरस्काराने सन्मानित केले आले.

- **संतोष गर्जे (यशवंतराव चव्हाण युवा सामाजिक पुरस्कार)**

आई छबूबाई आणि वडील नारायण गर्जे यांच्यापोटी दिनांक २७ ऑगस्ट १९८५ ला संतोष गर्जे यांचा जन्म झाला. सख्ख्या बहिणीचा प्रसुतीदरम्यान झालेला मृत्यू अन् पोरक्या झालेल्या नवजात जीवाच्या अश्रूंनी त्यांना अंतर्बाह्य हेलावून सोडले. त्या दुःखाच्या अतिरेकाने त्यांच्या वडिलांनीसुद्धा गृहत्याग केला. त्यांच्या बहिणीचे अनाथ झालेले पोर त्यांनी छातीस धरले आणि अशाच अनाथांचा सांभाळ करण्याचा निश्चय केला. लहानपणापासूनच विठोबा आणि ज्ञानोबांना 'माऊली' म्हणतात याचे बाळकडू त्यांना मिळालेच होते. वडिलांची दर महिन्याची न चुकणारी पंढरीची वारी पाहातच ते लहानाचे मोठे झाले होते.

अनाथांच्या कळवळ्यातून संतोष गर्जे यांनी 'बालग्राम सहारा अनाथालय परिवार' उभारले . २००४ साली सुरू झालेल्या या अनाथालयात आज ८५ मुले-मुली आहेत. तीन वर्ष वयाच्या मुलांपासून ते १८ वर्षापर्यंतची ही सगळी मुले या परिवारात सदस्यांसारखी राहतात. 'आपलं' कोणीतरी आहे, ही भावनाच या मुलांना जगण्याची उर्मी देत आहे. सव्वा दोन ते अडीच लाख रुपये मासिक खर्चाची तजवीज करताना संतोष गर्जे यांची नेहमीच दमछाक होते. परंतु; ध्येयापासून मागे न हटता कोणत्याही शासकीय अनुदान किंवा मदतीशिवाय त्यांनी आपली वाटचाल सुरूच ठेवली आहे. ती केवळ विविध सामाजिक स्तरातून आणि दानशूर व्यक्तींच्या उदारपणामुळेच. पुरस्कार प्राप्त नावे- २०१६

**यशवंतराव चव्हाण सामाजिक युवा पुरस्कार - २०१६ (युवक व युवती)**

| अ.क्र. | नाव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १. | संतोष गर्जे | २१,०००/- |
| २. | हेमलता तिवारी | २१,०००/- |

**यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार -२०१६ (युवक व युवती)**

| अ.क्र. | नाव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १. | दत्तु भोकनळ | २१,०००/- |
| २. | अभिलाषा म्हात्रे | २१,०००/- |

**यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार - २०१६**

| अ.क्र. | नाव | पुरस्कार रक्कम (धनादेश) |
|---|---|---|
| १. | ललिता बाबर | ५१,०००/- |

**नियतकालिक पुरस्कार – २०१६ त्याकरता निवड करण्यात आलेली नियतकालिकांची यादी.**

| अ क्र. | नियतकालिकाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | शिफारस | पुरस्कार क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | बांधिलकी | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय देवळा, जि. नाशिक | हे नियतकालिक म्हणजे चित्रपट रसग्रहण विशेषांक असून ६६ विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, आणि इंग्रजी या भाषेतील चित्रपटांविषयी रसग्रहण लिहिले आहे. हे लेखन करण्यापूर्वी चित्रपट रसग्रहणाविषयी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते व लेखनाचे मुद्दे सुचविण्यात आले होते. विद्यार्थ्यांची चित्रपटांविषयी जाण वाढविण्यासाठी व स्वतःच्या शब्दात त्याची अभिव्यक्ती करण्यासाठी प्रोत्साहन देणारा असा हा अंक आहे. नव्या पिढीची कलात्मक अभिरुची घडावी यासाठी केलेला हा अतिशय अभिनंदनीय प्रयत्न आहे. | **प्रथम पुरस्कार** |
| २. | प्रेरणा | नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी | भारतीय समाजात अनेक प्रकारचे भेद व वैविध्य आहेत. जात, धर्म, प्रदेश, लिंग यावर आधारित अनेक विषमतापूर्ण व्यवहार आपल्या समाजात घडत असतात ते आपण पाहतो. तरुण पिढीला या भेदांच्या पलिकडे नेऊन त्यांना सामाजिक न्यायाची संकल्पना समजावून सांगण्याच्या दृष्टीने या अंकाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. विद्यार्थी-विद्यार्थीनींनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमधून सामाजिक न्यायाची संकल्पना आपापल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे तो खूपच प्रेरणादायी आहे | **द्वितीय पुरस्कार** |
| ३. | विद्यादीप | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय विद्यानगरी, बारामती जि. पुणे. | अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सातत्याने विविध दर्जेदार साहित्याची निर्मिती नियतकालिकाच्या माध्यमातून करीत आहे. यावर्षीचा संपूर्ण अंक हा आजी-माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा चढता आलेख घेणारा आहे. यामध्ये कला, क्रीडा , साहित्य, याबरोबरच विज्ञाना मधील विविध शाखा यांचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गाचेही आवर्जून कौतुक करण्यात आले आहे, विशेषतः प्राध्यापक श्री. अय्यर यांच्याबद्दलचा लेख वाचनीय, मननीय आहे. | **तृतीय पुरस्कार** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | मानवता | कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी. आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय मानवत, परभणी | हे नियतकालिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार विशेषांक असून यात विविध अंगानी बाबासाहेबांच्या विचारांचा शोध घेण्याचा प्रयत्न युवा पिढीने केलेला दिसतो. डॉ.  बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक योगदान, त्यांचा व्यासंग व प्रगल्भता तरुण पिढीला परिचित होण्याच्या दृष्टीने हा अंक उपयुक्त अंक आहे. | **उत्तेजनार्थ प्रथम पुरस्कार** |
| ५. | ज्योती | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय उरूण-इस्लामपूर | या अंकात प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी फक्त पाठ्यक्रमिक शिक्षण न घेता आपल्या ज्ञानाचा उपयोग ज्ञानप्रबोधन, समाजातील सर्वंकष विषमतेच्या विरोधात केला पाहिजे, यावर आवर्जून भर दिला आहे. अंकामध्ये प्रामुख्याने रोहित वेमुला प्रकरणावर अभ्यासपूर्ण चर्चा करून समाजातील विषमताग्रस्त विषयाला अनुसरून काही लेख लिहिले आहेत. याच अनुषंगाने विविध विद्यार्थांच्या सुंदर, अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश समर्पकपणे केला आहे. विविध स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करणारा आलेख अंकाची उंची वाढवतो. | **उत्तेजनार्थ द्वितीय पुरस्कार** |
| ६. | स्पंदन | न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर | या वर्षीचा सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरविण्यात आलेल्या या नियतकालिकात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असणारी 'दान' ही संकल्पना सर्वंकष मांडणारे 'स्पंदन' हे नियतकालिक विद्यार्थ्यांना रक्तदान, नेत्रदान, देहदान, श्रमदान याबरोबरच अन्नदान, भूदान, मतदान, बलिदान यासारख्या विविध संकल्पनांची उकल करणारे आहे. | **उत्तेजनार्थ तृतीय पुरस्कार** |

## विज्ञानगंगा

विज्ञान आणि तंत्रज्ञानासंबधी घडलेल्या व घडणाऱ्या चालू घडामोडी लोकांपर्यंत पोहोचाव्या, आपण नित्य व्यवहारांत विज्ञान, शास्त्र, वैज्ञानिक दृष्टिकोन असे शब्द सहजपणे वापरतो. तर विज्ञान म्हणजे नक्की काय? कशाला म्हणायचा वैज्ञानिक दृष्टिकोन? हे उलगडण्याच्या या एका छोटाशा प्रयत्नातून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' हा उपक्रम राबवला जातो. क्रमबद्ध आणि तर्कशुद्धरीतीने आपल्या आणि सभोवतालच्या विश्वाबद्दलचे ज्ञान एकत्र करुन, त्या ज्ञानाला (माहितीला) पडताळून बघता येतील, अशा नियम आणि सिद्धांतात बद्ध करण्याच्या प्रक्रियेला विज्ञान असे म्हणतात.

विज्ञानाचा आणि उपलब्ध वैज्ञानिक माहितीचा पसारा अवाढव्य, महाप्रचंड आहे. तो अभ्यासताना त्यांत सुसुत्रता येण्याकरता त्याचे विविध भागांत (शाखांत) विभाजन केले आहे, या शाखांना **वैज्ञानिक शाखा** असे म्हणतात. वैज्ञानिक शाखेची व्याप्ती आणि आकार हा मर्यादेत सिमीत ठेवलेला असतो, जेणेकरुन विषयाची हाताळणी मानवाला अधिक सोपी आणि व्यवहार्य ठरावी. उदा: समाज विज्ञान, निसर्ग विज्ञान, जैविक शास्त्र, भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र, भूगर्भशास्त्र, पाणी शास्त्र, खगोल शास्त्र .. इतर... आणखी काही. अश्या वेगवेगळ्या विषयांना अनुसरून 'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेले विषय पुढील प्रमाणे...

### पाचवी शक्ती

**व्याख्याते – शास्त्रज्ञ प्रा. एन. कृष्णन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शन शिबीरे आयोजित केली जातात. त्यातील एक उपक्रम म्हणजे 'विज्ञानगंगा' हा उपक्रम प्रतिष्ठान आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबवला जातो. 'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाचे आठवे पुष्प दि. २२ ऑक्टो. २०१७ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले. ह्या आठव्या मार्गदर्शन कार्यक्रमाचा विषय होता The fifth force (पाचवी शक्ती) हा होता. प्रा. एन. कृष्णन. आतापर्यंत आपल्याला गुरूत्वाकर्षण शक्ती, चुंबकीय शक्ती, तीव्र अणुशक्ती, आणि सौम्य अणुशक्ती ह्या चार प्रकारच्या शक्ती माहित आहेत. तथापि, पाचवी शक्ती अस्तित्वात असल्याचे पुरावे हाती येत आहेत. याची माहिती प्रा. एन. कृष्णन यांनी दिली. यासाठी केलेले मार्गदर्शन लक्षपूर्वक ऐकून कार्यक्रमाच्या शेवटी शंकासमाधनासाठी अनेक प्रश्न विचारले गेले.

### कृष्ण विवर

**व्याख्याते– प्रा. जे. एस यादव**

'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाचे नववे पुष्प दि. १६ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले.

विश्वाच्या उत्पत्तीचे कुतूहल आपल्या सर्वांनाच आहे. जगातील कित्येक शोधसंस्था या विषयावर काम करत आहेत; परंतु आजही या कुतूहलाचे निरसन झालेले नाही. त्याविषयी अनेक प्रयोग सतत होत असतात,

कृष्णविवर तो भाग आहे, जिथे गुरुत्वाकर्षण इतके प्रबळ असते की तिथून काहीही बाहेर जाऊ शकत नाही. अगदी विद्युत चुंबकीय तरंगसुद्धा (उदा: प्रकाश) बाहेर येऊ शकत नाहीत. जेव्हा एखाद्या ताऱ्यामधील संपूर्ण इंधन जळून जाते आणि त्याचा विस्फोट होतो, हा स्फोट झाल्यानंतर ते हळूहळू आकुंचन पावते, गडद व दाट होते. त्याचे न्यूट्रोन ताऱ्यात रुपांतर होते. जर हा तारा अगदी विशाल असेल, तर तो गुरुत्वाकर्षणाच्या दबावाने आकुंचन पावेल व एका काळ्या रंगात बदलत जाईल त्याला आपण कृष्णविवर असे म्हणतो. तो इतका गर्द

असतो की, तो दिसतही नाही. मग तो असल्याचे सिद्ध कसे होते, ते इतर पदार्थांच्या परस्पर झालेल्या क्रिया प्रतिक्रियांवरून सिद्ध होते.

**'आशिया खंडातील मानव मुळात आफ्रिकन होता का ?'**

**व्याख्याते- प्राध्यापक डॉ. सुभाष वाळिंबे**

'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाचे दहावे पुष्प गुरुवार दि. ८ डिसेंबर २०१७ रोजी प्रतिष्ठानच्या सभागृहात पार पडले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'विज्ञानगंगा' कार्यक्रमांतर्गत पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील मानववंश शास्त्राचे निवृत्त प्राध्यापक डॉ. सुभाष वाळींबे यांचे 'आशिया खंडातील मानव मुळात आफ्रिकन होता का?' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानात प्रा. सुभाष वाळींबे यांनी मानववंश शास्त्रासंबंधित अतिशय रोमांचाकारक खुलासे केले. भारतातील जैविक अन्थ्रोपोलिक इतिहासाचे वर्णन केले. त्यांना मानववंश शास्त्र या संशोधनात येणाऱ्या अडचणी व प्रमुख आव्हानांना कसे सामोरे जावे लागले व त्या आव्हानांतून त्यांना नवीन शोध कसे मिळत गेले याबद्दल त्यांनी त्यांचे अनुभव सांगितले. जैविक पुरातत्व शास्त्राच्या उत्क्रांतीवर एक उत्कृष्ठ विहंगावलोकन प्रा. वाळिंबे यांनी केले.

**हल्लीच्या फुलांना वास का येत नाही'**

**व्याख्याते- प्राध्यापक नागेश टेकाळे**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विज्ञानगंगा'चे अकरावे पुष्प गुरुवार दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी 'हल्लीच्या फुलांना वास का येत नाही?' या विषयावर नुकतेच पार पडला. विशेष म्हणजे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. नागेश टेकाळे यांनी उत्कृष्ट उदाहरणे देऊन उपस्थितांची मने जिंकली. आपल्या आयुष्यात घडणारी प्रत्येक गोष्ट सुवासाशी कशी निगडित आहे, याची उदाहरणेही त्यांनी दिले.

सुरुवातीला टेकाळे यांनी पर्यावरणची व्याख्या स्पष्ट केली. ती अशी : जैविक आणि अजैविक घटकांचा एकमेकास पूरक असा एकत्रित मिलाप, त्याला संतुलित पर्यावरण असे म्हणतात. त्यानंतर सुंदर फुलांचे आकर्षण दोन प्रकारचे असते, एक रंग आणि दुसरा सुवास. रंगाचे सौंदर्य दुरुन न्याहाळता येते, पण त्याचा सुवास आपल्याला जवळ खेचून आणतो हे विशेष आहे, असेही त्यांनी सांगितले. सुवास निर्मिती करणारी उदाहरणे यामध्ये फूल-देशी, गुलाब, सोनचाफा, फळ-पिकलेला आंबा, बी-जीरे, पाने-तुळस, कढीपत्ता, गवती चहा, तसेच सर्वात जास्त सुगंध हा तुळसीपासून मिळतो, अशी माहिती त्यांनी दिली.

शाळेतील उदाहरण देताना सरांनी शाळेत केलेला प्रयोग एका वर्गात गणित अभ्यास करत असलेल्या विद्यार्थ्यांना तुळशीच्या झाडाच्या बाजूला बसून अभ्यास करावयास सांगितले, त्यानंतर त्यांच्यामध्ये प्रगती झाल्याचे आढळले. सुगंधी फुलाचे फायदे : बरेचसे रोग नाहीसे होतात, रोगजंतू नष्ट होतात आणि प्रतिकार शक्ति वाढवतात. तसेच त्यांनी सुगंध हरवलेली फुले यांची माहिती दिली. उदाहरणार्थ, सुलतान चंपा, ऑर्किड, पाटल, अतसी, जपाकुसुम, बंधूक, कंदाचे फूल, लाल कमळ, श्वेत कमळ, कड्क चंपा, बकुळ, माधवी आणि माधवीलता जंगलतोड, रसायनांचा वापर, वातावरणातील बदल या प्रमुख कारणांमुळे फुलांचा सुगंध हरवतो आहे असे त्यांनी नमूद केले.

# अपंग हक्क विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर, दत्ता बाळसराफ, समन्वयक सुहास तेंडुलकर आणि संघटक सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे या काम पाहतात.

### पुणे : दिनांक ३१ जानेवारी, २०१७ : 'दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६, एक दृष्टिक्षेप' कार्यशाळा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, अपंग कल्याण आयुक्त कार्यालय, पुणे आणि जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त 'दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६' एक दृष्टिक्षेप कार्यशाळा निसर्ग मंगल कार्यालय, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे येथे दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी राज्याचे अपंग कल्याण आयुक्त मा. नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यशाळेची सुरुवात झाली. आयुक्तांनी केलेल्या त्यांच्या भाषणात केंद्र शासनाने २०१६ ला मंजूर केलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठीच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाकडून सर्वसमावेशक व परिणामकारक नियमावली तयार करण्यात येत आहे, त्यामुळे नवीन कायदा तळागाळातील दिव्यांग व्यक्तींपर्यंत पोहोचवण्यासाठी या क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांनी केलेल्या सूचनांचे स्वागत केले जाईल, असे आवाहन राज्याचे अपंग कल्याण आयुक्त मा. नितीन पाटील यांनी केले. दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६ निर्मिती प्रक्रिया, २) दिव्यांग व्यक्ती कायदा-२०१६ व त्याचा आशय, ३) दिव्यांग कायदा-२०१६ आणि त्याची व्याप्ती, ४) दिव्यांग कायदा व राज्य शासनाची नियमावली, ५) दिव्यांग कायदा-२०१६ आणि अपंगत्वाचे प्रकार, ६) दिव्यांग कायदा-२०१६ ची धोरणात्मक अंमल-बजावणी प्रक्रिया, इत्यादी विषय या कार्यशाळेत मांडण्यात आले. या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती मा. समीर घोष, मा. असीम सरोदे, मा. बी. एम. तायडे, मा. संजय जैन, मा. डॉ. कल्याणी मांडके, मा. नितीन पाटील आदि मान्यवरांनी वरील विषयांवर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी समाज कल्याण विभागाचे अतिरिक्त आयुक्त मा. सदानंद पाटील, प्रादेशिक उपायुक्त मा. लक्ष्मीकांत महाजन, प्रकल्प संचालक मा. नंदकुमार फुले, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडूलकर, मंजिरी देशपांडे, सी. आर. रंगनाथन संस्थेचे अध्यक्ष वसंत पाटोळे, वसंत ठकार आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी नंदकुमार फुले, सौ. समृध्दी कान्हेकर-कुलकर्णी, शिरज बोंडे, अशोक सोलंकी, सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे, महात्मा गांधी सेवा संघाचे सतीश निर्मल आदींनी परिश्रम घेतले.

**अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :** अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाईंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या तीन वर्षापासून दर महिन्याच्या चौथ्या

शनिवारी अंध प्रवर्गसाठी नियमितपणे चर्चासत्राचा उपक्रम यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये राबविला जातो. या सत्रात अंध व्यक्तींसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनास्पद चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणात झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे यासारख्या विविध विषयांवर माहिती, चर्चा केली जाते. त्यामुळे या प्रवर्गातील अपंगाना त्यांचे आयुष्य कसे सोप्या पध्दतीने जगता येऊ शकते, याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होते. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अपंग हक्क विकास मंचाच्या संघटक सौ. सुकेशनी मर्चंडे-शेवडे विशेष परिश्रम घेतात.

यशवंतराव चव्हाण, मुंबई, अपंग हक्क विकास मंच, महात्मा गांधी सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील गरजू, अपंग लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव, साहित्य व साधनांचे वाटप करण्यात आले.

दि. १ सप्टेंबर २०१६ ते ३१ जानेवारी २०१७ या कालावधी मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील गरजू १०७ अपंग लाभार्थ्यांना संस्थेच्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, परभणी, हिंगोली या शाखांमधून जयपूर फूट कॅलिपर, तीनचाकी सायकल, व्हिलचेअर, श्रवणयंत्र, अंध काठी, अंध गॉगल, ब्रेल कीट, आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.



# शिक्षण विकास मंच

## कार्यवृत्त

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देण्याचे काम २००८ पासून शिक्षण विकास मंचाने केले आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे शिक्षण विषयक कार्यक्रम शिक्षण विकास मंचामार्फत आयोजित केले जातात. शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा.खा. सुप्रिया सुळे या आहेत. डॉ. वसंत काळपांडे मुख्य संयोजक आणि बसंती रॉय या विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. दत्ता बाळसराफ हे संयोजक आहेत. नजमा काझी, शुभदा चौकर, सुरेश पाटील हे सदस्य आहेत. तर समन्वयक म्हणून माधव सुर्यवंशी, मीनल सावंत काम पाहतात. शिवाय विविध कार्यक्रमानुरूप महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत असते.

शिक्षण विकास मंच दरवर्षी 'शिक्षण' या विषयाशी संबंधित विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करत असते. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक यांना वेळोवेळी गरजेनुसार मार्गदर्शन करत असते. शिक्षकांच्या साहित्य गुणांना वाव देण्यासाठी शिक्षक साहित्य संमेलनाची सुरुवातही शिक्षण विकास मंचाने केली आहे. शिक्षण विषयाशी संबंधित अशा शैक्षणिक ग्रंथांना शिक्षण विकास मंचाकडून पुरस्कार दिले जातात.

शिक्षण विकास मंचाकडून एप्रिल २०११ पासून शिक्षण कट्ट्याची सुरुवात करण्यात आली आहे. शिक्षणक्षेत्राशी संबंधित मंडळी एखादा विषय ठरवून त्या विषयावर गप्पा मारण्यासाठी कट्ट्यावर एकत्र येतात. यात मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ, शैक्षणिक पत्रकार, पालक, संस्थाचालक यांचा सहभाग लक्षणीय असतो.

साधारणपणे दोन महिन्यातून एकदा हा कट्टा राज्याच्या विविध शहरात घेतला जातो. शैक्षणिक क्षेत्रात शिक्षण कट्ट्याने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षण कट्ट्यावर आलेल्या विविध विषयाची 'कट्टा शिक्षण' ही पुस्तिकाही प्रकाशित झाली आहे.

शिक्षण विकास मंचाने २००८ पासून शिक्षण क्षेत्रात अनेक होतकरू तरुण ग्रामीण शिक्षकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले, त्यांची महाराष्ट्राला ओळख करून दिली.

### विशेष बैठक : २३ जानेवारी २०१७

'शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'ची विशेष सभा २३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती. ही बैठक शिक्षण विकास मंचचे संयोजक डॉ. काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होती. प्रारंभी शिक्षण विकास मंचच्या गतवर्षातील कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला.

दरवर्षी २५ नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय शिक्षण परिषद होत असते. यावर्षी ती झाली नाही. या परिषदेत उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथांना शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत 'कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार' देण्यात येतो. या वर्षी एप्रिल २०१७ मध्ये ही राज्यस्तरीय परिषद होणार आहे. पुरस्कारांसाठी आलेल्या ग्रंथापैकी पुरस्कारांसाठी कोणते ग्रंथ योग्य

आहेत याची चर्चा यावेळी करण्यात आली. आगामी राज्यस्तरीय परिषदेचा विषय काय असावा या संदर्भातही चर्चा झाली. ही परिषद अहमदनगर येथे घेण्याचे ठरले आहे. परिषदेचा विषय सध्यातरी ‘प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र’ हा ठेवण्यात आला आहे. या परिषदेअगोदर मार्चच्या शेवटच्या आठवड्यात मुंबई येथे या विषयावर ‘शिक्षण कट्टा’ आयोजित करण्यात यावा. या कट्ट्यामध्ये जी चर्चा होणार आहे, ती राज्यस्तरीय परिषदेची पूर्वतयारी असावी, असा प्रयत्न व्हावा असे ठरविण्यात आले. हा कट्टा पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय यांनी घेतली. या संदर्भात मदत करण्याचे निर्देश डॉ. काळपांडे यांनी समन्वयक सूर्यवंशी यांना दिले. या विशेष बैठकीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक दत्ता बाळसराफ, डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, माधव सूर्यवंशी यांची मुख्य उपस्थिती होती.



# सृजन

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे या करीता सृजन हा उपक्रम चालवण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करतात.

२ ऑक्टोबर १९१६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमत्ताने मुलांना महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित विविध आर्ट फिल्म दाखवण्यात आल्या. त्यांनतर महात्मा गांधी यांच्या जीवनावर मुलांची वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये अनेक मुलांनी सहभाग घेतला. विजयी स्पर्धकांना खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते बक्षीस म्हणून पुस्तके देण्यात आली.

६ नोव्हेबर २०१६ श्री. सुनील कदम यांनी 'विज्ञानातील गंमती जमती' या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेमध्ये घरातील विविध साधनांचा वापर करुन काही विज्ञान प्रयोग कसे करता येतील यांचे प्रात्यक्षिक दाखवले. त्याचबरोबर निखाऱ्यावरुन चालत असताना आणि अंगावरुन ज्वाला फिरविण्याच्या पाठीमागे काय विज्ञान असते, याची महिती दिली.

डिसेंबर २०१६ सृजन उपक्रमाला १३ वर्षे पूर्ण होत असून त्याचबरोबर सृजन २०१६ या वर्षाचा सांगता समारंभ म्हणून 'पार्टी' हा कार्यक्रम आयोजत केला होता. या कार्यक्रमामध्ये श्री संतोष जोशी यांनी जादूचे प्रयोग, खेळ असे मनोरंजनाचे कार्यक्रम घेतले.

**जानेवारी २०१७**

सृष्टीज्ञान या पर्यावरण शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती संगीता खरात यांनी 'जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन' विषयावर सादरीकरण केले तसेच फिल्मही दाखवली. जैवविविधता म्हणजे काय, प्राण्यांचे विविध अधिवास, प्राण्यांमधील वर्गीकरण, जैवविविधतेचे आपल्या आयुष्यातील महत्त्व तसेच जैवविविधतेला असलेले धोके याबद्दल या सत्रात माहिती देण्यात आली.

फेब्रुवारी २०१७ रोजी अनुयोग शिक्षण संस्थेच्या संस्थापक श्री सतीश चिंदरकर यांनी 'परिक्षेची तयारी' या विषयावर मुलांना मार्गदर्शन केले. विविध विषयांचा अभ्यास कसा करायचा, अवघड वाटत असलेला विषयाचा अभ्यास कसा करावा, अभ्यास करण्याची पूर्वतयारी करुन अभ्यासाला बसावे त्याचबरोबर घरातील कोणते काम करायचे असेल तर ते अगोदर करुन अभ्यासाला बसावे त्यामुळे एकाग्रतेने अभ्यास करता येईल, असे सांगितले.

मार्च ते मे या महिन्यात मुलांच्या वार्षिक परीक्षा आणि उन्हाळाची सुट्टी यामुळे तीन महिने 'सृजन कार्यशाळा' आयोजित करण्यात येत नाही. 'सृजन'च्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १०० ते १५० च्या आसपास विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान

**कार्यवृत्त**

हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ या जगाला भेडसावणाऱ्या समस्या आहेत. 'वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान' मार्फत हे आव्हान पेलणारी भावी पिढी घडविण्याचा प्रयत्न शालेय पातळीवर केला जातो आहे. याच उपक्रमातील पुढील पाऊल म्हणजे मुलांचे हवामान अध्ययन केंद्र होय. हवामानाचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक पातळीवरील उपाययोजना करण्याकरिता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करून घेणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांच्या अंमलबजावणीतून स्थानिक पातळीवरील हवामान अध्ययन केंद्र आकाराला येईल. यामार्फत प्रकल्पात सहभागी मुलांमध्ये हवामानविषयक शास्त्रीय अध्ययन, माहिती संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरणाचे कौशल्य विकसित होईल.

त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांबरोबर रिकाम्या प्लास्टीक बाटल्यांपासून पर्जन्यमापक बनवणे आणि प्लास्टीक स्ट्रॉपासून वातकुक्कुट बनवणे शिकवले होते.

### डिसेंबर–क्लायमेट अँबॅसॅडर्स स्टुडंटस् कॉन्फरंस १९ डिसेंबर २०१६

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्लायमेट अँबॅसॅडर्स, मुंबई- स्टॉकहोम' या प्रकल्पाची सांगता विद्यार्थ्यांच्या परिषदेने सोमवारी दिनांक १९ डिसेंबर २०१६ रोजी झाली. या समारोपप्रसंगी प्रकल्पातील सहभागी संस्था क्लायमेट ॲक्शनचे प्रतिनिधी श्रीम. कारीन वाहलग्रेन आणि श्री. रिकार्ड ऱ्हेनबर्ग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परिषदेची सुरुवात विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रकल्प प्रदर्शनाच्या उद्‌घाटनाने झाली. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या उपक्रमांचे अहवाल तसेच हवामान बदलास उत्तर म्हणून त्यांनी तयार केलेली मॉडेल या प्रदर्शनात मांडली होती.

परिषदेच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी नाटिका, मूकाभिनय, पोवाडा अशा विविध माध्यमातून हवामान बदल ही समस्या आणि तिच्यावरील उपाययोजनांचे सादरीकरण केले. हवामान बदल या समस्येला वैयक्तिक पातळीवर द्यावयाचे उत्तर म्हणजे आपली जीवनशैली बदलणे, हवामानानुसार आपल्या कपड्यांमध्ये बदल करणे. भारतीय पारंपरिक पोषाखांमध्ये हे हवामानाचे भान राखलेले होते जे आपण विसरत चाललो आहोत. म्हणूनच हा विसरलेला वारसा पुन्हा आठवून देणारा फॅशन शो सादर झाला. यात सर्व शाळांतील विद्यार्थी, शिक्षक आणि सृष्टीज्ञानच्या कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला.

सृष्टीज्ञान संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. प्रशांत शिंदे यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या हवामानबदल विषयक घडामोडींचा आढावा घेऊन आपणही आपल्या पातळीवर या समस्येवर प्रकल्पाच्या माध्यमातून काम सुरू केले आहे, अशी मांडणी त्यांनी केली. यानंतर शारदाश्रम विद्यामंदिर तांत्रिक विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती हर्षदा मिश्रा यांनी प्रकल्पांतर्गत राबविलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. प्रकल्पात सहभागी झालेल्या विद्यार्थी व शिक्षक प्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले.

यानंतर प्रमुख पाहुणे श्री. रिकार्ड व्हेनबर्ग यांनी क्लायमेट ॲक्शन संस्था आणि फ्युचर अर्थ नेटवर्क यांच्या कार्याची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. स्वीडनमध्ये हवामान बदलाशी निगडीत विविध समस्यांवर काय काम सुरु आहे, जैविक इंधनाच्या विरोधात कशी आंदोलने सुरु आहेत, धोरणांच्या आखणीबाबत राजकीय प्रतिनिधींशी कशा चर्चा सुरु आहेत, याची मांडणी आपल्या सादरीकरणात केली.

श्रीमती कारीन वाहल्ग्रेन यांनी हवामान बदल विषयक सादरीकरण केले. हवामान बदल होत आहेत, हे जगातील सर्व शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. त्याची तीव्रता आणि त्याचे पृथ्वीवर होणारे परिणाम त्यांनी सादरीकरणातून दाखवले. त्यावर उपाययोजना म्हणून जागतिक तसेच स्थानिक पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे त्यांनी पटवून दिले. त्याकरिता जनजागृती हे महत्त्वाचे कार्य आहे, जे तुम्ही आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून करत आहात असे म्हणून तिने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यानंतर झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष, माननीय खासदार सुप्रियाताई सुळे या आवर्जुन उपस्थित राहिल्या होत्या. सर्वांत प्रथम या प्रकल्पात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार झाला. विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून सोलर पॅनल देण्यात आले. त्यानंतर प्रकल्पात सहभागी सर्व शिक्षकांचाही सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी शाळांना जलसंवर्धन, वृक्षारोपण, कचराव्यवस्थापन, जनजागृती, जैवविविधता अशा विविध विषयातील सर्वोत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्हे देण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभ झाल्यानंतर परिषदेच्या प्रमुख पाहुण्या माननीय खासदार सुप्रिया सुळे यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात ताईंनी प्रत्येक शाळांमधील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. ताईंनी प्रतिष्ठानच्या गच्चीवरही औषधी वनस्पतींची लागवड व्हावी, अशी इच्छा जाहीर केली. या प्रकल्पाअंतर्गत राबविले गेलेले उपक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या पोर्टलवर सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही टाकावेत असे आवाहनही त्यांनी केले. स्वीडनमधील क्लायमेट ॲक्शन या संस्थेच्या सदस्या श्रीम. कारीन आणि फ्युचर अर्थ, स्वीडनचे श्री. रिकार्ड यांच्या कार्याचाही त्यांनी गौरव केला आणि त्यांच्या देशाने पर्यावरण संवर्धनात घेतलेल्या आघाडीबद्दल अभिनंदन केले. अखेरीस प्रकल्पात सहभागी शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे त्यांनी मनापासून कौतुक केले, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बदलापूरचे नगरसेवक कॅप्टन आशिष दामले यांनी आभार प्रदर्शन केले. त्याने हवामान बदल विषयक विद्यार्थ्यांच्या परिषदेचा समारोप झाला. या परिषदेचे सूत्रसंचालन 'सृष्टीज्ञान'च्या प्रकल्प संघटक श्रीमती संगीता खरात यांनी केले. या संपूर्ण परिषदेच्या आयोजनात प्रतिष्ठानचे संयोजक दत्ता बाळसराफ यांनी मार्गदर्शन केले तसेच सृष्टीज्ञानचे कार्यकर्ते प्रशांत शिंदे, श्रीमती ज्योती खोपकर आणि कुणाल अणेराव यांनी परिषद यशस्वी व्हावी, याकरीता विशेष परिश्रम घेतले.

**जानेवारी २०१७**

'मुलांचे हवामान अध्ययन केंद्र' या प्रकल्पाअंतर्गत प्रकल्पात सहभागी मुंबई तसेच बदलापूर येथील शाळांमध्ये 'हवामान बदल आणि वनस्पती' या विषयावर सत्रे घेण्यात आली. आपले जीवनचक्र पूर्ण करत असताना वनस्पती

विविध बदलांद्वारे बदलत असलेल्या हवामानबद्दलही सांगत असतात. तापमान, हवेतील आर्द्रता, पावसाचे प्रमाण तसेच कालावधी यासारख्या अनेक घटकांचा वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होत असतो. त्यामुळे, जर एखाद्या वृक्षाचे दररोज नियमितपणे निरीक्षण केले तर त्यामधून आपल्याला बदलणाऱ्या हवामानाचा अंदाज येऊ शकतो. वृक्ष हे हवामान बदलाचे निदर्शक आहेत, म्हणूनच प्रकल्पात सहभागी विद्यार्थ्यांना शाळेच्या परिसरातील विविध वृक्षांचे निरीक्षण करण्याचा उपक्रम देण्यात आला. त्याचप्रमाणे वनस्पतींची वाढ नेमकी कशी होते, बिया कशा रुजतात यांचे निरीक्षण करता यावे यासाठी प्लास्टीकच्या ग्लासमध्ये टिश्यूपेपर ओला करून त्यात बिया कशा रुजवाव्यात याची प्रात्यक्षिक दाखवण्यात आलं. मुंबईतील पाच शाळा आणि तलासरी येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या शाळांमध्ये संगीता खरात यांनी हे उपक्रम राबविले. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्या बदलापूर विभागात प्रियांका दामले यांच्या पुढाकाराने बदलापूर मध्ये दोन शाळांमध्ये उपक्रमांस सुरुवात करण्यात आली.



# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम

**कार्यवृत्त**

समाजातील गोरगरिब, दिनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये, यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतूदीला अनुसरुन भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

सन १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते.

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने ''यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम'' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व सामाजिक कार्यकर्ते काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य - सचिव म्हणून मा. श्री. म. बा. पवार हे काम पहात आहेत. त्यांना मदतनीस म्हणून श्रीमती शोभा लोंढे या कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या सदस्य असून त्या त्या कामकाजाला मदतनीस आहेत.

**(१) फोरम मार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम चालते.**

१) समाजातील गोर-गरिब तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२) प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.

३) काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४) पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने आपसात तडजोड घडवून आणणे.

५) विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सुचवणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठवणे.

६) विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७) सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८) सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळेचे आयोजन करणे.

९) विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन

करणे तसेच अशा विद्यार्थीसाठी 'वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करणे.

१०) संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोकन्यायालय किंवा अदालतींचे आयोजन करणे.

११) न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

(२) **फोरमच्या बैठका :–** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात.

या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. त्यानुसार गेल्या १ ऑक्टोबर २०१६ ते २८ फेब्रुवारी २०१७ या पाच महिन्यामध्ये फोरमच्या ५ मासिक बैठका झाल्या. या ५ बैठकांमध्ये अंदाजे एकूण ७५ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण ६१ सदस्य उपस्थितीत होते. त्याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी १४ सदस्य उपस्थितीत होते. या बैठकीमध्ये ॲड.डॉ. निलेश पावस्कर, ॲड. भूपेश सामंत, ॲड. मधुकर उगले व ॲड. प्रितींदर सिंग या मा. सदस्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

(३) **फोरमच्या उपसमितीच्या बैठका :** वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या घटित केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

(४) **विभागांची बैठक :** १६ ऑक्टोबर २०१६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागाच्या प्रतिनिधीची बैठक मा. सरचिटणीस शरद काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १२ जुलै २०१६ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १६ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

(५) **ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक :** १६ ऑक्टोबर २०१६ मध्ये आयोजण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी बांद्रा ते दहिसर या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक ज्येष्ठ, नागरिक संघ वजिरा बोरीवली (पश्चिम), वजिरा यांचे ज्येष्ठालय, जानुजा अपार्टमट समो, चांगुले स्मशानभूमी जवळ, राम मंदिर रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे बुधवार दिनांक २७ जुलै २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री. विजय औंधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला प्रतिष्ठानच्या वतीने सर्वश्री म. बा. पवार, संजय बनसोडे व शैलेश चव्हाण उपस्थित होते. बैठकीला ज्येष्ठ नागरिक संस्थांचे अंदाजे ६५ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ४१ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

(६) **कायदेविषषक सल्ला केंद्र :** गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० नंतर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या दुसऱ्या मजल्यावरील ग्रंथालयामधे कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या ऑक्टोबर २०१६ ते

फेब्रुवारी २०१७ महिन्यामध्ये या केंद्रात एकूण २८ बैठका झाल्या. या बैठकामध्ये एकूण २४ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणाऱ्या लोकांना शासनाच्या संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले. या केंद्राचे काम सर्वश्री म. बा. पवार, श्री. भूपेश सामंत, श्रीमती प्रितिंदर सिंग व ॲड. मधुकर उगले आदी वकीलांनी पाहिले.

(७) **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र** : दर मंगळवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न सुरु आहेत.

(८) **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या. (Know your Law Lecture Series) :** या व्याख्यानमालेअंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या 'इमारतीचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार' आणि 'सायबर कायदा' या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(९) **वकीलांची व्यावसायिक नीतीमत्ता या विषयावर चर्चासत्र** : विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात आणि त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतीमत्ता (Professional Ethics of Lowers) या विषयाबाबत नवीन होतकरु वकीलांना जाणीव करून देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(१०) **विधी साक्षरता कार्यशाळा :** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, – पौगंडावस्थेतील मुले – मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृह निर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थेचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सहा महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(१.१)यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, यांच्या संयुक्त विद्यमाने डिग्री कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक ११ डिसेंबर २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत डोंबिवली (पूर्व) रोटरी भवन, एम.आय.डी. सी. क्षेत्र, पेंढारकर महाविद्यालयासमोर, येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'कायद्याची माहिती' या

विषयावर मराठी व इंग्रजी भाषणाचे माध्यम आहे. एकूण मुले व मुली १५० उपस्थित होते. रोटरी क्लबचे प्रकल्प प्रमुख ज्योत्सना भिसे या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.

(१.२)यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व स्वयंसेवी समन्वयक संस्था, मनस्वी स्त्री संशोधन केंद्र, १ ला मजला, सेक्टर ५, कळंबोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला कार्यकर्त्यांसाठी रविवार दिनांक ८ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. ९०पेक्षा जास्त महिला उपस्थित होत्या. स्वयंसेवी समन्वयक संस्था, मनस्वी स्त्री संशोधन केंद्राच्या अध्यक्ष सौ. वृषाली मगदूम या कार्यक्रमांत अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.

(१.३)यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व स्वयं फाऊन्डेशन संस्था, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने युवक-युवतींसाठी रविवार दिनांक १५ जानेवारी २०१६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यत पालघर येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. वरई फाटा, दहिसर गाव, व्हिलेज उच्च माध्यमिक शाळा, जिल्हा व तालुका पालघर येथील दहा गावातील अंदाजे ९१ युवक-युवती उपस्थित होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. अमृता ढवळे या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.

(१.४)दरवर्षीप्रमाणे चालू वर्षी दिनांक १६ ऑक्टोबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्राच्या तळ मजल्यावरील मुख्य सभागृहामध्ये ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा भरविण्यात आला. वांद्रे ते दहिसर क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले एकूण अंदाजे ४०० ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते. या वर्षीच्या 'कर्तबगार ज्येष्ठ नागरिक' म्हणून खालील प्रमाणे पुरस्कार देण्यात आले.

महिला ज्येष्ठ नागरिक : (१) श्रीमती हिरा दया पवार, बोरीवली (पश्चिम), मुंबई व (२) सौ. वर्षा मधुकर रेगे, बोरीवली (पश्चिम), मुंबई.

पुरुष ज्येष्ठ नागरिक : (१) श्री. पांडुरंग विठ्ठल म्हापसेकर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई व (२) श्री. मनोहर विनायक जोगळेकर, बोरिवली (पश्चिम), मुंबई व कर्तबगार ज्येष्ठ नागरिक संघ :- म्हणून 'ज्येष्ठ नागरिक संघ बेस्ट नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई.' या संघटनेला पुरस्कार देण्यात आला.

**(११)विधी साक्षरता कार्यशाळेत शपथ कार्यक्रम व निबंधांना बक्षिसे :** सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेतल्या जातात. तसेच विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

**(१२)विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :** विधी कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यात प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह कायदा १९५४, (१९) बाल विवाह बंदी अर्धिनियम २००७, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८, (२१) न्यायालयाची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यतची माहिती), (२२) स्त्रीयांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Right and Full Participation) (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरीता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The Nation Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, १९९९), (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ The Immoral Traffic (Prevention) Act, १९५६, (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळांच्या व इतर विनिर्दिष्ट परिक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लीम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्तीविषयक विधी (शरियत) प्रयुक्ती १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूतीविषयक लाभ अधिनियम

१९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटार वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम १९५०, (५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३, (५४) गार्डीयनशिप अ‍ॅन्ड वॉर्डस् अ‍ॅक्ट, (५६) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगक छळ (प्रतिबंध बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३, (५७) The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act १४ of २०१३.

खालील वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले :

१) श्री. म. बा. पवार २) श्री. प्रमोद ढोकळे ३) अ‍ॅड. डॉ. निलेश पावस्कर ४) अ‍ॅड. हेमंत केंजाळकर ५) अ‍ॅड. अजय केतकर ६) अ‍ॅड. भूपेश सामंत ७) अ‍ॅड. डॉ. जे. बी. पाटील ८) श्रीमती शिवानी शेलार ९) प्रा. नारायण राजाध्यक्ष १०) अ‍ॅड. प्रकाश देशमुख ११) श्री. दिलीप तळेकर १२) श्रीमती सुशीला मुंडे.

पुढील आर्थिक वर्षामध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले आहे :

१. पोलिसांसाठी ३ दिवसांची विधी कार्यशाळा

२. विद्यार्थ्यासाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा यांचे आयोजन

३. वकीलांची व्यावसायिक नीतीमत्ता यावर चर्चासत्र

४. विधी शाखेच्या विद्यार्थ्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळा

५. विधी शाखेच्या महिला व पुरुषांकरिता विधी साक्षरता कार्यशाळा

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ

## कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्यावतीने शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने महिलांची सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना संतोष पवार व संगीता गवारे यांचे सहकार्य असते.

स्त्रियांच्या छंद, आवडीनिवडी लक्षात घेऊन व त्यातूनच तिला अर्थाजनाचे साह्य कसे मिळेल यासाठी व्यासपीठातर्फे विविध प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन केले जाते. सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण अभ्यासक्रम या कार्यशाळेचे १८ वर्ग यशस्वी झाले व आतापर्यंत ५०० हून अधिक लोकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. आता दिनांक ३० जानेवारीपासून १९ वा वर्ग सुरु झाला आहे. ४४ प्रशिक्षणार्थीनी या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून त्यांच्या कामकाजाकरिता प्रशिक्षित व्यवस्थापकांची मागणी वाढू लागली आहे. त्यामुळेच पूर्णवेळ, अर्धवेळ व्यवस्थापक तसेच सल्लागार म्हणून या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या अनेक संधी शिक्षित लाकांसाठी उपलब्ध आहेत. स्त्रियांचा त्याचबरोबर समाजाचा सर्वांगीण विकास हेच उदिष्ट समोर ठेऊन आम्ही स्त्री व पुरुष ह्या सर्वांना उपयुक्त असे सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण सुरु केले. आज आमच्या येथून प्रशिक्षण घेतलेल्या स्त्रिया व पुरुष अनेक गृहनिर्माण संस्थेत व्यवस्थापन म्हणून काम पाहात आहेत. संस्थेचे हिशोब व इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही पार पाडत आहेत. आमच्या काही महिलांनी स्वतःची सल्लेविषयक संस्थाही सुरु केली आहे. स्त्रियांसाठी सुरु केलेले हे प्रशिक्षण पुरुषांनाही मोलाचे आहे. आतायर्पंत पाचशे लोकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रशिक्षणानंतर परीक्षा घेतली जाते व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाते.

इकेबाना, बोन्साय, वारली रंगकला, मधुबनी व ग्लास गार्डन या कार्यशाळा तर आम्ही घेत असतोच; पण या वर्गाबरोबरच इतर नवीन कला लोकांना शिकण्यास मिळावी, असा आमचा प्रयत्न असतो.

सुंदर व नीटनीटके रहावे असे प्रत्येक स्त्रीला वाटते. मग ती नोकरी करणारी असो; वा गृहिणी २१ व्या शतकातील स्त्री ही नोकरी व घर सांभाळून स्वतःच्या व्यक्तिगत सौंदर्याबाबत जागरूक झालेली आहे. याच उद्देशाने व्यक्तीगत सौंदर्य प्रसाधन म्हणजेच Presonal Grooming चे विनामूल्य प्रात्यक्षिक आयोजित केले होते त्यानुसार स्त्रियांच्या खास आग्रहास्तव सौंदर्य प्रसाधन या कार्यशाळेचा दुसरा वर्ग दिनांक १४, १५ व १७ ऑक्टोबर रोजी घेण्यात आला. १० महिलांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. स्वतःचा मेकअप, केसांची व त्वचेची निगा, हेअरस्टाईलचे विविध प्रकार तसेच साडी ड्रेपिंगच्या विविध पद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

स्त्री ही नोकरी व घर सांभाळून कुटुंबाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देते. याची सुरुवात स्वयंपाकघरातून होते. ह्याच उद्देशाने 'स्वयंपाकघरातील रसायनशास्त्र' हा एक वेगळा विषय घेऊन त्याचे विनामूल्य व्याख्यान दिनांक ३ जानेवारी २०१६ रोजी आयोजित केले होते.

स्वयंपाकघरात अन्न कुठल्या भांड्यात शिजवावे, कसे ग्रहण करावे, वेळ, पद्धत तसेच पाणी पिण्यासाठी प्लास्टीक बॉटल्स कशा हानीकारक आहेत, विरोधी आहार कसा हानिकारक आहे, व सात्विक अन्नाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. ४५ महिलांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला.

या सर्व प्रशिक्षणात व कार्यक्रमात आम्ही प्रशिक्षणार्थीं ची संख्या मर्यादित ठेवली आहे. जेणेकरून मार्गदर्शकास प्रत्येकाकडे लक्ष देता येईल. हे सर्व पाहता एक गोष्ट लक्षात येईल की, उगाच माफक फीच्या नावाखाली भरपूर प्रशिक्षणार्थी घेऊन आम्ही आमची कार्यशाळा यशस्वी करीत नाही; तर सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीस शिकविलेली कला आली पाहिजे, हा आमचा आग्रह असतो. मग सराव करुन ती व्यक्ती त्या त्या कला आत्मसात करू शकते.

आमची उद्दिष्टे, सरळ, सोपी व सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातूनच आहेत. आम्ही लोकांना सतत काय उपयुक्त देऊ शकतो, हाच विचार करत असतो. खूप मोठ्या प्रमाणात नाही, पण ज्या समाजात आपण वावरतो व ज्याच्याकडून आम्हालाही खूप काही शिकायला मिळते, त्या समाजाचे देणे परत करणे, हा आमचा खारीचा नाही, पण मुंगीचा वाटा नक्की आहे. आजही आमच्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून आम्हाला आमच्या कामाची मिळालेली दाद व भविष्यासाठीच्या शुभेच्छा हेच आमचे उद्दिष्ट सफल करते. हाच विचार घेऊन आम्ही भविष्यातही स्त्रियांसाठी व समाजासाठी खूप काही करत राहाणार आहोत.



# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई

## कार्यवृत्त

महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण साहेबांनी गावोगावी ग्रंथालय असावे, असे मत व्यक्त केले होते. महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालयाची उपयुक्तता ज्ञानात घेऊन १९६७ साली महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम हा कायदा अंमलात आला. ग्रंथालय चळवळीत निरपेक्ष वृत्तीने आणि सामाजिक कर्तव्यभावनेने कार्य करणारी अनेक मंडळी आहेत. अनेक ग्रंथालये विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून समाजिक समृध्दी करत असतात. भारत सरकारने नॉलेज कमिशन नेमून ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी नवीन धोरण तयार केले.

काळानुरुप ग्रंथालयं बदलत गेली, नव्या इमारती झाल्या, ग्रंथसंख्या तर वाढलीच. पण अनेक सांस्कृतिक-शैक्षणिक उपक्रम देखील वाढले. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करत अनेकांनी संगणकीकरण केले. बारकोड पध्दत सुरु झाली. काही ग्रंथालयांनी जुने ग्रंथ हस्तलिखित स्कॅन करुन त्याचे ई-बुक देखील केले. स्पर्धा परीक्षेची निकड ओळखून जवळपास प्रत्येक ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु झाले.

आधुनिक जगात झालेल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ग्रंथालयाची संकल्पना बदलली आहे. ग्रंथालय हे माहितीचे देवाण-घेवाण करणारे केंद्र बनले आहे. कारण उपभोक्ता पुस्तक न मागता प्रत्यक्षात माहिती किंवा डेटाबेस मागण्याकरता येत असतो, त्यामुळे आधुनिक ग्रंथालयाचे स्वरुप हे संगणकीय झाले आहे. आंतरजालामधून माहितीचा शोध घेणे, कमीत कमी वेळात योग्य माहिती मिळवून देणे आधुनिक ग्रंथालयाचे दैनंदिन काम बनले आहे. माहिती व ज्ञानाचा वाढलेला आवाका, प्रकाशनाची प्रचंड उपलब्धता/विविध डेटाबेस इ. सारख्या अनेक घटकांचा विचार करता विविध सेवा व सुविधांचे आयोजन ग्रंथालय व माहिती केंद्रांना करावे लागते आहे.

बदलत्या काळानुरुप ग्रंथ संग्रहालये हायटेक होणार आहेत. आजची ग्रंथालये आधुनिक ज्ञानाधिष्ठित कार्य करित आहे. नाविन्यपूर्ण सुधारित ज्ञान वाढवणे हे ग्रंथालयातील ज्ञान व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी नवीन संकल्पनांचा अवलंब करुन अधिकाधिक गुणात्मक सेवा उपभोक्त्यांना उपलब्ध करुन देणे ग्रंथालयाचे काम आहे. ग्रंथालयातील संग्रहात आता छापील ग्रंथांबरोबर विविध प्रकारचे ग्रंथेतर साहित्य येऊ लागले आहे. डिजिटल ज्ञान केंद्राच्या माध्यमातून सहज सुलभतेने अशा साहित्यांची हाताळणी करता येते. ऑनलाईन डेटा तात्काळ डाऊनलोड करता येतो. या प्रकारच्या सुविधा विद्यार्थी, संशोधक, यांच्याकरिता उपलब्ध करण्यात येत आहेत.

अ) E-resourceso (यांत्रिकस्त्रोत) - इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे डिजिटल किंवा ई-स्वरुपात माहिती प्रकाशित करणे शक्य झाले आहे. छापील साहित्य प्रकाशनाप्रमाणे ई-स्वरुपातील साहित्य प्रकाशनाचा वेग वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर ग्रंथालयात विविध ई-स्वरुपातील साहित्यची हळूहळू वाढते आहे. ई-स्वरुपातील साहित्याच्या ग्रंथालय संग्रहातील समावेशामुळे ग्रंथालय साहित्य संग्रहाचे स्वरुप बदलत चालले आहे. जवळ जवळ सर्व विषयात आज ई-स्वरुपातील साहित्य प्रकाशित होत आहे.

जसे उदा.

अ) ई-जर्नल पूर्ण स्वरुपात; (E-Journal Full Texts)

ब) बुक्स

क) संदर्भ डेटाबेस; (Subject Ref. Database Abstract) सूचीबद्ध

ख) संदर्भ डेटाबेस (पूर्ण स्वरुपात)

ग) सांख्यिकी माहितीचे डेटाबेस Census Data

घ) भौगोलिक माहिती संदर्भ डेटाबेस; (Georeferenced Database)

१. ERIC – ERIC (Education Resources Information Centre) हा एक ऑनलाईन संदर्भ डेटाबेस आहे. ERIC हे United States Department of Education च्या Institute of Education Sciences या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी पुरविलेल्या निधीच्या मदतीने सदर डेटाबेस अस्तित्वात आले. सदर डेटाबेसमध्ये पूर्ण स्वरुपात विविध विषयांवर पुस्तके, लेख, जर्नल उपलब्ध आहेत.

२. DOAJ – Directory of Open Access Journals 2003 या प्रोजेक्टची निर्मिती झाली. आतापर्यंत ९००० पूर्ण स्वरुपातील जर्नल विज्ञान, सामाजिकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान इ. विषयांवर पूर्ण स्वरुपात जर्नल उपलब्ध आहेत

३. Gutenberg या प्रोजेक्टची निर्मित्ती १९७१ साली झाली. यामध्ये विविध विषयांवर ई-बुक्स उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे ऑडीओ बुक्स, सीडी-डीव्हीडी प्रोजेक्ट इत्यादी प्रकारचे साहित्य विद्यार्थी/सभासदांना उपलब्ध करुन दिले आहे.

४. Bookboon - Bookboon या कंपनीने त्यांच्या वेबसाईटच्या माध्यमातून ५० मिलियन पेक्षा जास्त पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. यामध्ये इंनजिनिअरींग, आय. टी.; I.T. बिजनेस या विषयांची निगडीत पुस्तके उपलब्ध करुन दिली आहेत.

५. Digital Commons Network – या वेबसाईटवर जगातील सर्व विद्यापीठे आणि विद्यालये यांनी प्रकाशित केलेले जर्नल, प्रबंध, पुस्तके, शोधनिबंध इत्यादी प्रकारचे स्त्रोत उपलब्ध करुन दिले आहेत.

६. Shodhganga – Shodhganga@INILIBNET हे एक असे सेंटर आहे, ज्या ठिकाणी संशोधक स्वत:चे प्रबंध प्रकाशित करुन ते सर्वासाठी ऑनलाईन उपलब्ध करुन देतात. UGC च्या आदेशावरुन प्रत्येक विद्यापीठातील संशोधकांनी स्वत:चे प्रबंध डीजिटल स्वरुपात जमा करणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे देशातील ७० पेक्षा जास्त विद्यापीठ या सेंटरशी जोडली गेली आहेत. यामुळे उपभोक्ता आपल्या सोईनुसार प्रबंध बघू शकतो.

७. MPSC ज्ञानदिप :- हे एक सर्वसमावेश शैक्षणिक संकेत स्थळ आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत देण्यात येणाऱ्या परीक्षेची ऑनलाईन ई-बुक्स सुविधा सुरु केली आहे.

यामध्ये महाराष्ट्र नागरिक सेवा नियम, आकारीक दैनिक नोंदी तंत्रसाधने, चाचणी प्रश्नपत्रिका, वार्षिक नियोजन, महाराष्ट्र अधिनियम संकलित प्रश्नपत्रिका, सराव प्रश्नसंच, महत्वाची संकेत स्थळे, शासन निर्णय संग्रह त्याचबरोबर :- लोकराज्य मासिके, (MPSC) योजना

ऑडिओ नोटस, चालू घडामोडी अशी अनेक महत्वाची माहिती या संकेत स्थळावरुन सभासदांकरिता उपलब्ध करुन देण्यात येते.

'यशवंतराव चव्हाण ग्रंथालय' हे विद्यार्थी, संशोधक आणि विषयांशी संबंधित सभासद यांना पाहिजे असलेली माहिती ग्रंथालय नेटवर्क आणि ई-स्त्रोताच्या माध्यमातून गरजेनुसार उपलब्ध करुन देतात.

ब) नियतकालिके, (साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक, वार्षिक) बांधणी - विद्यार्थी, सभासद, उपभोक्ता यांना विषयाशी संबंधित संदर्भाकरीता नियतकालिके ही महत्वाची स्त्रोत मानली जातात. हा दृष्टीकोन समोर ठेवून उपयोगात येणारी नियतकालिकांची व्यवस्थित बांधणी करुन ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनानुसार प्रक्रिया करण्यात येते. आणि उपभोक्त्याच्या मागणीनुसार त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतात.

क) ग्रंथालय नेटवर्क : तंत्रज्ञान युगातील संगणकाचा शोध, दूरसंचार माध्यमाचा विकास यामुळे ग्रंथालयांचे जाळे ही जागतिक गोष्ट ठरली आहे. ग्रंथालये / माहिती केंद्रे / संशोधन केंद्रे व प्रलेखन केंद्रे इ. कार्यक्षम व तत्पर सेवा देण्यासाठी साधन वाटणीसाठी ग्रंथालय जाळ्याची निर्मिती करुन सेवा देण्यात येत आहे.

ग्रंथालय व माहिती जाळे हे ग्रंथसूचीय, सांख्यिकीय व माहिती संचाची प्रतिप्राप्ती करुन देण, साहित्याच्या याद्या तयार करणे, संकलित करणे, प्रादेशिक ग्रंथसूची तयार करणे, राष्ट्रीय ग्रंथ सूचीव्दारा ग्रंथ सूचीचे नियंत्रण ठेवणे, माहिती परिवर्तित करणे Downloding, आंतर ग्रंथालयीन मागण्या, प्रलेखाची देवघेव इ. गोष्टींचा उपयोग ग्रंथालय जाळयामार्फत करण्यात येतो.

राष्ट्रीय स्तरावरील जाळे :- ERNET, NICNET, INDONET, CALIBNET, INFLIBNET, OCLC यापैकी DELNET ही सुविधा उपभोकत्यांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. उर्वरित सुविधा उपभोकत्यांच्या गरजेनुसार आपण त्यांना उपलब्ध करुन देतो.

# माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी

## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीबद्दल आता सर्वांनाच श्रुत आहे. प्रबोधिनीने आपल्या कार्याची सक्षम १७ वर्षे पूर्ण केल्याचा गौरव मिळविला. या कार्यात प्रतिष्ठान व प्रबोधिनीचे सर्व सदस्य सहभागी आहेत. प्रबोधिनीला पुढे यशाच्या उच्च शिखरावर नेण्याचा त्यांचा मानस आहे.

माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी दोन पद्धतीचे उपक्रम राबवते. प्रथम राज्यस्तरीय व दुसरे राष्ट्रीय. राज्यस्तरीय अनेक अभ्यासक्रम व उपक्रम आपल्याकडे सुरु असतात. हे उपक्रम व अभ्यासक्रम चालविण्याकरिता प्रबोधिनीला अधिकाधिक नूतनीकरणाची आवश्यकता असते. ह्यासाठी आपली पात्रता सिद्ध करण्यात आपणांस सलग गेली तीन वर्षे यश मिळत आहे. आधिकाधिक मुलांना संगणकीय ज्ञान देऊन त्यांना 'पात्र' बनवणे हे प्रबोधिनीचे ध्येय आहे. अशा अनेक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून व प्रमाणपत्रांमुळे मुलांना उच्च शिक्षण व रोजगार सोपा होतो.

वेगवेगळे अभ्यासक्रम, शैक्षणिक कारकीर्दीमध्ये मार्गदर्शन, महिला विशेष अभ्यासक्रम तसेच गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विषय अशा बऱ्याच कार्यमालिका आपण चालवितो. ह्या अभ्यासक्रमामध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण कौतुकाची थापही देतो. MS-CIT हा प्रसिद्ध अभ्यासक्रम आपल्याकडे उत्तमरीत्या चालविला जातोच. त्याचबरोबर दहावी / बारावी विशेष काही उपक्रम उदा: सराव परीक्षासुद्धा आपण घेतो. मुलांना याचा खूप फायदा होताना आपल्याला दिसून येतो. यंदाच्या वर्षापासून आपल्याला ह्या सराव परीक्षा सातवीपासूनच्या विद्यार्थ्यांसाठी घेता येणार आहेत.

राष्ट्रीय स्तरावरचा C-DC प्रमाणित PG DC अभ्यासक्रम आपण प्रबोधिनीमार्फत चालवितो. हा अभ्यासक्रम अभियंता किंवा तत्सम पदवीधरांसाठीच उपलब्ध आहे. अभ्यासक्रमानंतर आपण विद्यार्थ्यांना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध करून देतो. ह्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन राष्ट्रीय पातळीवर होत असते. आपले विद्यार्थी ह्या अभ्यासक्रमात चांगली आघाडी घेत आहेत.

काही कौतुकास्पद उल्लेख खालीलप्रमाणे:-

१) प्रशांत करमरकर, ऑगस्ट २०१३ बॅचचा विदयार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात तिसऱ्या क्रमांकावर आला.

२) सुनीत कमलेश मेहता, ऑगस्ट २०१४ बॅचचा विद्यार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात तिसऱ्या क्रमांकावर आला.

३) इजाझ अहमद शेख, फेब्रुवारी २०१५ बॅचचा विद्यार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात पहिल्या क्रमांकावर आला.

४) वैभव हेमंत चुरी, ऑगस्ट २०१५ बॅचचा विदयार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात पहिल्या क्रमांकावर आला.

५) विजय कंसारा, ऑगस्ट २०१६ बॅचचा विद्यार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत मुंबई विभागात दुसऱ्या क्रमांकावर आला.

६) सचिन शेवरी, ऑगस्ट २०१६ बॅचचा

विद्यार्थी C-DC च्या अंतिम परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर lgorithm Data Structure या विषयावर पहिल्या क्रमांकावर आला.

७) प्रसाद परेरा, ऑगस्ट २०१४ बॅचच्या विद्यार्थ्याला मुंबई विभागातील सर्वोच्च रु. ४.८० लाख प्रतिवर्षाचे पॅकेज मिळाले.

८) त्याचप्रमाणे प्रतिक शिवडे, ऑगस्ट २०१६ बॅचच्या विद्यार्थ्याला मुंबई विभागातील सर्वोच्च रु. ७ लाख प्रतिवर्षाचे पॅकेज मिळाले.

या विद्यार्थ्यांसाठी आपण अभ्यासाबरोबर काही मनोरंजक कार्यक्रम देखील करत असतो. त्यामुळे, अभ्यासाचा प्रचंड ताण थोडा हलका होतो. सध्या आपली PG DC ऑगस्ट २०१६ चे विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंट म्हणजेच प्रबोधिनीतर्फे होणाऱ्या वेगवेगळ्या राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये आपले कौशल्य अजमावत आहेत. प्रबोधिनीला खात्री आहे की, या कार्यक्रमात त्या सर्व विद्यार्थ्यांना यश मिळेल.

ऑगस्ट २०१६ च्या प्लेसमेंटमेंटसाठी TI, GLOBL BUSINESS SERVICES, CYBGE, CPGEMINI 3I INFOTECH, MDOCS, SMRT STREM², SINT GOBIN इ. कंपनी उपस्थित होत्या. प्लेसमेंट चा हा उपक्रम अजून काही दिवस सुरु राहणार आहे.

ॲनिमेशन त्याचप्रमाणे वेब डिझाइन या क्षेत्रात विद्यार्थ्यांचा कल पाहता प्रबोधिनीच्या Diploma in multimedia Creations या कोर्सला महाविद्यालयीन विद्यार्थी त्याचप्रमाणे प्रशासकीय कर्मचारी आणि विपणन अधिकारी यांचा चांगला प्रतिसाद मिळतो

वेगवेगळ्या कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षण वर्ग चालविणे, हेच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीचे चे उद्दिष्ट आहे.

# विभागीय केंद्र, कऱ्हाड

## कार्यवृत्त

**स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची ३२ वी पुण्यतिथी कार्यवृत्त. २५ नोव्हेंबर २०१६**

स्व. यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांची ३२ वी पुण्यतिथी २५ नोव्हेंबर २०१६ रोजी भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. 'विरंगुळा' या साहेबांच्या निवासस्थानी त्यांच्या फोटोला श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला मा. आमदार बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आले. विभागीय केंद्र पुणे यांच्यावतीने स्व. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याबद्दल यशस्वी स्पर्धकांना विरंगुळ्यात आंमत्रित करण्यात आले होते. त्यांना पुणे केंद्रामार्फत श्री. अशोकराव चव्हाण व सचिव मोहनराव डकरे यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या पुण्यतिथी दिवशीच स्व. सौ. वेणूताई स्मृतिसदनात सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टची वार्षिक मिटिंग घेण्यात येते. या मिटींगसाठी मा. कलाप्पाण्णा आवाडे (इचलकरंजी) श्री. सुनिल पवार (सांगली) मा. विक्रमसिंह पाटणकर (पाटण), श्री. राजेश पाटील (जनता बँक, कऱ्हाड) मा. नंदकुमार बटाणे (कऱ्हाड शहर राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष) माननीय आमदार बाळासाहेब पाटील, चार्टंड अकौंटंट पी. एल. कुलकर्णी, कऱ्हाड पंचायत समितीचे अध्यक्ष देवराज पाटील, सह्याद्री सहकारी कारखान्याचे सर्व संचालक या सर्वांनी स्व. यशवंतरावजी तथा सौ. वेणूताई यांना पुष्पहार घालून अभिवादन केले.

दुपारी ४ वाजता यशवंतरावांच्या भव्य फोटोची चित्ररथातून सौ. वेणूताई ट्रस्ट ते स्व. यशवंतरावजी समाधी स्थळ (प्रितीसंगम) मिरवणूक काढण्यात आली. ''यशवंतरावजी चव्हाणसाहेब अमर रहे'' या घोषणेने शहर दुमदुमून गेले. यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कऱ्हाड व सौ. वेणूताई कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापिका, बंधू भगिनी आवर्जुन उपस्थित होत्या. समाधी स्थळावर प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव डकरे त्याचप्रमाणे श्री. मुकुंदरावजी कुलकर्णी (धनी) यांची भाषणे झाली. कार्यक्रमाची सांगता झाली.

**वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ९१ वी जयंती**

स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांची ९१ वी जयंती दि. २-२-२०१७ रोजी 'विरंगुळा' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, कऱ्हाड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट, कऱ्हाड या ठिकाणी साजरी करण्यात आली. विरंगुळ्यातील स्व. यशवंतराव चव्हाण व स्व. सौ. वेणूताई यांच्या फोटोला सह्याद्री व्याघ्र प्रकल्प (सातारा) च्या उपसंचालक डॉ. सौ. विनिता व्यास तसेच त्यांचे पती आय. ए. एस. अधिकारी श्री. भारत हाडा यांनी पुष्पहार अर्पण केले. केंद्राचे अध्यक्ष सन्माननीय आमदार बाळासाहेब पाटील यांनीही सौ. वेणूताई ट्रस्टमधील स्व. सौ. वेणूताई चव्हाण व स्व. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातले.

# विभागीय केंद्र, पुणे

## कार्यवृत्त

मा. राम प्रधान, विश्वस्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी आपल्या शासकीय सेवेमधील अनुभवांवर 'राजीव व सोनिया यांच्या सहवासात' हा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचा पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर यांच्या पुढाकाराने या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ श्री. सुशीलकुमार शिंदे माजी गृहमंत्री, भारत सरकार यांचे हस्ते आणि श्री. राजीव खांडेकर संपादक एबीपी माझा, श्री. लक्ष्मीकांत देशमुख, माजी सनदी अधिकारी, श्रीमती विनया खडपेकर, राजहंस प्रकाशन यांचे प्रमुख उपस्थितीत एस.एम. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशनच्या सभागृहात दिनांक १४ ऑक्टोबर २०१६ रोजी पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अंकुश काकडे, सचिव यांनी केले. श्री. शांतीलाल सुरतवाला कोषाध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, पुणे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप झाला.

दिनांक ३० ऑक्टोबर २०१६ रोजी प्रतिष्ठानच्या प्र पुणे केंद्राचा सालाबाद प्रमाणे दिवाळी पहाट कार्यक्रम झाला. या वर्षी दिवाळी पहाट पुरस्कार संगीत क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्री. श्रीधर फडके यांना श्री. बाबासाहेब पुरंदरे व प्रशांत जगताप (महापौर, पुणे) यांचे हस्ते देण्यात आला. दिवाळी पहाट कार्यक्रमात श्री. श्रीधर फडके यांनी जुन्या भावगीतांचा कार्यक्रम, श्री. जयंत नगरकर व सहकारी यांचा नगारा वादन व जुगलबंदी तसेच कु. आर्य काकडे यांचा एकांकिका व सोलो डान्स कार्यक्रम झाला. कार्यक्रमास १००० ते १२०० नागरीक उपस्थित होते.

### कृषी व सहकार व्यासपीठ

दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी बळीराजा मासिक व कृषी व सहकार व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी व तत्संबंधी ग्रामीण जनतेशी संबंधित विषयावर पुढील प्रमाणे व्याख्याने झाली :

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १/१०/१६ | ग्रामीण भागातील एक शैक्षणिक प्रयोग | प्रा. अनिल व्यास |
| ५/११/१६ | शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती | श्री. श्रीकांत ताम्हणकर |
| ३/१२/१६ | विक्रमी तूर उत्पादन | श्री. दिलीप पेंडसे |
| ७/१/१७ | जैविक कचरा आणि भविष्यातील इंधन | सौ. प्रियदर्शनी कर्वे |

दिनांक २५-११-२०१६ रोजी **'राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर निबंध स्पर्धा** या कार्यालयाने दि. ७-६-२०१६ च्या निवेदनानुसार पुणे शहर व जिल्ह्यातील सर्व शाळांना कळवून त्यांच्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांकडून निबंध मागविले होते. प्राप्त निबंधांची जिल्हावार माहिती पुढील प्रमाणे :

| क्र. | केंद्र | शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड) | ४३ | ** |
| २ | कऱ्हाड (सातारा, सांगली, कोल्हापूर) | १९ | ** |
| ३ | ठाणे (मुंबई, मुलुंड, ठाणे, पालघर) | ०७ | ** |
| ४ | नागपूर (नागपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, वर्धा, चंद्रपुर, गडचिरोली) | २५ | ** |
| ५ | पुणे | ३८ | ९४ |
| ६ | कर्नाटक राज्य | ०१ | ** |
| | **एकूण** | **१३३** | **९४** |

उपरोक्त सर्व शिक्षक/विद्यार्थी यांना सहभागाची व बक्षिसपात्र शिक्षक व विद्यार्थी यांना बक्षिसपात्र रक्कम, प्रमाणपत्र व ग्रंथभेट पुढीलप्रमाणे.

**बक्षिसपात्र**

| क्र. | बक्षिसपात्र क्रमांक | शिक्षकाचे नाव | जिल्हा | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | सौ. भवारी विमल कृष्ण | पुणे | १०००/- |
| २ | द्वितीय | श्री. माधव विश्वनाथ अंकलके | रत्नागिरी | ८००/- |
| ३ | तृतीय | सौ. वैषाली गोपाळ पष्टे | ठाणे | ५००/- |
| ४ | उत्तेजनार्थ | श्री. भारत चिंतामण बंडगर | कऱ्हाड (सातारा) | ३००/- |
| ५ | उत्तेजनार्थ | सौ. कंचन अमोद सोलापूरकर | पुणे | ३००/- |
| ६ | उत्तेजनार्थ | सौ. अद्‍वेता उमराणीकर | पुणे | ३००/- |
| ७ | उत्तेजनार्थ | सौ. सविता दत्तात्रय बर्वे | रत्नागिरी | ३००/- |
| ८ | उत्तेजनार्थ | श्रीमती चित्रा लिपारे | डहाणू (ठाणे) | ३००/- |
| ९ | उत्तेजनार्थ | सौ. निता तुळशीदास माळी | मुलुंड (मुंबई) | ३००/- |
| १० | उत्तेजनार्थ | श्री. ज्ञानेश्वर गंगाजी लोटकर | यवतमाळ (नागपूर) | ३००/- |

**बक्षिसपात्र विद्यार्थी**

| क्र. | बक्षिसपात्र क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | शाळेचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | तृप्ती संतोष सोनावणे | ७ वी | श्री. भोकराई माता विद्यालय | ५००/- |
| २ | द्वितीय | सुषमा किसन कानगुडे | ९ वी | विश्वकर्मा विद्यालय | ४००/- |
| ३ | तृतीय | नैन्सी संजय राय | ७ वी | ज्ञानदीप इंग्लिश मिडीअम स्कूल | ३००/- |
| ४ | उत्तेजनार्थ | अनुजा संदीप शेलार | ९ वी | जी. एम. आय. कन्याशाळा खडकी | २००/- |
| ५ | उत्तेजनार्थ | प्रीती लालजी प्रजापती | ९ वी | ज्ञानदीप इंग्लिश मिडीअम स्कूल | २००/- |
| ६ | उत्तेजनार्थ | अंजली पाटील | ७ वी | सोली ए पुनावाला स्कूल | २००/- |
| ७ | उत्तेजनार्थ | सलोनी पठारे | ७ वी | सोली ए पुनावाला स्कूल | २००/- |
| ८ | उत्तेजनार्थ | साक्षी कांबळे | ८ वी | सोली ए पुनावाला स्कूल | २००/- |
| ९ | उत्तेजनार्थ | नियती मुळे | ९ वी | सोली ए पुनावाला स्कूल | २००/- |

दिनांक १८/१२/२०१६ रोजी सहकार विभागाच्या प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच सहकार विभागाच्या लेखापरिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यामध्ये बहुसंख्येने अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते व नवीन कायदाकानून व संस्थांच्या पोटनियमावर सखोल चर्चा करून संस्थांना कशाप्रकारे सहाय्य करण्यात येईल याचा उहापोह झाला.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व नोटबंदी या विषयावर प्रतिष्ठानतर्फे दिनांक २४/१/२०१७ रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रास पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी डॉ. संजय भोसले उपस्थित होते. उपस्थित सदस्यांनी विचारलेल्या शंकांचे त्यांनी योग्य प्रकारे निरसन केले.

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि नोटाबंदी

केंद्रीय शासनाच्या आर्थिक समावेशाच्या विकास धोरणानुसार जास्तीत जास्त नागरिकांच्या आणि त्यातल्या त्यात आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोकांच्या आर्थिक गरज शक्यतो प्रस्थापित आर्थिक संस्थांमार्फत अशा लोकांना परवडेल अशा दराने भागविणे तसेच असा पतपुरवठा, अन्य सोयी सुविधा (उदा. विमा, इत्यादी) वेळेवर आणि पुरेसा असणे अभिप्रेत आहे. (केंद्रीय बजेट २००७-०८)

### पक्षपाती वागणूक

शेतकऱ्यांच्या बाबतीत आणि प्राधान्याने छोट्या, मध्यम शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्याबाबतीत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राज्य सहकारी बँका मोठा भार उचलत असतात. नॅशनल सँपल सर्व्हेच्या ५९व्या आवर्तनानुसार ६५.५०% (एक हेक्टर खालील) लहान शेतकरी यांना शासन प्रस्थापित वा अन्य यंत्रणांमार्फत म्हणजेच सावकार, नातेवाईक अगर मित्रमंडळी वा इतरांमार्फत पतपुरवठा होतो. एक ते दोन हेक्टर मालकीचे क्षेत्रफळ असलेल्या पत पुरवठा होणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी १८.१०% आहे. तर दोन ते चार हेक्टर मालकीचे क्षेत्रफळ असलेले आणि पतपुरवठा घेणारे असे शेतकरी १०.६४% आहेत. थोडक्यात अशा चार हेक्टरपेक्षा कमी मालकीचे क्षेत्रफळ असणाऱ्या व पतपुरवठा घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९४.२४% आहे. या शेतकऱ्यांना जो पतपुरवठा होतो, त्यातील मोठा भाग हा सर्वसाधारणपणे सहकारी संस्था (२०.२%), बचतगट यांचा असतो. (जे एकप्रकारे सहकाराचे दुसरे रूप आहे. आणि त्यांना सहकारी बँका व अन्य बँका यांच्यामार्फत पतपुरवठा होतो.) अशाप्रकारे भारतातील शेतकऱ्यांना २०.२% अधिक ७.३% म्हणजे, २७.५% पतपुरवठा हा सहकारी यंत्रणेमार्फत होतो. याउलट फक्त १७.४% पतपुरवठा हा व्यापारी बँका आणि विभागीय ग्रामीण बँका यांच्यामार्फत होतो. तसेच २०११-१२ च्या आकडेवारीनुसार ३.०९ कोटी शेतकऱ्यांनी व त्यापैकी ६७ लाख शेतकऱ्यांना, पहिल्यानेच सहकारी पतपुरवठा करण्यात आला. या उलट याच वर्षी व्यापारी बँकांनी २.५५ कोटी शेतकऱ्यांना व ग्रामीण बँकांनी ०.८२ कोटी शेतकऱ्यांना पतपुरवठा केला. त्यातील नव्याने पतपुरवठा केलेले शेतकरी अनुक्रमे २१ लाख व ९ लाख होते. असे असतानाही नोटाबंदीबाबत निर्णय घेताना मात्र सरकारने व रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांना पक्षपाती वागणूक दिली असल्याचे स्पष्टपणे आढळून येते. कारण, त्यांना ८ नोव्हेंबर २०१६ च्या सुरवातीच्या चार दिवसांनंतर जुन्या नोटा घ्यायला बंदी करण्यात आली.

### अंतिम अधिकार

सहकारी बँकांच्या प्रशासकीय निर्णयाबाबत जरी राज्याच्या वा केद्रांच्या निबंधक सहकारी संस्था

यांचा अधिकार अंतिम असला तरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व नागरी सहकारी बँका यांच्या आर्थिक व्यवहारांबाबत अनुक्रमे राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचाच अधिकार अंतिम असतो. रिझर्व्ह बँकेमार्फत राष्ट्रीय बँका, व्यापारी बँका, खाजगी बँका यांची ज्याप्रमाणे तपासणी होते, तशीच तपासणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बाबतीत, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेमार्फत होते. तर नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अशी तपासणी घेत असते. त्या तपासणीचे दोष दुरुस्ती अहवाल सादर होतात. त्याशिवाय नेहमीची वैधानिक रिटर्न ही (माहितीपत्रके) या सहकारी बँकांकडून रिझर्व्ह बँक व राष्ट्रीय कृषी विकास बँकेला जात असतातच. मग एवढे सगळे सोपस्कार असतानाही सहकारी बँकांना ही दूजाभावाची वागणूक का?

या बाबींचा विचार करता रिझर्व्ह बँकेला ज्याप्रमाणे सहकारी बँकांव्यतिरिक्त अन्य बँकांबाबत जसे प्रशासकीय व आर्थिक असे दोन्हीही अधिकार आहेत, तसे हवे असावेत. त्यामुळे तर सहकारी बँकांना ही सावत्रपणाची वागणूक मिळत नसेल ना?

### घटना दुरुस्ती

हवे तर केंद्राने सहकारी बँकांबाबत ९७ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे बदल करून त्यात ज्याप्रमाणे सहकारी बँकांबाबत आर्थिक निर्णयाबाबत बँकींग रेग्युलेशन ॲक्टच्या तरतुदी बंधनकारक केल्या आहेत, त्यात सुधारणा करून प्रशासकीय आणि आर्थिक अशा दोन्ही बाबतीत सहकारी बँकांवर बंधने लादावीत. आजही रिझर्व्ह बँक अधिकारी व राज्य निबंधक सहकारी संस्था या काही प्रशासकीय बाबतींत रिझर्व्ह बँकेशी विचार विनिमय करूनच (उदा. प्रशासक वा ऋणपरिशोधक नेमणे) पुढील प्रक्रिया पार पाडीत असतात. याशिवाय अशा क्रियांच्या बाबतीत जेव्हा उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात राज्य निबंधकांच्या कार्यवाहीवर वादविवादानुरूप प्रश्नचिन्ह उभे राहते, तेव्हा रिझर्व्ह बँक अधिकारी, निबंधकांच्या मदतीला कोर्टात येतातच. त्यामुळे, एक प्रकारे या कारवाईला स्थानिक राजकीय स्वरूपाच्या कार्यवाहीचा वास न आल्यामुळे न्यायसंस्थाही अशा कारवाईबाबत निबंधकांना (सहकारी संस्था) योग्य तो न्याय देण्यास तत्पर असल्याचे दिसून येते.

याउलट अन्य सहकारी संस्थांबाबत मंत्रालयातून जेव्हा मा. सहकार मंत्र्याच्या आदेशावर उच्च न्याालयात प्रश्न उद्भवतो. तेव्हा राजकीय दृष्टीकोनाचा विचार केलाजात असावा असे वाटते. कारण, अशा निर्णयांना पुष्कळदा कोर्टाकडून सुरुवातीच्या सुनावणीत स्थगिती मिळत असते.

### दोन दादले

दुसरे म्हणजे, मागे अनेक वर्षे नागरी सहकारी बँका या आपल्याला दोन नियंत्रक आहेत; एक निबंधक सहकारी संस्था आणि दुसरा म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया. असा प्रश्न हिरीरीने मांडत असत. या द्विकेंद्री सत्ता व्यवस्थेमुळे नागरी सहकारी बँकांना त्रास होत असणार हे नक्कीच. असा त्रास सहकारी संस्थांना होऊ नये म्हणून सहकारी बँकावर एकछत्री अंमल असण्याचा विचार होण्यास हरकत नाही. कारण, अशी दुहेरी व्यवस्था नसती तर ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व नागरी सहकारी बँक आर्थिक दुर्बलांसाठी काम करतात, मल्ल्यांसारख्यासाठी काम करत नाहीत त्यांच्यावर व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या दुर्बलांच्या सहकारी संस्थांवर नोटबंदीसारख्या शासन निर्णयामुळे रसातळाला जायची वेळ आली, ती बहुश: आली नसती, असे वाटते.

### निबंधकाचे काम

मग निबंधक सहकारी संस्था यांची या सहकारी बँकांबाबतची भूमिका काय असावी हा प्रश्न येतोच.



# पद्मविभूषण

पुरस्कार मिळाल्याबद्दल

**मा. शरदचंद्रजी पवारसाहेब**

यांचे मन:पूर्वक अभिनंदन..!

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई




विभागीय केंद्र, लातूरच्या वतीने आयोजित स्व. यशवंतराव चव्हाण यांचा ३२वा स्मृतीदिन कार्यक्रम. उपस्थित – मा. डॉ. सर्जेराव निमसे, माजी कुलगुरु स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, डॉ. जर्नादन वाघमारे, डॉ. गोपाळराव पाटील, हरीभाऊ जवळगे व इतर



विभागीय केंद्र, लातूर आयोजित 'ज्येष्ठ नागरिक मेळावा'







७ व्या यशवंत आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते झाले. त्यावेळी चित्रपट सृष्टीत दिलेल्या योगदानाबद्दल जेष्ठ सिने अभिनेते श्री. पंकज कपूर यांना सन्मानित करण्यात आले.




कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम तर्फे 'विधी साक्षरता कार्यशाळा' – डोंबिवली, जिल्हा ठाणे




कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम तर्फे 'विधी साक्षरता कार्यशाळा' – कळंबोली, नवी मुंबई




'सृजन' उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसोबत
संयोजक सौ. सुप्रियाताई सुळे




विभागीय केंद्र, कोकण, शारदा वाचनालय, बदलापूर
आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम.
व्याख्यात्या श्रीमती अनुराधा गोरे



विभागीय केंद्र, कऱ्हाड - स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या
स्मृतीस अभिवादन



'राजीव आणि सोनिया यांच्या सहवासात'...
श्री. राम प्रधान यांच्या पुस्तकाचे प्रकाशन
उपस्थित : श्री. अंकुश काकडे, श्री. संजीव खांडेकर,
मा. श्री. सुशिलकुमार शिंदे, श्री. राम प्रधान, श्री. अजित
निंबाळकर, श्री. लक्ष्मीकांत देशमुख आणि सौ. विनया
खडपेकर



पुणे केंद्र - दिवाळी पहाट सन २०१६ कार्यक्रमात उपस्थित
मान्यवर नागरिक




विभागीय केंद्र कोकण, पेडली येथे
मोफत आरोग्य तपासणी शिबीर




'विवेकानंदांची खरी ओळख' – या व्याख्यानाप्रसंगी वक्ते डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर. उपस्थित – डॉ. गिरीश गांधी, डॉ. कोमल ठाकरे, सौ. रेखा दंडिगे–घिया, डॉ. प्रमोद मुनघाटे, रमेश बोरकुटे




विभागीय केंद्र, ठाणे, आयोजित यशवंत व्याख्यान.




विभागीय केंद्र, ठाणे, यशवंत व्याख्यानमाला कार्यक्रमात ज्येष्ठ अणुतज्ञ डॉ. अनिल काकोडकर मार्गदर्शन करताना



'स्वयंपाक घरातील रसायनशास्त्र': महाराष्ट्र महिला व्यासपीठ आयोजित विनामूल्य व्याख्यान



यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार २०१६ : त्याप्रसंगी डॉ. गिरीश गांधी, व्यासपीठावर उपस्थित डावीकडून सौ. रेखा दंडिगे–घिया, मधुकरराव भावे, डॉ. राजाभाऊ देशमुख, डॉ. आशिष सातव, डॉ. कविता सातव, सौ. प्रगती पाटील, रमेश बोरकुटे, मो. सलीम




अपंग हक्क विकास मंच आयोजित 'दिव्यांग व्यक्ती कायदा २०१६ : एक दृष्टीक्षेप' कार्यशाळेत सहभागी प्रतिनिधी



अपंग हक्क विकास मंचाची पुणे येथे झालेली दिव्यांग कायद्याबाबतची कार्यशाळा.




विभागीय केंद्र, अंबाजोगाई आयोजित ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम




विभागीय केंद्र, अंबाजोगाई यशवंतराव चव्हाण स्मृती दिन कार्यक्रम



सुवर्णगाथा ५०: राज्यस्तरीय शालेय निबंध व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यास पुरस्कार देताना मा. शरदचंद्रजी पवार



महिला व्यासपीठ आयोजित सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग





माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीमधील विद्यार्थी





विज्ञानगंगा – 'हल्ली फुलांना वास का येत नाही?' या विषयावर व्याख्यान.
वक्ते : मा. नागेश टेकाळे यांचे स्वागत करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे व सहभागी



वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान विभागांतर्गत विद्यार्थ्यांचे हवामानबदल विषयक परिषद



वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान विभागांतर्गत वनस्पतीविषयक प्रश्नमंजूषेत सहभागी विद्यार्थी




विभागीय केंद्र, नाशिक 'जग बदलणारे जिनियस' या विषयावरील व्याख्यान. मार्गदर्शक – मा. अच्युत गोडबोले, डॉक्टर दीपा देशमुख.



नववर्षाची पूर्वसंध्या – गझलनवाज भीमराव पांचाळे यांची नाशिक येथे मैफिल



'नाशिक रन फॉर पीस' – मॅरेथॉन २०१७ प्रसंगी पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल, धावपटू कविता राऊत, विश्वास ठाकूर व इतर




शिक्षण विकास मंचच्या शिक्षण कट्टा उपक्रमांतर्गत 'माध्यमिक स्तरावरील विषययोजना' या विषयावर चर्चा पार पडली. त्यावेळी डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. माधव सूर्यवंशी व चर्चासत्रासाठी उपस्थित इतर मान्यवर.





'विज्ञानगंगा' उपक्रमांतर्गत आयोजित 'कृष्णविवर' या विषयावरील चर्चासत्र व्याख्यानात मा. प्रा. जे. एस. यादव व सोबत विद्यार्थी वर्ग




जेष्ठ पत्रकार निळू दामले सोलापूर विद्यापीठ येथील कार्यशाळेत विद्यार्थी व पत्रकार यांच्यासोबत चर्चा करताना. सोबत कुलुगुरू डॉ. एन. एन. मालदार



यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करताना युनूसभाई शेख, धर्मा भोसले, दिनेश शिंदे, शरद प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अनिल पानसे आदी उपस्थित होते.



सोलापूर विभागीय केंद्रातर्फे आयोजित आरोग्य शिबीर



विभागीय केंद्र, अहमदनगर: गरजूंना उबदार कपड्यांचे वाटप करताना श्री. प्रशांत गडाख व इतर




विभागीय केंद्र, अहमदनगर व जिल्हा विधी सेवा समिती तसेच नेवासा तालुका वकील संघ जागतिक मानवाधिकार दिन आयोजित कार्यक्रम. याप्रसंगी नेत्रदात्यांच्या कुटुंबियांना स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी न्यायमूती. मा. एस. एस. शिंदे साहेब, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगर चे सचिव मा. गडाख.



विभागीय केंद्र, अहमदनगर: मुरघास तयार करताना चारा कोणत्या पक्तेचा असावा हे श्री. ज्ञानेश्वर पवार शेतकऱ्यांना समजावून सांगताना.

त्याबाबत सहकारी संस्थांची भारतात स्थापना होण्यासाठी जे अहवाल केंद्र शासनाने १९०४ च्या कायद्यापूर्वी लक्षांत घेतले, त्यातील निकोल्सन कमिटी अहवालात म्हटल्याप्रमाणे निबंधकांचे काम, सहकारी संस्थांचा मार्गदर्शक, त्यांचा तत्वज्ञ आणि मित्र असा असावा असे वाटते. त्याशिवाय सहकाराचा टिळा लावणाऱ्या या संस्थांवर रिझर्व्ह बँकेच्या एकछत्री अमलामुळे काही दडपशाही; मग ती खालच्या अधिकाऱ्यांच्या स्तरावर वा तात्विक स्तरावर उदा. सहकारी मूल्ये आणि तत्त्वे यांचे उल्लंघन आणि खाजगी बँकांप्रमाणे नफ्याला अवाजवी महत्त्व देऊन सभासद ग्राहकांना लुटण्यात होत असेल तर त्याविरुद्ध संबंधित उच्चस्तरापर्यंत अशा तक्रारी नेऊन त्यांची सोडवणूक आणि जरूर वाटल्यास अशा बाबी कोर्ट केसेसमध्ये अशा सभासदांना राज्य शासकीय प्रशासकीय मदत देण्यासाठीही करण्याचा विचार व्हावा. जेणेकरून खरा सहकार जो सभासद हितासाठी अपेक्षित आहे, ते अशा चेक्स आणि बॅलन्सी (Cheque balances) मधून कार्यरत राहिल. कारण निबंधकांना सहकारी संस्थांचे हित हे पहावेच लागेल. नाहीतर खाजगी बँका आणि सहकारी बँका यामध्ये काही फरकच उरणार नाही. शिवाय केंद्र व राज्य आणि केंद्रीय यंत्रणेखालील संस्था आणि राज्य यंत्रणेखालील सहकारी संस्था यांच्यामधील सत्ता समतोल राखण्यासही मदत होऊ शकेल.

### आत्मशोध व हेराफेरी

सहकारी बँका, सहकारी संस्था यांनीही आत्मशोध व आत्मबोध घेणे आवश्यक आहे. कृषी पत पुरवठा संस्थांमध्ये पतपुरवठ्यात जुन्याचे नवे करण्याचा रोग लागला होता. जुने कर्ज प्रत्यक्षांत कर्जदाराने न फेडता, संस्था सेक्रेटरी, चेअरमन, जिल्हा बँक शाखा व्यवस्थापक, व्यवस्थापक बँकेवरील संस्था प्रतिनिधी यांच्या एकप्रकारे संगनमताने थोडीशी रक्कम प्रत्यक्षात वापरून व ती प्रत्यक्षात जमा घेऊन नावे वाढीव रक्कम कर्जरूपाने दिल्याचे दाखवून व अशा रकमांची अनेक वेळा आर्वतने कागदावर दाखवून प्रत्यक्षात वसुली नसताना वसुलीचे फुगलेले आकडे दाखविले जात. अशाच प्रकारे जुन्याचे नवे करून प्रत्यक्षात भारतातील आठ हजार कोटीच्या जुन्या नोटा चार दिवसात सुरुवातीच्या चार दिवसात जिल्हा मध्यवर्ती बँकात जमा झालेल्या नोटातून (यात काही काळा पैसा आलाच हे आपण अशा बँकावर पडलेल्या छाप्यामुळे जाणतोच) लक्षात घेता या बँकात असलेला बऱ्याच अंशी नातेवाईक वा अन्य स्टाफ कडून कागद रंगवून अशी हजार कोटीचे वेगवेगळ्या छोट्या मोठ्या व प्रामुख्याने ज्यांचे अकाऊंटस् थकबाकीमुळे वा अन्य कारणांमुळे बंद आहेत ज्यांची देणी सोसायटीस्तरावर जमा दाखवून बँकेच्या स्तरावरही जमा घेऊन वा अन्यप्रकारे अशाच प्रकारची पण नियमांत बसणारी क्लृप्ती करून जुन्या कर्जाचे नवे कर्ज करण्याच्या चलाखीप्रमाणेच जुन्या नोटा (काही प्रमाणात काळापैसा) नवा करून घेतला जाऊ शकेल, असे तर रिझर्व्ह बँकेचे निदर्शनास आले नसेल? वा अधिकाऱ्यांना तशी शंका आली नसेल? त्यामुळे तर हे झाले नाही ना? काहीही असो; आता ३० डिसेंबर २०१६ झालीच आहे. यापुढे येत्या वर्षांत तरी १ जानेवारी २०१७ पासून सहकारी बँकांना रिझर्व्ह बँक पूर्णपणे, नेहमी सारखे काम करण्यास हातभार लावील अशी आशा करूया. कारण खासगी बँका आणि व्यापारी बँकांमधूनही काळा पैसा बदलून कोट्यावधी रुपयांची हेराफेरी झाल्याचे दिसले. तेव्हा सहकारी बँकांनाच अशा साठी धारेवर धरणे न्यायोचित होईल, असे वाटत नाही.

### नुकसान भरपाई

जिल्हा सहकारी बँकांचे त्यांच्याकडील जमा झालेल्या जुन्या नोटा बदलून न मिळाल्यामुळे फार मोठे नुकसान झाले आहे. डॉ. मिनाक्षी राजीव, रिझर्व्ह बँक चेअर प्रोफेसर, इन्स्टीट्यूट फॉर सोशल अँड इकॉनॉमिक चेंज, बेंगळूर यांच्या दिनांक ५ मार्च २०१६ च्या इंडियन

सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन, पुणे ७ च्या ३१ व्या अधिवेशनातील भाषणाप्रमाणे (छापील भाषण तक्ता क्र. २) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या संस्थांमार्फत व अन्य घटकांमार्फत २०१२-२०१३ अखेर जे कर्ज उचलले त्यापैकी ४५.७% कर्ज हे सहकारी संस्थांमार्फत उचलले, याउलट व्यापारी बँका आणि विभागीय ग्रामीण बँकांमार्फत फक्त १४.३% कर्ज उचलले. २०१६ मध्ये यात फार मोठी तफावत संभवत नाही. यावरून नोटाबंदीचा फटका सहकाराच्यादृष्टीने प्रगत असलेल्या महाराष्ट्रासारख्या राज्यातील शेतकऱ्यांना जोरात बसला, उलट जम्मू काश्मिन, बिहार, झारखंड अशा सहकारदृष्ट्या अप्रगत राज्यांना ज्याचा सहकारी पतपुरवठा अनुक्रमे फक्त २.१%, २.२%, ३.७% असा होता, त्यांना फारच कमी प्रमाणात बसला. तेव्हा आतातरी नव्या २०१७ या वर्षांत त्याची भरपाई होईल अशी न्यायोचित आशा आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या मोठ्या प्रमाणात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे जुन्या नोटा जमा झाल्या आहेत, त्या बँकांपैकी ज्यांच्याबाबत तक्रारी नाहीत, त्यांना ताबडतोब दिलासा दिला जावा. ज्या जिल्हा बँकांतील अधिकारी आणि पदाधिकारी यांनी काळापैसा चलनांत आणण्यास हातभार लावला त्यांचेवर कारवाई व्हावी मात्र अशा बँकातील प्रामाणिक ग्राहकांवर अन्याय होणार नाही यासाठी जरूर तर राज्य शासकीय यंत्रणेची तपासणीसाठी मदत घेऊन अशा बँकातील ग्राहकांना/सभासदांना दिलासा मिळू शकेल अशी कारवाई व्हावी. तपासणी झालेली प्रकरणे पाहून ती सँपल चेक समजून, प्रपोर्शनेट रकमेच्या बँकेत जमा जुन्या नोटा त्वरित बदलून देता येतील का? याचा विचार व्हावा. शासनाने जुन्या (कायदेशीरपणे काळा पैसा नसलेल्या) नोटा जिल्हा बँकेकडून जमा न करून घेतल्यामुळे व्याजाचे व अन्य झालेले नुकसान तसेच सलग्न सहकारी संस्थेचे नुकसान भरून देणे, सहकारी चळवळीने केलेले काम लक्षात घेता, न्यायोचित होईल असे वाटते.

# विभागीय केंद्र, नागपूर

## कार्यवृत्त

- **विवेकानंदांची खरी ओळख : व्याख्यानः दि. १ ऑक्टोबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. १ ऑक्टोबर २०१६ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे 'विवेकानंदांची खरी ओळख' या विषयावर अतिशय वस्तुनिष्ठ व वास्तव मांडणी करणारे महाराष्ट्रातील विचारवंत व लेखक डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी मा. डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

- **'धुक्यात हरवली वाट' कादंबरी प्रकाशन समारंभ : रविवार दि. २ ऑक्टोबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने लेखिका मा. प्रा. विजया मारोतकर यांच्या 'धुक्यात हरवली वाट' या कादंबरीचा प्रकाशन समारंभ रविवार दि. २ ऑक्टोबर २०१६ रोजी सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते व कादंबरीचा प्रकाशन समारंभ सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती सुप्रियाताई अय्यर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून नागपूर नागरिक सहकारी बँक, नागपूरचे अध्यक्ष श्री. संजय भेंडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लेखिका सौ. विजयाताई ब्राह्मणकर उपस्थित होत्या.

- **एक पहल मुस्लिम भाईयोंके लिए : व्याख्यान : बुधवार दि. ५ ऑक्टोबर २०१६,**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने बुधवार दि. ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे 'एक एक पहल मुस्लिम भाईयों के लिए' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. के. बी. करीम, पूर्व निदेशक, इन्सिटट्युट ऑफ सायन्स तथा आय.ए.एस. कोचिंग सेंटर व श्री. अब्दुल मजीद पारेख, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते.

**'पान, पाणी नि प्रवाह' : दि. १४ ऑक्टोबर, २०१६**

'स्वतःला फालतू समजण्याची गोष्ट' या पहिल्याच कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेल्या श्री. अवधुत डोंगरे या तरूण पत्रकार व लेखकाची 'पान, पाणी नि प्रवाह' (प्रफुल्लता प्रकाशन, पुणे) ही नवी आगळीवेगळी कादंबरी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान

विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने या कादंबरीचे प्रकाशन, कादंबरीची चिकित्सा आणि वाचकांची प्रत्यक्ष लेखकभेट असा एक कार्यक्रम शुक्रवार दि. १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपुर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व 'खेळकर' या गाजलेल्या कादंबरीचे लेखक प्रा. रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि सामाजिक कार्यकर्ते व लेखक श्री. अमिताभ पावडे यांनी 'पान, पाणी नि प्रवाह' या कादंबरीची आस्वादक चिकित्सा केली व कादंबरीचे लेखक श्री. अवधूत डोंगरे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. प्रमोद मुनघाटे, सचिव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांनी भूषविले.

- **डॉ. प्रमोद शर्मा सत्कार समारंभ : रविवार दि. १६ ऑक्टोबर, २०१६**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उर्दू विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद शर्मा यांची समन्वयक, कला अधिष्ठातापदी निवड झाल्याबद्दल उर्दू विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १६ ऑक्टोबर २०१६ ला सकाळी १०.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे डॉ. सिद्धार्थविनायक काणे, कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या शुभहस्ते हा सत्कार समारोह संपन्न झाला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी तसेच हिंदी साहित्याचे ज्येष्ठ विचारवंत डॉ. ओमप्रकाश मिश्रा हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **पं. प्रभाकर धाकडे गुरूजी सत्कार समारंभ : मंगळवार दि. २५ ऑक्टोबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर आणि कलावैभव, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने सुरमणी पंडित प्रभाकर धाकडे गुरूजी यांच्या ६८ व्या जन्मदिनानिमित्त मंगळवार दि. २५ ऑक्टोबर १६ रोजी सायं. ६.०० वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, शंकरनगर चौक, नागपूर येथे सत्कार समारंभ व सूरमणी पं. प्रभाकर धाकडे यांचा स्वरबद्ध नजराणा 'स्वरप्रवाह' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य मा. डॉ. दिलीप डबीर, राष्ट्रीय कीर्तनरत्न कीर्तनकलायोगी होते. तसेच मा. डॉ. नितीन राऊत, माजी गृह राज्यमंत्री, मा. डॉ. मिलींद माने, आमदार उत्तर नागपूर, मा. श्री. समीर सराफ, उपाध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व मा. डॉ. प्रमोद मुनघाटे, सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर हे अतिथी म्हणून उपस्थित होते.

- **स्व. अरूणाताई पवार - चवरे स्मृतीदिन: दि. २२ नोव्हेंबर, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूर व अरूणोदय, साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रख्यात कवयित्री स्व. अरूणाताई पवार - चवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला नवोदितांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेला बक्षिस वितरण समारंभ मंगळवार दि. २२ नोव्हेंबर, २०१६ रोजी सायं. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या

अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी 'आकांक्षा प्रकाशना'च्या मा. अरूणा सबाने ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

- **'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' वितरण समारंभ : दि. २५ नोव्हेंबर, २०१६**

२५ नोव्हेंबर ही यशवंतराव चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी. या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मागील वर्षीपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तिला रोख रूपये पंधरा हजार, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते.

२०१६ चा पुरस्कार धारणीसारख्या अतिदुर्गम भागात तेथील आदिवासींच्या विकासासाठी कार्य करणारे डॉ. आशिष सातव व डॉ. कविता सातव यांना देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार सोहळा शुक्रवार दि. २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे ऊर्जामंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री नागपूर मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ पत्रकार मधुकरराव भावे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजाभाऊ देशमुख होते.

याप्रसंगी पुणे केंद्राच्या वतीने आयोजित 'राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील निबंध स्पर्धेतील विभागीय कार्यक्षेत्रातील शिक्षकांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे देण्यात आली.

- **'झलकारी' दोन अंकी हिंदी नाटक : दि. १५ डिसेंबर, २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, विदर्भ गौरव प्रतिष्ठान व राष्ट्रभाषा सभा नागपूर विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'झलकारी' या दोन अंकी हिंदी नाटकाचा शुभारंभ ना.श्री. विनोद तावडे, सांस्कृतिक मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जा मंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री नागपूर, रा.काँ.पा. चे अध्यक्ष आ.श्री. सुनील तटकरे, विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे, आ.श्री. हेमंत टकले यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार दि. १५ डिसेंबर, २०१६ रोजी सायं. ६.०० वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा.डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते.

- **सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा : दि. २५ डिसेंबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग व नागपूर महानगरपालिका (शिक्षण विभाग), रायसोनी ग्रुप व अक्षरभूषण मधुकरराव भाकरे स्मृती प्रतिष्ठान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने अक्षरभूषण मधुकरराव भाकरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित आंतरशालेय सुवाच्य हस्ताक्षर स्पर्धा - २०१६ पारितोषिक व शिक्षक जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि. २५ डिसेंबर, २०१६ रोजी सकाळी ९.३० वाजता शिक्षक सहकारी बँक सभागृह, गांधीसागर, नागपूर येथे श्री. सचिन देशपांडे (कलाकार 'काहे दिया परदेस'), श्री.भाऊ काणे

(द्रोणाचार्य पुरस्कार पुरस्कृत) यांच्या शुभहस्ते, महापौर श्री. प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. सुनील रायसोनी, अध्यक्ष रायसोनी ग्रुप, श्री. गोपाल बोहरे, शिक्षण सभापती व श्री.कर्नल ए. बी. गुरूगं यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या स्पर्धेतील पारितोषिक विजेते-गट अ- वर्ग १ ते ४ प्रथम श्रीया बिसेन (यशोदा मराठी प्राथमिक), द्वितीय दीक्षिता मुटे (नवयुग), तृतीय ईशा मोंढे (विभा गांधी प्राथमिक शाळा), प्रोत्साहनपर-आयुषी मालाधरे (यशोदा), रिया काळे (भवन्स भगवानदास), आंचल चहुके (विभाताई गांधी), सिया माकडे (हिंदु ज्ञानपीठ), स्मिता जनबंधू (श्री सत्यसाई विद्यामंदिर), - वर्ग ५ ते ७ - प्रथम प्राजक्ता मुंडे (पं. बच्छराज व्यास विद्यालय), सुहानी ढोके (विश्वास माध्यमिक), तृतीय धनश्री मोटे (जामदार शाळा) प्रोत्साहनपर - मयंक कुळकर्णी (सोमलवार निकालस), प्रिती भौमिक (दीनानाथ), जान्हवी येळणे (भगवानदास पुरोहित), वैष्णवी डोंगरे (मेजर हेमंत जकाते), तनुश्री बावीसकर (श्रा सत्यसाई) वर्ग ८ ते १० - प्रथम हर्षल तलमले (विश्वास माध्यमिक) द्वितीय ऐश्वर्या सारडा (स्व. दौलतराव ढवळे विद्यालय), तृतीय पायल मरसकोल्हे (सिद्धेश्वर) प्रोत्साहनपर साक्षी बाईवार (सोमलवार रामदासपेठ) निक्की घरडे (श्री दादासाहेब धनवटे नगर विद्यालय), आकांक्षा वैद्य (केशवनगर माध्यमिक), श्रेया चिमणकर (लोकांची शाळा), गणेश ताठे (सी.पी.ॲन्ड बेरार, रविनगर) इ. विद्यार्थ्यांचा समावेश होता.

- **'कविता में शब्द-विन्यास' या विषयावर व्याख्यान : दि. ७ जानेवारी, २०१७**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शनिवार दि. ७ जानेवारी, २०१७ रोजी दुपारी ३.३० वाजता राष्ट्रभाषा सभा संवाद कक्ष, शंकरनगर चौक, नागपूर येथे 'कविता में शब्द-विन्यास' या विषयावरील डॉ. सक्सेना यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कवितांमध्ये शब्दांचा वापर, मात्रांचे नियम, शब्दांचे वजन, उच्चारण या आधारावर मात्रांची स्थिति व लयात्मकता व इतर संबंधित बिंदूवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. सागर खादीवाला होते.

# विभागीय केंद्र, कोकण

## कार्यवृत्त

**ऑक्टोबर २०१६**

१. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र व रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ – रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर 'ज्येष्ठ नागरिक दिना' निमित्त भारत शिक्षक मंडळ, रत्नागिरीच्या कॅ. सुभाषचंद्र ठाकूर सभागृहामध्ये दि. १ ऑक्टोबर २०१६ रोजी ज्येष्ठांसाठी सायं. ४.०० वा. आनंद मेळावा घेण्यात आला. या आनंद मेळाव्यापूर्वी ज्येष्ठ नागरिकांची पुरूष व महिला अशा दोन गटामध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने भारत शिक्षण मंडळाच्या क्रीडांगणावर चालण्याची स्पर्धा घेण्यात आली.

चालण्याच्या स्पर्धेला ज्येष्ठांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. या स्पर्धेमध्ये पुरूष गटातून दोन व महिला गटातून एक क्रमांक काढण्यात आला. विजयी स्पर्धकांना रोख रक्कम व 'गीतारहस्य शताब्दी गौरव' हे पुस्तक देण्यात आले.

पुरूष गट प्रथम – श्री. अजित सावंत, द्वितीय – साईनाथ दानवे. महिला गट प्रथम – श्रीमती सुलक्षणा सावंत.

आनंद मेळाव्याची सुरूवात शतकवीर श्री. महादेव वांदरकर गुरूजी, श्री. राजाभाऊ लिमये – अध्यक्ष, कोकण विभागीय समिती, डॉ. श्रीरंग कद्रेकर – अध्यक्ष, रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघ व इतर मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. ज्येष्ठ नागरिकांसाठी संगीताचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. सौ. वैजयंती पाटील, जायंटस् ग्रुपचे श्री. संजय पाटणकर व श्री. प्रवीण डोंगरे यांनी किशोर कुमार, रफी यांची जुनी गाणी सादर करून ज्येष्ठांच्या तारूण्यातील स्मृती जाग्या केल्या आणि टाळ्यांच्या गजराने आनंद मेळावा साजरा केल्याचे सांगून ज्येष्ठांनी कुटुंबात राहताना आपले जीवन संतुष्ट मनाने सदा वावरावे व मुलाबाळांना आनंदात मार्गदर्शन करावे म्हणजे, वृद्धाश्रमाचा विचारही करावा लागणार नाही, असे सुचवत या आनंदमेळाव्यात सहभाग घेतल्याबद्दल विभागीय समिती अध्यक्ष राजाभाऊ लिमये यांनी आभार मानले. ज्या जेष्ठ नागरिकांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत, व ज्यांच्या लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा ज्येष्ठ नागरिकांचा रत्नागिरी शहर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर काही ज्येष्ठांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थित ज्येष्ठांसाठी प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम घेण्यात आला. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी ज्येष्ठ उत्स्फूर्तपणे सहभाग घेत होते. उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना शुभेच्छा देऊन आनंद मेळावा कार्यक्रमाला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय समितीच्या सदस्या श्रीमती जानकीताई बेलोसे, जिल्हा समिती सदस्य श्रीमती प्राची शिंदे, सर्वश्री. कृ. आ. पाटील, विवेक सावंत, शहाजीराव खानविलकर व ज्येष्ठ नागरिक भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

२. देवरूख येथील आठल्ये–सप्रे महाविद्यालयातील मराठी वाङमयमंडळ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यामाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध कलांची ओळख व्हावी या हेतूने 'सृजन' या उपक्रमांतर्गत दिनांक ४ ऑक्टोबर २०१६ रोजी देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमती अरूंधती पाध्ये इंग्लिश

मिडीयम स्कूलच्या ११ वी, १२ वीच्या विद्यार्थ्यांना निवेदन कौशल्ये व सादरीकरणाची विविध अंगे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमांचे निवेदन, सादरीकरण, संहितालेखन कशा प्रकारे केले जाते, विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करताना कोणती कौशल्ये आवश्यक असतात याबाबत आकाशवाणीवरून 'घरकुल' या कार्यक्रमातून विविध विषयांवर सादरीकरण करणाऱ्या डॉ. वर्षा फाटक यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करून दाखविली.

३. दिनांक ५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'सफर आवाजाची' या कार्यशाळेत श्री. सुरज जाधव यांनी आवाजाचे चढउतार, विशिष्ट आवाजाची नक्कल भूमिका व विषयाप्रमाणे उच्चारण व आरोह अवरोहन केले जाणारे बदल कसे असावेत याची प्रात्यक्षिके विद्यार्थ्याना करून दाखविली. पथनाट्यामध्ये विविध भूमिका कशा सादर केल्या जातात, त्यावेळी केली जाणारी भूमिकांची अदलाबदल आवाजातून प्रभावीपणे कशी व्यक्त करता येते याबाबतही विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले.

४. दिनांक ६ ऑक्टोबर रोजी 'पैंजणांचे रूणझुण' या कार्यक्रमात देवरूख येथील ललित कला अकादमीच्या प्रा. श्रीमती शिल्पा भिंडे - मुंगळे (अलंकार कथ्थक) यांनी कथ्थक नृत्यांची ऐतिहासिक परंपरा सादरीकरणाचे विषय, सादरीकरणातील महत्वाच्या गोष्टी, लय, ताल, पदन्यास यांचा उत्कृष्ट मेळ याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी गुरुवंदना, ठुमरी, मुजरा, लावणी, पढन यांचे सादरीकरण केले. सादरीकरण करताना नवरसांची प्रचिती कशी येते, अभिनयातून नृत्याविष्कारातून या भावभावना कशा व्यक्त करता येतात याची प्रात्यक्षिके सादर केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या कार्यक्राचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या संयोजिका प्रा. डॉ. फाटक यांनी विविध कार्यक्रमांच्या आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला. प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी अशा प्रकारे विद्यार्थ्याच्या कलागुणांना वाव देणारे, त्यांना व्यासपीठ मिळवून देणारे कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जावेत, असे उपक्रम विद्यार्थ्याना शैक्षणिक प्रगतीसाठी पूरक ठरतात, कोणताही कला जगण्याचा खरा आनंद मिळवून देते तेव्हा आवडत्या कलेची जोपासना करा, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्रा. डॉ. फाटक यांनी आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

५. १५ ऑक्टोबर हा भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन संपूर्ण भारतात 'वाचना प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला गेला. ज्ञानसंपन्न आणि माहितीसमृद्ध समाज घडविण्यासाठी तसेच व्यक्तिमत्व विकास आणि भाषा विकासासाठीही वाचन संस्कृतीचे संवर्धन गरजेचे आहे. म्हणूनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभाग, शारदा वाचनालय - बदलापूर आणि युवराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यामाने 'लेखक वाचक भेट' या कार्यक्रमाअंतर्गत लेखिका वीरमाता अनुराधा गोरे या बदलापूर वाचकांच्या भेटीचा आल्या होत्या. 'देशाचे संरक्षण व आपली जबाबदारी' या विषयावर बोलताना त्यांनी भारताने लढलेल्या लढाया, त्यात आलेले यश अपयश, त्याची कारणे यावर प्रकाश टाकला. आज नागरीकरण प्रचंड वाढत आहे. त्याचे परिणाम दुष्परिणाम बरेच आहेत. या सर्वांचा देशाच्या व्यवस्थेवर पडणारा भर आणि त्या अनुषंगाने आपली या देशाचे सजग नागरिक म्हणून काय जबाबदारी आहे यावर देखील त्यांनी मार्गदर्शन

केले.

विश्वनाथ पाटील यांनी या कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले तर सचिन पाटील यांनी आभार मानले.

६. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय समितीचे रायगड जिल्हा सदस्य श्री. अभिजित देशमुख यांच्या नेतृत्व व मार्गदर्शन तसेच 'सात्वी ॲन्ड सात्वी कंपनी'चे अधिकारी रोहन कुलकर्णी यांच्या संकल्पेतून रायगड जिल्ह्यात एक आगळा वेगळा दीपोत्सव साजरा करण्यात आला. सामाजिक देवाणघेवाण या उद्दीष्टाला समोर ठेवून रेनो इंडिया या कार कंपनीचे काही ग्राहक तसेच 'सात्वी ॲन्ड सात्वी कंपनी'चे काही युवक युवती यांनी रायगड जिल्हा सुधागड तालुक्यातील भेलीव आदिवासी वाडीत दि. २६ ऑक्टोबर २०१६ रोजी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. मुंबई शहरातील पाहुण्यांचे स्वागत पारंपारिक कातकरी बाजा वाजवून, आरती ओवाळून करण्यात आले. भेलीव आदिवासी वाडी ही पताक्यांनी सजवली गेली, कंदील वाटण्यात आले, घराघरात पणत्या लावण्यात आल्या, संपूर्ण वाडी प्रकाशमय करण्यात आली. सायंकाळी आदिवासी बांधवांनी त्यांचे आदिवासी लोकनृत्य सादर केले, ज्यात मुंबईच्या पाहुण्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

१२ वी उत्तीर्ण झालेल्या हिरा पवार या आदिवासी मुलीला शब्दकोश, माहितीपर पुस्तके देवून गौरविण्यात आले. सौरऊर्जेवर चालणारे एकूण ७५ कंदील आदिवासी बांधवांना वाटण्यात आले. या कार्यक्रमाला अंदाजे ३०० आदिवासी बांधव उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरता रवी पवार, सचिन झुंजारराव, निलेश देखमुख, मंगेश देशमुख, बबलू देशमुख, सुरेश पवार यांनी सिंहाचा वाटा उचलला. यासारखे उपक्रम तालुक्यात वारंवार करण्याची आवश्यकता असून जेणेकरून तालुक्यात दळणवळण वाढेल, पर्यटनाच्या माध्यामातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल व स्थलांतरासारख्या मोठ्या समस्येवर आळा घातला येईल, असे मत अभिजित देशमुख यांनी कार्यक्रमानंतर व्यक्त केले.

**नोव्हेंबर २०१६**

१. यशवंत चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र जिल्हा रायगड, गोरक्ष महिला मंडळ मुंबई आणि श्रीनाथ प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील आदिवासी वाडी पेडली व मुळशी तालुका सुधागड येथे बालदिनाचे औचित्य साधून दिनांक १३ नोव्हेंबर २०१६ रोजी आदिवासी बांधव व भगिनींना वापरण्यायोग्य जुन्या साड्या, शर्टपॅट, लहान मुलांचे कपडे व दिवाळी फराळ खाऊ वाटून बालदिन आणि दिवाळी साजरी केली.

श्रीनाथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. विनोद शेगर, सचिव मा. धनजी शिंदे, खनिजदार मा. उमेश शेगर, मा. रमेश लगस व गोरक्ष महिला मंडळ यांनी महिनाभर मुंबई शहरात घराघरात जाऊन लोकांकडून जुन्या वापरण्यायोग्य अशा ४०० साड्या, १५० शर्ट पॅन्ट, १०० मुलांचे कपडे, २०० पाकिटे फराळ जमा करून रायगड जिल्ह्यातील कातकरी आदिवासी बांधवांना वाटले. २०० आदिवासी बंधू भगिनींनी आपले पारंपारकि नृत्य सादर केले.

कार्यक्रमाची संकल्पना व संयोजन श्री. अनिल शिंदे यांनी केली. कार्यक्रमासाठी पेडली गावातील ज्येष्ठ तळेकर गुरूजी, श्री. मेने सर, पोलीस पाटील देशमुख, युवा कार्यकर्ते पप्पू खामकर, संदीर ठाकूर, प्रणीत कडू, शुभम मेने यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन मा. माजी सरपंच विजयदादा जाधव, निलेश देशमुख, रवी पवार, सचिन झुंजारराव या चव्हाण प्रतिष्ठानच्या

कार्यकर्त्यांनी केले. आदिवासी बांधवांच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान खंबीरपणे उभे राहील, असे मत रायगड जिल्ह्याचे कोकण विभागीय समितीचे सदस्य श्री. अभिजित देशमुख यांनी व्यक्त केले.

२. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कृषी व सहकार व्यासपीठ, पुणे यांच्या वतीने शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या 'राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या निबंध स्पर्धेसाठी कोकण विभागातील विजेते व सहभागी शिक्षकांचा रोख रक्कम, प्रमाणपत्र व ग्रंथभेट देवून सन्मान करण्यात आला. स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे विजेते श्री. माधव अंकलगे व उत्तेजनार्थ सौ. सविता बर्वे यांनी मनोगत व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, कृषी व सहकार व्यासपीठ, पुणे केंद्राचे आभार मानले.

आपल्या वर्तनावरून आपले व्यक्तीमत्त्व ठरत असते. आपले व्यक्तीमत्त्व कसे घडू शकते हे चव्हाण साहेबांचे चरित्र वाचल्यानंतर समजू शकते. चव्हाण साहेबांचे विचार त्यांचा इतिहास आपल्या सर्वांना समजावा यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने विविध कार्यक्रम केले जातात, असे श्री. विनायक हातखंबकर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.

कार्यक्रमाचे व्याख्याते इम्तियाज सिद्धीकी यांनी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे कर्तृत्व व सामाजिक जीवन उलगडण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र म्हणजे संतांची भूमी. अनेक नररत्नांमधले बहुमूल्य असे आदरणीय व्यक्तीमत्त्व म्हणजे यशवंतराव चव्हाण असे त्यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण हे राज्याचा, देशाचा विकास करण्याच्या जिद्दीने पेटले होते. माझ्या माध्यामातून इथल्या सामान्य माणसाचा, महाराष्ट्राचा विकास साधायचा आहे, हा विचार करून त्यांनी उच्च पदावर असताना विविध धाडसी निर्णय घेतले. सिद्धीकी यांनी आपल्या व्याख्यानामध्ये विविध कवितांचा समावेश करून चव्हाण साहेबांचे कार्य, त्यांचे जीवन अतिशय सुंदररित्या विद्यार्थ्यासमोर उलगडून दाखविले.

माजी न्यायाधीश श्री. भास्करराव शेटे यांनी चव्हाण साहेबांचे बालपणीचे तसेच त्यांच्या वैयक्तीक आयुष्यातील काही प्रसंग सांगून वातावरण भावनिक केले. त्याचप्रमाणे चव्हाण साहेबांना जर समजून घ्यायचे असेल, तर त्यांची पुस्तके जास्तीत जास्त वाचली पाहिजेत, असेही सांगितले.

कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, महाराष्ट्राला अग्रेसर राज्य घडविण्यात यशवंतरावांचा मोलाचा वाटा होता. राजकारणापलीकडचे नेतृत्व असल्यानेच त्यांनी साहित्य संस्कृती महामंडळ निर्माण केले. सुसंस्कृत समाजकारणी व नेतृत्व करणारे व्यक्तिमत्व म्हणून ते सुपरिचित होते. यशवंतराव चव्हाण राज्यातील एकमेव माणूस जो केंद्रात मंत्रीपदावर होता मात्र दिल्लीतील राजकारण यशवंतरावांच्या स्वभावाला मिळते जुळते नव्हते. कोकण विभागीय समितीचे सदस्य श्री. प्रकाश काणे यांनी उपस्थितांचे आभार मानले तर प्रा. चंद्रमोहन देसाई यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे जीवन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी 'यशवंतराव चव्हाण जीवन प्रवाह' हे पुस्तक महाविद्यालयाला भेट म्हणून देण्यात आले.

या कार्यक्रमाला कोकण विभागीय समिती उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, सदस्या श्रीमती जानकीताई बेलोसे, जिल्हाध्यक्ष अभिजित खानविलकर, जिल्हा समिती सदस्य डॉ. अनिल जोशी, शहाजीराव, खानविलकर, जयवंत विचारे, सदस्या युगंधरा राजेशिर्के, प्राची शिंदे, तसेच महाविद्यालयातील पठाण सर व इतर शिक्षकवर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते.

३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभाग ठाणे जिल्हा, मराठी विज्ञान परिषद व युवराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६

नोव्हेंबर २०१६ रोजी सायं. ५ वा. 'विज्ञानगंगा' या मालिकेतील 'विज्ञान ऑलिम्पियाड' या विषयाबद्दल डॉ. रेखा वर्तक यांचे व्याख्यान बदलापूर येथील कात्रप परिसरातील श्रीजी सेंटर येथे झाले.

एखाद्या विषयाबद्दल केवळ माहिती असण्यापेक्षा त्या विषयात ज्ञान मिळणे जास्त महत्त्वाचे असते, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाची सुरूवात २६/११ च्या दहशतवादी कृत्यात वीरमरण आलेल्या शहिदांना श्रद्धांजली वाहून झाली. तसेच समारोप राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. प्रियंका आशिष दामले यांनी केले व सूत्रसंचलन, व आभार प्रदर्शन सचिन पाटील यांनी केले.

२६ नोव्हेंबर २०१६ भारतीय संविधान दिनानिमित्त सॅम मित्र मंडळ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभाग, जिल्हा रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने मु. पेडली, ता. सुधागड, जिल्हा रायगड येथे मोफत आरोग्य चिकीत्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. खारघर (नवी मुंबई) येथील नामांकित येरळा रूग्णालयातील तज्ञ डॉक्टर डॉ. प्रशांत जगताप व टीम तसेच सुधागड पी. एस. सी. मधून डॉ. मुळे व सौ. डॉ. भिडे व टीम रूग्णांच्या तपासणीसाठी उपस्थित होते. डायबेटीस, ब्लडप्रेशर, मुळव्याध, हर्निया, अॅपेंडीक्स, मासिक पाळी, गर्भ पिशवी विकार, गर्भवती महिला, डोळे तपासणी इ. विकारांवर तपासणी केली गेली. 'भारतीय संविधान दिना' चे औचित्य साधून शिबिरादरम्यान उपस्थित प्रत्येक व्यक्तीला भारताचे प्रीॲम्बल दिले गेले व सामूहिक वाचनाच्या माध्यामातून 'समानता व बंधुत्वाचा' संदेश देण्याचा प्रयत्न सॅम मित्र मंडळाचे अध्यक्ष सचिन खामकर यांनी केला.

**डिसेंबर २०१६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्राच्यावतीने दि. २६ डिसेंबर २०१६ रोजी स. रा. देसाई अध्यापक विद्यालय, रत्नागिरी येथे सकाळी ११.३० वा. 'शिक्षणकट्टा' या उपक्रमांतर्गत व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

गोगटे जोगळेकर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक तसेच मानस समुपदेशन केंद्राचे प्रमुख मा. श्री. माणिकराव बाबर यांनी विद्यार्थ्यांना 'सकारात्मक दृष्टीकोन व व्यक्तिमत्व' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला स. रा. देसाई अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य श्री. कुंभार सर, कुलकर्णी मॅडम, जोपले सर, रावराणे सर, पाटील सर व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जिल्हा समिती सदस्या श्रीमती प्राची शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांचे शुभहस्ते दिपप्रज्वलन करून चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकमध्ये प्रा. कुंभार यांनी यशवंतराव चव्हाणांचे विचार तळागाळात पोहोचविण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने सातत्याने होत असते असे सांगितले.

मा. प्रा. माणिकराव बाबर यांनी 'सकारात्मक दृष्टीकोन व व्यक्तिमत्व' या विषयावर डी. एड. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'व्यक्तिमत्त्व म्हणजे काय?' हे सांगितले. 'विचार, भावना व वर्तन यांना एक पॅटर्न म्हणजे व्यक्तिमत्त्व' व्यक्तिमत्व घडवणे हे आपल्याच हातात असते. व्यक्तिमत्व म्हटले की, बाह्यांगाला जास्त महत्त्व दिले जाते. आत काय आहे, यापेक्षा बाहेर काय दिसते याला आपण महत्त्व देतो. परंतु, व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य देखावा नाही. आत्मविश्वास, संवाद, पोशाख, देहबोली, समाजामध्ये मिसळणे, नेतृत्व, ऐकणे, आत्मपरिक्षण हे सर्व अलंकार

जेव्हा आपण परिधान करू, तेव्हाच आपले व्यक्तिमत्व उठून दिसेल, असे प्रा. बाबर सर यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

शिक्षक विद्यार्थ्यांपुढे आदर्श असतात. समोर बसलेले सर्व विद्यार्थी हे भावी शिक्षक असल्याने त्यांनी स्वतःची आचारसंहिता ठेवली पाहिजे. आपला विद्यार्थी जेव्हा उच्च पदावर जातो, मोठा होतो त्यावेळी शिक्षकाला सर्वात जास्त आनंद होत असतो. शिक्षक हे सैनिकांप्रमाणे असतात. त्यांनी आजूबाजूला होत असलेल्या घडामोडींबाबत सतर्क राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीला नेहमी चालना देणारे प्रश्न विचारले पाहिजेत. शिक्षकांना एकही चूक करण्याचा अधिकार नाही. त्यांनी नेहमी हसतमुख राहिले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. गोष्टी व उदाहरणे देऊन चर्चेद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांना आपले व्यक्तिमत्व सकारात्मक दृष्टीने कसे खुलवावे हे सांगितले. विद्यार्थ्यांनींही चर्चेमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानले.

**जानेवारी २०१७**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, कोकण विभागीय केंद्र – जिल्हा पालघरच्यावतीने श्री. पुण्यक्षेत्र टेंभाडे येथील मंदिराच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुभाष पाटकर यांच्या हस्ते नारळाचे रोप लावण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. प्रल्हाद कदम यांनी पुढाकार घेतला. रोपांचे संगोपन मंदिराच्या विश्वस्तांतर्फे केले जाईल असे त्यांनी सांगितले. यावेळी पालघर येथील प्रकाश पाटील, कमलाकर पाटील, चंद्रकांत पाटील, सुभाष पाटील, भगवान यामाने आदी मान्यवर उपस्थित होते.



# विभागीय केंद्र, औरंगाबाद

**कार्यवृत्त**

### चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत 'उदाहरणार्थ नेमाडे' चित्रपटाचे प्रदर्शन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एम.जी. एम. जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडी या मासिक उपक्रमात दि. १७ ऑक्टोबर २०१६ रोजी 'उदाहरणार्थ नेमाडे' हा चित्रपट एम.जी.एम. परिसरातील रुख्मिणी सभागृहात दाखविण्यात आला.

'उदाहरणार्थ नेमाडे' हा मराठी चित्रपट आपल्या खास शैलीद्वारे रसिकांना खिळवून ठेवणारे ज्ञानपीठ विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या जीवनाविषयी असल्याने रसिकांची मोठी गर्दी झाली होती. अक्षय इंडीकर दिग्दर्शित 'उदारहणार्थ नेमाडे' या चित्रपटाच्या निमित्ताने रसिकांना डॉ. नेमाडे यांच्या जीवनप्रवासच अनुभवता आला. शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने होणारे स्थलांतर, भेटलेली, अनुभवलेली माणसे, देशी परंपरा यासह डॉ. नेमाडे यांच्या जगण्यातील जिवंतपणा यात पकडण्यात आला. गंभीर प्रश्नांना त्यांनी साधेपणाने दिलेले उत्तर, मिश्किलपणा, आपल्या विधानावरील ठामपणा रसिकांचे लक्ष वेधून घेतो. यावेळी रसिकांनी त्यांच्या संवादावर टाळ्यांचा पाऊस पाडला.

चित्रपट संपल्यानंतर दिग्दर्शक अक्षय इंडीकर यांनी रसिकांसोबत संवाद साधत डॉ. नेमाडे यांच्या जीवनावरील विविध पैलू उलगडून दाखविले. रसिकांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे, प्रा. अनुया दळवी, प्रा. वीरा राठोड, नीलेश राऊत, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव, श्रीकांत देशपांडे, मंगेश निरंतर, गणेश घुले, महेश अचिंतलवार उपस्थित होते.

### यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त एमजीएमच्या आईन्स्टाईन सभागृहात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रतापराव बोराडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र या छोट्या खेड्यातून सुरू झालेला यशवंतराव चव्हाणांचा जीवनपट त्यांनी व्याख्यानात उलगडून सांगितला. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री कसा धावला, हे सांगताना त्यांनी अनेक दाखले दिले. विरोधकांना आपलंस केलं. देशाच्या विकासात कधीही राजकारण आणलं नाही. सातत्याने सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून ध्येयधोरणे आखली, त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. सामान्य कुटुंबात जन्म होऊन उपपंतप्रधान पदासह केंद्रीय संरक्षणमंत्री, गृहमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पेलणाऱ्या यशवंतराव चव्हाणांचे आयुष्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्रतापराव बोराडे यांनी यावेळी केले.

यावेळा मंचावर प्राचार्या डॉ. रेखा शेळके, प्रा. डॉ. आशा देशपाडे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश बारोटे यांना केले, तर आभार सुहास तेंडुलकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहूल तायडे, ओंकार तेंडुलकर, मोहित जाधव, अजिंक्य गुठे, मंगेश काळवने, गौरव पवार आदींनी परिश्रम घेतले.

## चित्रपट चावडी मासिक उपक्रमात 'वन ट्वेंटी सेव्हन अवर' चित्रपटाचे प्रदर्शन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एम.जी. एम. जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडी या मासिक उपक्रमात सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक डॅनी बोयल यांचा २०१० साली प्रदर्शित झालेला 'वन ट्वेंटी सेव्हन अवर' हा चित्रपट शनिवार, दि. १० डिसेंबर २०१६ रोजी, सायं. ७ वाजता एम.जी.एम.च्या आईन्स्टाइन सभागृहात दाखविण्यात आला.

चित्रपटाची कथा साहसी गिर्यारोहक अरॉन रॅलस्टोन याच्याभोवती फिरते. हायकिंग करताना तो त्यांच्या हायकर मित्रांसोबत एका अंडरग्राऊंड तलावाचा शोध लावतो. त्यात यथेच्छ पोहल्यानंतर पर्वतावर चढाई करताना दुर्घटना घडून तो दोन दगडांच्या फटीत अडकतो. कुठलीच मदत मिळण्याची आशा नसताना हिम्मत न हरता मोठ्या शिताफिने तो या संकटावर मात करून तेथून स्वतःची सुखरूप सुटका करून घेतो. हे करत असताना त्याला येणाऱ्या अडचणींच्या एकशे सत्तावीस तासांचे अत्यंत वास्तववादी चित्रण यात केले आहे.

## ना. धों. महानोर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्कार सोहळा व कवीसंमेलनाचे आयोजन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान -मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि महात्मा गांधी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त कवी संमेलनाचे आयोजन सोमवार, दि. ९ जानेवारी २०१७ रोजी रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर येथे सायं. ५.३० वाजता आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रसिद्ध समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या हस्ते श्री. ना. धों. महानोर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मा. सौ. सुलोचना महानोर यांचा पैठणी देऊन शशिकला बोराडे, आशा भांड, जयश्री गोडसे, प्राचार्य रेखा शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी एमजीएम चे सचिव मा. अंकुशराव कदम, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रतापराव बोराडे, बाबा भांड, भाऊसाहेब राजळे, रा. रं. बोराडे, नीलेश राऊत, सुबोध जाधव उपस्थित होते.

प्रारंभी कविसंमेलनात कवी लक्ष्मीकांत तांबोळी, इंद्रजित भालेराव, रवी कोरडे, सुचेता खल्लाळ आणि प्रा. दासू वैद्य यांनी सहभाग घेतला. यावेळी कवींनी नावीन्यपूर्ण कवितांचे सादरीकरण करीत रसिकांना खिळवून ठेवले. गंभीर, विचार करायला लावणाऱ्या कविता समोर ठेवतानाच काही रचनांवर हशा आणि टाळ्याही मिळविल्या. प्रा. तांबोळी यांनी बावन्न दरवाजांत वसलेल्या 'शहर-ए-औरंगाबाद'ची कविता सादर केली. 'दयाळा एवढे द्यावे' असे म्हणत त्यांनी मानवी प्राक्तन कथन केले. प्रा. इंद्रजित भालेराव यांनी

आपल्या 'जन्म' कवितेतून मातीचे महत्त्व सांगितले. या कवितेला रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. माय-लेकीचे नाते उलगडणाऱ्या कवितेचे भालेराव यांनी गायन केले. प्रा. दासू वैद्य यांच्या 'ऐकत राहतो', 'संदर्भग्रंथ' आणि 'मॉल' या कवितांनी रंगत आणली. प्रा. रवी कोरडे यांच्या 'एक दुरडी फिरत राहिली कृतज्ञतेने' या कवितेने सर्वांनाच भावूक केले. विठ्ठलाला खडे बोल सुनावणारी कविता सुचेता खल्लाळ यांनी सादर केली. महानोर यांच्या गीतांचे यावेळी कविता वतनी, विश्वनाथ दाशरथे यांनी सादरीकरण केले. 'श्रावणाचं ऊन मला सोसेना' हे गीत कविता वतीन यांनी तर 'सूर्यदेवा नितनेमाने उगवावे' हे गीत श्री. दाशरथे यांनी सादर केले. या गीतांना प्रल्हाद शेळके यांनी बासरीवर साथसंगत केली. कविसंमेलन आणि महानोर यांच्या गीतांचे सादरीकरण असलेली ही मैफल चांगलीच रंगतदार ठरली. सूत्रसंचालन श्रीकांत उमरीकर यांनी केले. सुरवातीला अजिंक्य गुठे व विजय शिंपी निर्मित महानोर यांच्यावरील लघुपट दाखवण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने साहित्यरसिक उपस्थित होते.

## चित्रपट चावडी मासिक उपक्रमात 'वेस्ट इज वेस्ट' चित्रपटाचे प्रदर्शन

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबाद आणि एम.जी. एम. जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणाऱ्या चित्रपट चावडी या उपक्रमाअंतर्गत गुरूवार, दि. २६ जानेवारी २०१७ रोजी संध्या ६.३० वाजता एम. जी. एम. च्या आइन्स्टाइन सभागृहामध्ये सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक डॅनी बोयल यांचा २०१० साली प्रदर्शित झालेला इंग्रजी चित्रपट 'वेस्ट इज वेस्ट' दाखविण्यात आला.

या सिनेमाचे प्रोड्युसर लेसली वूडवीन, तर लेखक अयुब खान-दीन हे आहेत. ही ब्रिटीश कॉमेडी असून चित्रपटामध्ये अकीब खान, ओम पुरी, लिंडा बसटे, रॉबर्ट पघ, राज बन्साली या कलाकारांच्या प्रमुख भुमीका आहेत. पाच वर्ष आधी प्रदर्शित झालेला 'इस्ट इज इस्ट' या सिनेमाचा हा दुसरा भाग असून, या सिनेमामध्ये जॉर्ज खानच्या भूमिकेत ओम पुरी आहेत. जॉर्ज हा एक पाकिस्तानी मुस्लिम असून तो इंग्लंडमध्ये राहतो. त्याची बायको ब्रिटिश असते, तर त्याची सात मुले ही ब्रिटनमध्ये जन्माला आलेली आणि स्वतःला ब्रिटिश समजणारी असतात. पाकिस्तानी संस्कारातील जॉर्ज, त्याची ब्रिटिश बायको व ब्रिटिश वातावरणात वाढलेली, स्वत:ला ब्रिटिश समजणारी सात मुले यांच्यातील जनरशेन गॅप विनोदी अंगाने दाखविणारा हा सिनेमा आहे.

प्रतिष्ठानच्या औरंगाबाद केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोरे कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे, सचिव मुकुंद भोगले, निलेश राऊत, अपर्णा कक्कड, रेखा शेळके, सुबोध जाधव, गणेश घुले, मंगेश निरंतर, श्रीकांत देशपांडे, त्रिशुल कुलकर्णी, प्रतिक राऊत, निखिल भालेराव आदी यावेळी उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, लातूर

## कार्यवृत्त

### रविवार दि. २ ऑक्टोबर २०१६

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त लातूर विभागीय केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरीक आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रथम महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस उपस्थित पाहूणे व विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर विचारवंत, विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे होते तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून लातूर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोक कुकडे तसेच लातूर शहरातील प्रख्यात ज्येष्ठ विधीज्ञ हरिश्चंद्र रेड्डी, मा. श्री. सि. ना. आलुरे गुरुजी आदी मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक कुकडे यांचे याप्रसंगी ज्येष्ठ बंधू भगिनींना मोलाचे मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षासह सर्वच ज्येष्ठांनी आपले विचार मांडत असताना ज्येष्ठांनी वयोवृद्ध माता बंधूंनी आहे, त्या परिस्थितीत समाधान मानून जीवन जगावे असा सूर सर्व मान्यवरांच्या तोंडून ऐकावयास मिळाला. डॉ. कुकडे म्हणाले, ज्येष्ठांनी विचाराबरोबरच आपल्या दैनंदिन जीवनात खूप विचारपूर्वक जीवन जगणे अगत्याचे आहे. हे वय म्हणजे लहान मुलासारखे असते. याप्रसंगी विभागीय केंद्राच्या वतीने लातून शहरामध्ये सर्व जातीपंथासाठी काम करणाऱ्या काही ज्येष्ठ बंधू भगिनींचा सत्कार विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे व मान्यवर पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सर्वांचे आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

### गुरुवार दि. १३ ऑक्टोबर २०१६ संत

### तुकडोजी महाराज स्मृतिदिन

विभागीय केंद्राच्यावतीने शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर विभागीय केंद्राचे संचालक तथा शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे तर प्रमुख पाहुणे प्रसिद्ध विचारवंत, विभागीय केंद्राचे नांदेड जिल्हा संघटक प्रा. उत्तम सूर्यवंशी होते. विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामीण साहित्याबद्दल याप्रसंगी आपले विचार मांडले. प्रा. उत्तम सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मानले.

### शुक्रवार दि. २१ ऑक्टोबर २०१६

विभागीय केंद्राच्या वतीने 'इस्लामचे खरे स्वरूप'या विषयावर व्यापक विचारमंथन व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष जनार्दन वाघमारे तर प्रमुख पाहुणे सोलापूरचे प्रसिद्ध विचारवंत, साहित्यिक प्रा. फकरूद्दीन बेन्नूर होते तर दुसरे पाहुणे मराठवाड्यातील प्रसिद्ध विचारवंत डॉ. सूर्यनारायण रणसुभे व श्रीमती तस्मिन पटेल होते. याप्रसंगी प्रा. डॉ. फकरूद्दीन बेनूर यांनी इस्लाम धर्माच्या जवळ जाण्यासाठी कुण्या इतर मध्यस्थाची गरज नाही. इस्लाम धर्मात माणूसकी आहे. त्या माणूसकीचे पालन व्हावे असे अध्यक्षासह सर्वच मान्यवरांच्या तोंडून ऐकावयास मिळाले.

**रविवार दि. १३ नाव्हेंबर २०१६**

विभागीय केंद्र लातूर व अखिल भारतीय अध्यापक सभा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजच्या शेतकऱ्याच्या आत्महत्या का व कशा?' याबद्दल चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्रचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार होते. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या तत्त्वज्ञान परिषदेच्या अध्यक्षस्थानी निवड झाल्याबद्दल श्री. कुभांर यांचा या कार्यक्रमाअगोदर यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ॲड. मनोहरराव गोमारे, माधवराव पाटील, ॲड. टी. एन. भालेराव यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वरील सभेचे लातूर जिल्हा अध्यक्ष तथा विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की, आज तत्त्ववेत्ते, विचारवंत यांनी ग्रामीण भागातील गाव, वाडीवस्तीवर जाऊन शेतकरी शेतमजूर यांना आपल्या विद्वत्तेच्या ज्योतीचा प्रकाश देऊन होत असलेल्या हजारे शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबतील? या राज्यातील व देशातील गरीब मुलामुलींचे शिक्षण कसे होईल? या देशातील गरीबी कशी दूर होईल? याकडेच आपले लक्ष किमान डॉ. नागोराव कुंभार यांनी द्यावे. कारण, भूक लागल्यानंतर पोटात आग कशी पडते याची जाणीव डॉ. कुंभार यांना जरूर आहे. त्यांनी आपले जीवन प्रतिकूल परिस्थितीवर मात करूनच घडविले.

वक्ते म्हणून डॉ. कुंभार यांनी सद्यस्थितीबद्दल चिंता व्यक्त करून वैचारिक व सत्याच्या मार्गाने जाणाऱ्या माणसाने त्यांच्या मनातील चिंतन शब्दांकित करणे गरजेचे आहे. भारताला यापुढे संविधान मार्गाने विकासाची वाटचाल करावी लागेल. इतर सर्व जाती, वर्ण, धर्माला मर्यादित ठेवून मानवता प्रस्थापित करण्याचे ध्येय साकार करण्यासाठी प्रयत्न करूनच श्री. जवळगे सरांनी ग्रामीण जनतेचे बिकट प्रश्न मांडले. त्याकडे सर्वच बुद्धीजीवी वर्गांनी लक्ष देवून त्यांच्या आजच्या बिकट परिस्थितीची उकल करणे गरजेचे आहे असे आपल्या भाषणातून डॉ. कुंभार यांनी सांगितले. याप्रसंगी ॲड. मनोहरराव गोमारे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य शिवाजी माडे यांनी केले तर शेवटी सर्वांचे आभार सभेचे जिल्हा चिटणीस रामकुमार रायवाडीवर यांनी मानले.

**सोमवार दि. १४ नोव्हेंबर २०१६**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करून विभागीय केंद्राच्या शेजारी असलेल्या बालवाडीच्या मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. विभागीय केंद्राच्या वतीने त्याचदिवशी गुरूनानक जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

**२६ नोव्हेंबर २०१६**

संविधान स्वीकृती दिन विभागीय केंद्र लातूरच्या वतीने उस्मानाबाद येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हा प्रमुख डॉ. रमेशराव दापके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उस्मानाबाद येथील ॲड. पंडितराव जाधव व ॲड. दयानंद बिराजदार यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी दोन्ही पाहुण्यांनी भारतीय संविधानाबद्दल सविस्तर विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले.

**दि. २८ नोव्हेंबर २०१६**

नांदेड येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'आजच्या शिक्षणातील सर्वसामान्य गरीब मुलामुलींच्या शिक्षणाबद्दलचे हाल' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. उत्तम सूर्यवंशी, प्रा. अमोल काळे, प्रा. एस. पी. मद्देवाड यांनी या चर्चासत्रात आपला सहभाग नोंदवला.

**सोमवार दि. १२ डिसेंबर २०१६**

भारताचे माजी कृषिमंत्री तथा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार यांचा ७६वा वाढदिवस साजरा करण्यात आला.

'लिहिलेल्या निवडणूकीचे तुफान' या नाटकाचा प्रयोग विद्यावर्धिनी विद्यालय, हिंगोली येथे साजरा करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले.

**बुधवार दि. २५ जानेवारी २०१७**

विभागीय केंद्राच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई या मध्यवर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आम्हा सर्वांचे आवडते नेते, भारताचे माजी कृषिमंत्री मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांना भारत सरकारतर्फे सर्वोच्च असा पद्मविभूषण हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मोठ्या थाटात आनंद साजरा करण्यात आला व विभागीय केंद्राच्या वतीने त्यांना अभिनंदन पत्र पाठविण्यात आले.

## लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचा ३२ वा स्मृतिदिन

सद्यस्थितीत स्व. यशवंतराव चव्हाण यांचे विचारच आपल्या देशाला मार्गदर्शक व उपयोगी ठरतील. देशाचा चौफेर विकास, खरी समता, बंधुता निर्माण करायची असेल तर यशवंतराव चव्हाण यांच्या नि:स्पृह नैतिकतेने केलेल्या राजकारणाचाच विचार करणे आपल्या देशवासियांना गरजेचे आहे. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी अतिशय मूलगामी काम करून आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करण्यात मोलाचे योगदान दिले. त्यांना युगप्रवर्तकच म्हटले पाहिजे, अशा शब्दात यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठ व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निगम यांनी केले. ते पुढे म्हणाले, आज शैक्षणिक क्षेत्रात आलेली विषमता पाहता यशवंतरावांचे समताधिष्ठीत महाराष्ट्राचे स्वप्न आजही अपुरेच असल्याचे दिसते. यशवंतरावांनी आधुनिक महाराष्ट्राची उभारणी करण्यासाठी कृषि औद्योगिक धोरणाचा पुरस्कार तर केलाच; पण सहकार चळवळीचा पायाही घालण्यासाठी योगदान दिले. शेतीत आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी टेनन्सी ॲक्ट, कमाल जमीन धारणा कायदा आणि तुकडे बील या माध्यमातून त्यांनी क्रांतीकारक निर्णय घेतले. स्थानिक स्वराज्य संस्थांची संकल्पना तर केवळ यशवंतरावांच्याच कल्पनेतून साकार झाली. दिल्लीला गेल्यानंतर संरक्षण, परराष्ट्र धोरण, अर्थ आदी विषयावरही त्यांनी मूलगामी काम केले.

यशवंतराव चव्हाण हे या राज्याच्या सत्तेवर असताना सर्व जातीपंथाच्या तळागाळातील मुलामुलींच्या शिक्षण फी माफीचा ऐतिहासिक क्रांतिकारी निर्णय घेऊन त्यांनी गरीबांना शिक्षणाची दारे खुली केली. तळागाळातील गरीब मुलामुलींनी यशवंतरावांचे विचार आत्मसात करणे हे त्यांच्या भावी जीवनासाठी मोलाचे आहे, असे उद्गार नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी काढले. ते पुढे म्हणाले, राज्याच्या आणि देशाच्या प्रत्येक स्थित्यंतरात यशवंतरावांचा वाटा होता. वरवर राजकारणी दिसणाऱ्या यशवंतरावांचा पाया वैचारिकच होता. शिक्षकांची गुणवत्ता हा आजही कळीचा मुद्दा असली तरी यशवंतरावांनी मात्र या

विषयावरही मूलगामी विचार मांडले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या लातूर विभागीय केंद्रातर्फे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ३२ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक डॉ. जनार्दन वाघमारे होते. प्रमुख अतिथीमध्ये स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, डॉ. प्रदीप देशमुख यांची उपस्थिती होती. प्रारंभी केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमामागील भूमिका व पुढे घ्यावयाच्या कार्यक्रमाची माहिती दिली. प्रा. डॉ. राजकुमार लखादिवे यांनी पाहुण्यांना परिचय करून दिला.

अध्यक्षीय समारोपात माजी खा. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी यशवंतरावांचे समग्र विचारविश्वच सभागृहापुढे उभे केले. महाराष्ट्राला नवी दिशा आणि मूस देण्याचे काम यशवंतरावांनी केले. राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्न महाराष्ट्रापुढे तेव्हाही होते. यशवंतरावांनी या सर्व विषयांची सोडवणूक आपल्या परीने केली होती. सहकार हा दारिद्र्यावरचा उतारा आहे, असे ते म्हणत असत. उदारमतवादी शिक्षणाचे ते पुरस्कर्ते होते. शेती, उद्योग, शिक्षण, सांस्कृतिक असे सगळे प्रश्न त्यांनी ऐरणीवर घेतले होते. तथापि, त्यांचे दिल्लीतले २२ वर्षाचे काम महाराष्ट्रापुढे फारसे आले नाही, अशी खंत डॉ. वाघमारे यांनी व्यक्त केली. सत्ता कोणासाठी? या प्रश्नाचे उत्तर यशवंतरावांनी सत्ता लोकांकडून आली आणि लोकांकडेच जायला हवी, अशा शब्दात दिले होते. आधुनिक महाराष्ट्राच्या पायाभरणीत यशवंतरावांनी दिलेल्या योगदानाचा विसर कदापि पडू शकणार नाही, असे ते म्हणाले.

शेवटी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी आभार व्यक्त करताना यशवंतरावांच्या काही हृदय्य आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विवेक सौताडेकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लातूरचे ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, अॅड. मनोहरराव गोमारे, अॅड. प्रभाकर येरोळकर, प्रकाश गादगिणे, प्राचार्य शिवाजी माडे, अरविंद कांबळे इ. नी मोलाचे परिश्रम घेतले. कार्यक्रमात आजी माजी कुलगुरूंच्या तोंडून लातूरकरांना सविस्तर असे वैचारिक धन मिळाल्याबद्दल श्रोतृवर्गाने विभागीय केंद्राला धन्यवाद दिले. या कार्यक्रमाला सर्व स्तरातील लातूर शहर व ग्रामीण भागातील यशवंतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विभागीय केंद्र, अहमदनगर

## कार्यवृत्त

- **पंचसूत्री ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान**

**दि. १३ ऑक्टोबर २०१६ रोजी**

डॉ. शरदराव गडाख व डॉ. रामभाऊ पेरणे यांच्या उपस्थितीत आदिनाथ नगर (पाथर्डी) येथे ज्वारी उत्पादनाचे तंत्रज्ञान व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे ठिबक सिंचनाचा वापर कसा करावा, प्रतिकुल परिस्थितीत जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे याविषयी सखोल मार्गदर्शन व विविध प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या प्रसंगी पाथर्डी तालुक्यातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होतो.

- **उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञान कार्यशाळा**

दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी श्री एस.डी.मगर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या उपस्थितीत देऊळ गाव गलांडे (ता. श्रीगोंदा) येथे झालेल्या शेतीकट्ट्याच्या अंतर्गत उन्हाळी कांदा उत्पादन व साठवण तंत्रज्ञान कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये उन्हाळी कांद्यावर येणाऱ्या रोगराईचे नियंत्रण, तण नियंत्रण, पाणी नियोजन, लागवडीनंतर द्यायची खते व फवारणी तसेच योग्य वेळेवर काढणी कशा पध्दतीने करावी याबाबतचे सखोल मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात आले.

स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची ३२ वी पुण्यतिथी कार्यक्रम दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय, केंद्र, अहमदनगरच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांची ३२ वी पुण्यतिथी कार्यक्रम नेवासा तालुक्यातील ५१ यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयात स्व. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले तसेच स्व. चव्हाण साहेबांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे सामुहिक वाचन करण्यात आले तसेच प्रा. भाऊसाहेब सावंत (ग्रामीण साहित्यिक) व डॉ. अशोक शिंदे यांनी आपल्या व्याख्यानातून स्व. चव्हाण साहेबांच्या जीवनातील तसेच महाराष्ट्र व राष्ट्र उभारणीतील कार्य तसेच सहकार चळवळीतील काम आदी बाबी विस्तृतपणे समजावून सांगितल्या. यशवंत सार्वजनिक वाचनालयातील पुण्यतिथी कार्यक्रमात स्थानिक बचत गटातील महिला, तरूण महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व वाचन प्रेमी आदी सहभागी झाले होते. तसेच मुळा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या अर्धाकृती पुतळ्यास मा. नाना साहेब तुवर चेअरमन, मा. भाऊसाहेब मोटे, व्हा. चेअरमन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, सर्व अधिकारी, तसेच शेतकरी सभासद उपस्थित होतो. याप्रसंगी कवी एस. बी. शेटे यांनी स्व. चव्हाण साहेबांच्या मुळा कारखाना कार्यस्थळावरील भेटीचा उजाळा दिला. तसेच चव्हाण साहेबांचे सहकार चळवळ उभी करण्याचे योगदान विषद केले. तसेच सोनई येथील कौतुकी नदीपात्र येथील जेष्ठ नागरिक मंचचे सदस्य यांनी स्व. चव्हाण साहेब स्वतः पाहिले तसेच अनुभवले, अशा ७५ तो ८० वर्ष वयोगटातील सेवा निवृत्त शिक्षक, वकिल, प्राध्यापक, शेतकरी

यांनी चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथी निमित्ताने प्रतिमेस अभिवादन करून स्व. चव्हाण साहेबांच्या आठवणीस उजाळा दिला. या प्रसंगी १०० तो १२० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. तसेच मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई व 'यश ग्रुपा' च्या अहमदनगर, औरंगाबाद येथे तसेच कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई येथे स्व. चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथी निमित्ताने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा येथे पुण्यतिथी कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. भाऊसाहेब सावंत हे उपस्थित होतो. तसेच मुळा एज्युकेशन सोसायटी सोनईची १५ माध्यमिक विद्यालये, ७ प्राथमिक मराठी व इंग्रजी शाळा, २ वरिष्ठ महाविद्यालय, ९ व्यवसायिक महाविद्यालय, ५ उच्च माध्यमिक विदयालये व ९ इंग्लिश मिडियम स्कूल तसेच मुळा पब्लिक स्कूल या ठिकाणी स्व. चव्हाण साहेबांच्या ३२ व्या पुण्यतिथी निमित्ताने रांगोळी स्पर्धा, बालचित्रकला स्पर्धा, वकृत्वस्पर्धा, निबंध स्पर्धा आदीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर'च्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच 'यशवंतराव चव्हाण दंत महाविदयालय, वडगाव' वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वांजोळी या ठिकाणी दंत रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होतो. तसेच या प्रसंगी २७१ विदयार्थ्यांची मौखिक आरोग्य तापासणी करण्यात आली व सर्व विदयार्थाना टुथपेस्ट व ब्रशचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी वांजोळी गावचे सरपंच तात्यासाहेब शिरसाठ, उपसरपंच बद्रीनाथ खंडागळे, मुख्याध्यापिका श्रीमती लवांडे, डॉ. निखिल बोंबले, डॉ. निलेश साळुंके यांनी विदयार्थ्यांना मौखिक आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. या प्रकारे स्व. यशवंत चव्हाणसाहेब यांची ३२ वी पुण्यतिथी विविध कार्यक्रम व उपक्रमांनी साजरी करण्यात आली. तसेच यशवंत प्रतिष्ठान संचलित आदर्श गाव मोरया चिंचोरा येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विदयालयात निबंध स्पर्धा, आदर्श नागरिक भरत गर्जे यांचे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी मनोगतात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, उत्कृष्ठ प्रशासक, यशस्वी संसदपटू. उत्तम वक्ते व लेखक, आणि जन सामान्यात ज्यांची मूळे रूजली आहेत असे नेते स्व. यशवंतराव चव्हाण साहेब यांचे जीवन चरित्र उलगाडले.

- दि.१०.१२.२०१६ रोजी विभागीय केंद्र अहमदनगर व जिल्हा विधी सेवा समिती तसेच नेवासा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १०.१२.२०१६ रोजी जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच शेतकऱ्यांना मोफत कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी विद्यार्थी, शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

- दि. १४.१२.२०१६ ते दि. २५.१२.२०१६ या कालावधीत विभागीय केंद्र, अहमदनगर व कला, वाणिज्य व विज्ञाान महाविद्यालय, सोनई यांच्यावतीने विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिराचे लोहोगाव ता. नेवासा येथे ग्रामविकासासाठी आयोजन केले होतो.

- दि. २७.१२.२०१६ रोजी विभागीय केंद्र, अहमदनगर चे सचिव प्रशांत पाटील-गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या ५१ सार्वजनिक वाचनालयांना मा. प्रशांत पाटील-गडाखा यांच्याकडून ५१ हजार रुपयांची पुस्तके वाढदिवसानिमित्त भेट. तसेच प्रशांत पाटील-गडाख मित्र मंडळ यांच्याकडून ५१ हजार रुपयांची पुस्तके वाचनालयास भेट. तसेच नव्याने ११ यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालयांची स्थापना केली. आजअखेर यशवंतराव चव्हाण

सावर्जनिक वाचनालयांची संख्या एकूण ६२ इतकी आहे.

- दि. २७.१२.२०१६ राहुरी येथे आधुनिक शेती तंत्रकार्यशाळेचे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे आयोजन करण्यात आले. अनुभवी मार्गदर्शक डॉ. व्ही. डी. देशमुख त्यावेळी उपस्थित होते. तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- दि.३०.१२.२०१६ राहता (जिल्हा अहमदनगर) येथे प्रक्रिया उद्योग या उपक्रमांचे आयोजन डॉ. हरी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यात प्रामुख्याने आवळा कॅन्डी, मनुके, पापड लोणची आदी प्रक्रिया उद्योगाविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

- स्वामी विवेकानंद जयंती (राष्ट्रीय युवा दिन) व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त दि.१२.०१.२०१७ रोजी विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने सोनई महाविद्यालय व नेवासा महाविद्यालय येथे अनुक्रमे डॉ. शंकर लावरे सर तसेच डॉ. गोरक्षनाथ कोल्हापुरे सर आदींची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. यात बहुसंख्येने विद्यार्थी/विद्यार्थींनी उपस्थित होत्या.

- दि. १९ जानेवारी २०१७ रोजी कर्जत व जामखेड तालुक्यात संयुक्तरित्या ‘दुग्ध व मुरघास तंत्रज्ञान’ या शेती कट्टयाचे मु. टाकळी खंडेश्वरी (ता. कर्जत). जि. अ. नगर या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री. एस. एस. जाधव, कनिष्ठ संशोधन सहाय्यक महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व ज्ञानेश्वर पवार कृषीभूषण प्रगतशील शेतकरी मु. पो. पुनतगांव, (ता. नेवासा) आदी उपस्थित होतो. या कार्यशाळेत दुग्ध उत्पादन तंत्रज्ञान, गाईच्या विविध जाती, चारा व्यवस्थापन, वासरांचे संगोपन, मुरघास प्रक्रिया, प्रत्यक्ष मुरघास निर्मिती प्रात्यक्षिक उपस्थित शेतकऱ्यांना करून दाखविण्यात आले व शेतकऱ्यांच्या विविध शंकाचे निरसन करण्यात आले. याप्रसंगी कर्जत व जामखोड तालुक्यातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होतो.

- दि.२६.०१.२०१७ प्रजासत्ताक दिन रोजी ६८ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, अहमदनगरच्या वतीने ध्वजवंदन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होतो.

# विभागीय केंद्र, सोलापूर

## कार्यवृत्त

सोलापूर विभागीय केंद्राच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जयंतीनिमित्त सात रस्ता चौक येथील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माजी आमदार तथा विभागीय केंद्राचे सदस्य हाजी युन्नुसभाई शेख, ज्येष्ठ नेते धर्मा भोसले या दोघांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी केंद्राचे सचिव दिनेश शिंदे व शरद प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अनिल पानसे व इतर सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रियाताई सुळे यांच्या संकल्पेनेतून ग्रामीण भागीतील मुलींचे रक्तगट, हिमोग्लोबिन, रक्तपेशी तपासणी शिबीर, तालुका मंगळवेढा येथील दामाजी महाविद्यालय येथे सुमारे दोनशे मुलींची तपासणी करण्यात आली. सोलापूर विभागीय केंद्र व रत्नप्रभा सोशल फौंडेशन यांच्यावतीने हा उपक्रम घेण्यात आला. मुलींच्या आरोग्य तपासणीनंतर त्यांच्या तारुण्यात पदार्पण करताना येणाऱ्या अनेक अडचणींना कसे तोंड द्यायचे व आरोग्याच्या दृष्टीने कशी काळजी घेतली पाहिजे याबाबत 'तारुण्याच्या उंबरठ्यावर' या विषयावर स्त्री रोग तज्ञ डॉ. सुदेश दोषी व डॉ. शरद शिर्के यांनी मार्गदर्शन केले. अशाच प्रकारचे शिबीर केंद्राच्या वतीने सर्व तालुक्यात राबवण्यात येणार आहे. यासाठी स्त्रीरोग तज्ञ डॉ. संदेश कादे व बालाजी लॅबोरेटरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल शहा व दामाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

१५ डिसेंबर २०१६ रोजी विभागीय केंद्र व सोलापूर विद्यापीठाच्या वतीने पत्रकारांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. इलेक्ट्रॉनिक मिडिया आणि प्रिंट मिडिया यातील वास्तव आव्हाने आणि पत्रकारांची भूमिका असे विषय या कार्यशाळेत घेण्यात आले होते. आत्ता कार्यरत असेलेले पत्रकार व पत्रकारिता विभागीतील विद्यार्थी असे मिळून एकूण दोनशे जणांनी या कार्यशाळेत भाग घेतला होता. ज्येष्ठ पत्रकार निळू दामले यांच्या हस्ते याचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी निळू दामले यांनी पत्रकारितेचा भूतकाळ आणि वर्तमानकाळातील वास्तव या विषयावर मार्गदर्शन केले. आजची पत्रकारिता काय शिकवते, याचा विचार कसा करावा, या बाबत या कार्यशाळेत एक तासाचे चर्चासत्र घेण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एन. एन. मालदार, कुलसचिव डॉ. डी. एन. मिश्रा, सामाजिक शास्त्र विभाजीचे डॉ. अशोक कुमार, डॉ. रविंद्र चिंचोळकर, विभागीय केंद्राचे सदस्य दत्ता गायकवाड , सचिव दिनेश शिंदे उपस्थित होते. या उपक्रमासाठी सोलापूर जिल्हा श्रमिक पत्रकार संघाचे देखील सहकार्य लाभले.

उजनी धरण व सोलापूरच्या पाण्याचे ऑडिट अशी पाणी परिषद एप्रिल मध्ये घेण्यात येणार आहे.

# विभागीय केंद्र, अंबाजोगाई

## कार्यवृत्त

### जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन व गांधी जयंती :

दि. २ ऑक्टोबर २०१६ गांधी जयंती व दि. १ ऑक्टोबर २०१६ जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाई व मानवलोक अंबाजोगाईच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात आला. गरजू ज्येष्ठ नागरिकांना चालण्यासाठी आधार म्हणून उपयुक्त 'काठी' देण्यात आली. त्यावेळी अस्थिरोग तज्ञ डॉ. प्रदीप शेंडगे यांनी उतारवयातील गुडघेदुखी व इतर हाडांच्या आजारासंबंधी मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाई चे सचिव तथा दंतरोग तज्ञ डॉ. नरेंद्र काळे यांनी वृध्दांच्या दंत व मुखरोगाविषयी मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. द्वारकादास लोहिया यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांविषयी माहिती दिली. यावेळी 'मानवलोक'चे कार्यवाह अनिकेत लोहिया, ज्येष्ठ नागरिक संघाचे डॉ. डी. एच. थोरात, रोटरी क्लब (सिनियर सिटी)चे अध्यक्ष श्री. पुंडलिक पवार, माजी मुख्याध्यापक मा. कदम सर उपस्थित होते.

### यशवंतराव चव्हाण स्मृती दिन :

दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाईच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक श्री. इंद्रजित भालेराव यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्र-अंबाजोगाईच्या वतीने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शहरातील अनेक प्रतिष्ठान उपस्थित होते. मा. प्रा. श्री. इंद्रजित भालेराव यांनी कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनपटावर व कार्यावर प्रकाश टाकला.

# विभागीय केंद्र, ठाणे

## कार्यवृत्त

- दिनांक २५ नोव्हेंबर २०१६ रोजी ‘यशवंत व्याख्यान’ मालेचे थाटामाटात उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या ‘मूलभूत विज्ञानाच्या संशोधनाच्या नव्या दिशा’ या व्याख्यानाच्या पहिल्या पुष्पाने झाली. पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, डॉ. एम. ए. खान, (कुलसचिव, मुंबई विद्यापीठ) डॉ. अनिल पाटील (संचालक, बी. सी. यु. डी.), श्री. मुरलीधर नाले, (अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे केंद्र) आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे केंद्राचे अध्यक्ष श्री. मुरलीधर नाले यांच्या प्रास्ताविकाने सुरूवात झाल्यानंतर कुलसचिव डॉ. एम. ए. खान यांनी त्यांचे मनोगत मांडले. कुलसचिवांच्या मनोगतानंतर डॉ. अनिल पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या कृषी व सहकार विभाग, पुणे यांनी घेतलेल्या निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांना पुरस्कार दिल्यानंतर ‘यशवंतराव चव्हाण : जडण घडण’ या पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, श्री. अरूण साधू आणि प्रा. पु. द. कोडोलीकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर या कार्यक्रमास ठाणे, मुंबई, महाड, रायगड, रत्नागिरी, पेण, पनवेल तसेच अनेक ठिकाणाहून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी आदरणीय पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी व्याख्यानाची सुरवात केली. तब्बल एक तास वीस मिनिटे चाललेल्या या व्याख्यानाने मंत्रमुग्ध झालेल्या विद्यार्थ्यांशी डॉ. अनिल काकोडकर यांनी संवाद साधला.

# विभागीय केंद्र, नाशिक

## कार्यवृत्त

**‘चित्रपट चावडी’ ‘प्लॅटफॉर्म’**
**शुक्रवार, दि.०७/१०/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘चित्रपट चावडी’ उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक जिया जानके (चीन) यांचा ‘प्लॅटफॉर्म’ हा चिनी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

जिया जानके आजच्या पिढीचे चीनचे अत्यंत नावाजलेले दिग्दर्शक आहेत. नव्या चीनमध्ये अत्यंत वेगाने राजकीय आणि आर्थिक परिस्थिती बदलली. साधारणतः विसाव्या शतकातील ८० व ९०चे दशक हा काळ डोळ्यासमोर ठेवून आलेल्या आर्थिक सुबत्तेचा आणि पर्यायाने झालेल्या सामाजिक बदलाचा वेध त्यांनी आपल्या चित्रपटातून घेतला आहे. नुसतेच शहरीकरण व औद्योगीकरण झाले नाही तर माणसाचे माणूसपण व ओळखही ठरविली.

‘प्लॅटफॉर्म’मधून दिग्दर्शक चीनच्या अलिकडच्या काळातील सामाजिक इतिहासाचा मागोवा घेतो. माओच्या चीनपासून ते आर्थिक उदारणीकरणापर्यंत होणाऱ्या समाजातील सांस्कृतिक बदलांचा एक पट मांडतो. हा सर्व पट अर्थातच एका तरुण कलाकाराच्या समुहातील घडामोडीतून उलगडतो व चीनच्या एका प्रांताचे मनोज्ञ दर्शनही घडवितो.

सन २००० मध्ये प्रदर्शित झालेल्या या रंगीत चित्रपटाचा कालावधी १५४ मिनिटांचा होता.

**‘वाचन प्रेरणा दिन’**
**नुतन विद्यालय,सैय्यद पिंप्री**
**शनिवार, दि.१५/१०/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. वाचनप्रेरणा दिनाच्या निमित्ताने ‘साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नुतन माध्यमिक विद्यालय, सय्यद पिंप्री’ येथे ग्रंथ दिंडी, व ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. संस्थेच्या वतीने शाळेस ग्रंथपेटी भेट देण्यात आली.

ज्ञानाच्या माध्यामातून विचारांची वाढ होते व त्याचा उपयोग समाजाच्या विकासाठी करता येतो. चांगली पुस्तके ही समाजमनाचा आरसा असतात, असे विचार शाळेचे प्राचार्य भाऊसाहेब गोसावी यांनी व्यक्त केले. देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी चांगल्या पुस्तकांचे वाचन महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक व संस्थेचे कार्यकर्ते हजर होते.

**‘वाचन प्रेरणा दिन’**
**अभिनव बाल मंदिर, नाशिक**
**शनिवार, दि.१५/१०/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने वाचनप्रेरणा दिनाच्या निमित्ताने मविप्र संस्थेच्या नाशिक

येथील अभिनव बालविकास मंदिर शाळेत ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये प्रा. विजयकुमार पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांनी आपल्या व्याख्यानातून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जीवन गाथा व वाचनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक बाळबोध व मोठ्या व्यक्तीस विचार करावयास भाग पाडणाऱ्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उदाहरणांसह उत्तरे दिली.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी प्रवीण आहिरे, मविप्रचे शिक्षणधिकारी सी. डी. शिंदे व विश्वास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हरी कुलकर्णी यांनी उपस्थित राहून ग्रंथप्रदर्शनाच्या निमित्ताने मार्गदर्शन केले.

### ‘चित्रपट चावडी’
### ‘टोकिओ स्टोरी’
**शुक्रवार, दि.२१/१०/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि.,नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘चित्रपट चावडी’ उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा ‘टोकिओ स्टोरी’ हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

एक वृद्ध जोडपे आपल्या मुला-नातवंडांना भेटण्यासाठी टोकिओमध्ये काहीशा अनिच्छेनेच येते. खेड्यातील शांत वातावरण व समंजस शेजारी सोडून मुलांकडील शहरी वातावरण त्यांना अजिबात मानवत नाही. त्यांना घरची ओढ लागते व ते परततातही. परतल्यावर आजीचा मृत्यू होतो व आता खेड्याकडे जाण्याची मुलांवर वेळ येते.

येसुजीरो ओझू हे सर्वात श्रेष्ठ जपानी दिग्दर्शकांपैकी एक आहेत. जपानी मातीतील त्यांचा सिनेमा व खास ‘ओझू शैली’ यांची अमीट छाप ‘टोकिओ स्टोरी’ वर आहे. जपानमध्ये होत असलेले औद्योगीकरण आणि वेगाने बदलणाऱ्या कुटुंब व्यवस्थेवर भाष्य करणारा ‘टोकिओ स्टोरी’ हा जागतिक कीर्तीचा सर्वश्रेष्ठ सिनेमा आहे. सन १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या कृष्णधवल चित्रपटाचा कालावधी १३६ मिनिटांचा होता.

### ‘ग्रंथ तुमच्या दारी-बालविभाग’
**मंगळवार, दि.२५/१०/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. ऋचा मालपाणी-इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या सहकार्याने संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध १६ शाळांना ‘ग्रंथ तुमच्या दारी-बालविभाग’ या योजनेअंतर्गत ग्रंथपेट्या भेट देण्यात आल्या.

इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांनी ‘ए हॉपी स्कूल प्रोजेक्ट २०१६-२०१७’ अंतर्गत संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा दतक घेतल्या आहेत. सदर शाळेमध्ये ग्रंथालय नसल्याने आपल्या संस्थेच्या ‘ग्रंथ तुमच्या दारी-बाल विभाग योजने’तुन इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर यांच्या सहकार्याने संगमनेर तालुक्यातील एकुण १६ शाळांना ग्रंथपेट्या देण्यात आल्या.

### ‘कॅम्पस मैत्र कारवाँ’
**शुक्रवार, दि.११/११/२०१६**

मैत्र कारवा २०१६ च्या युवक मेळाव्यानंतर जास्तीत जास्त युवांना प्रबोधनाद्वारे संबोधित करायचे असेल तर त्यांना एका ठिकाणी बोलवण्यापेक्षा आपणच त्यांच्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, हे लक्षात आल्याने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक,

विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॅम्पस मैत्र कारवाँ' या नावाने नेवीनच आलेल्या स्वयंसेवकांना प्रशिक्षक म्हणून तयार करण्यासाठी प्रशिक्षण घेण्याचे ठरले.

युवकमेळाव्याच्या निमित्ताने आलेल्या १५ स्वयंसेवकांना प्रशिक्षित करुन त्यांच्याद्वारे विविध कॉलेजच्या कॅम्पसमध्ये युवांच्या विविध प्रश्नांवर व प्रबोधनावर या स्वयंसेवकांतर्फे प्रशिक्षण आयोजित करण्याचे ठरले.

याकरता विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, विश्वास बँक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व सारस्वत बँक याच्या संयुक्त विद्यमाने दि.११/११/२०१६ रोजी हे प्रशिक्षण क्लब हाऊस, ठाकूर रेसिडेन्सी, सावरकर नगर, नाशिक येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणास सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

### 'चित्रपट चावडी' 'ऑटम आफ्टरनून'
**शुक्रवार, दि. ११/११/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि.,नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा 'ऑटम आफ्टरनून' हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

६०च्या दशकातील जपान हा औद्योगिकरणाच्या पुढच्या टप्प्यात आला आहे. 'टोकिओ स्टोरी' हा पहिला टप्पा होता. 'ऑटम आफ्टरनून'मध्ये कुटुंबातील होणारे बदल सूक्ष्मपणे टिपले आहेत. यात प्रामुख्याने वयस्कर वडिल व तरुण मुलीची गोष्ट आहे. मुलीला आपल्या वडिलांची काळजी आहे तर वडिलांना लग्नाचे वय उलटून जात असल्याने आपल्या मुलीची काळजी अशी ही नात्यामधील वीण या चित्रपटात होती.

येसुजीरो ओझू हे सर्वात श्रेष्ठ जपानी दिग्दर्शकांपैकी एक आहेत. सन १९६२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ११२ मिनिटांचा होता.

### 'पितृसत्ता विरोधी पुरुष' चर्चासत्र
**शनिवार, दि. १२/११/१६ व रविवार, दि. १३/११/१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने या कालावधीत प्रसिद्ध जेंडर प्रशिक्षक श्री. आनंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'पितृसत्ता विरोधी पुरुष' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चेत प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते व अभ्यास अरुण ठाकूर यांनी 'पितृसत्ता व धर्म' या विषयाची मांडणी केली. चर्चेत धर्माची संकल्पना, तिचा प्रवास व सद्य:स्थिती, धर्मातील कर्मकांडे, त्यातून बाहेर पडण्याचे मार्ग इ. विषयांचा सखोल अभ्यास केला. या चर्चेत विविध सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते तसेच युवांनी एकत्र येऊन सामाजिक विषमता ही पितृसत्तेमुळे आली आहे असे मत मांडले.

सदर चर्चेचे समन्वयन संस्थेच्या अनिता पगारे यांनी केले.

### 'चित्रपट चावडी' 'फ्लोटींग वीडस्'
**शुक्रवार, दि. १८/११/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत शुक्रवार, सुप्रसिद्ध दिग्दर्शक येसुजीरो ओझू (जपान) यांचा 'फ्लोटींग वीडस्' हा जपानी भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

'ओझू मालिके'तील ही तिसरी व शेवटची फिल्म होती. हा चित्रपट एका काबुकी थिएटरच्या फिरत्या समुहावर आधारीत आहे. हा समुह व त्याचा प्रमुख जपानमधील एका समुद्र किनाऱ्यावरील गावात येतात. काबुकी रंगमंच हा एक अस्तंगत होत चाललेला प्रकार होता. तरीही नेटाने ही कला जिवंत ठेवण्यासाठी धडपडणारा हा चमू व त्या गावात येण्याचे एक वेगळेच प्रयोजन असलेल्या त्यांचा प्रमुख एका वेगळ्याच शेक्सपिरीयन ट्रेजेडीकडे घेऊन जातात.

येसुजीरो ओझू हे सर्वात श्रेष्ठ जपानी दिग्दर्शकांपैकी एक आहेत. सन १९५९ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी १२० मिनिटांचा होता.

### 'सामाजिक लिंगभाव आणि समानता'
**शनिवार, दि.१९/११/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोतीवाला बी.एड कॉलेज, गंगापूर रोड, नाशिक' येथे बी.एड च्या विद्यार्थ्यांसाठी 'सामाजिक लिंगभाव आणि समानता' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना विविध खेळाच्या माध्यमातून 'जेंडर' ची संकल्पना समजावून सांगण्यात आली, ज्यामुळे परिवर्तनाला मदत होऊ शकेल. विद्यार्थ्यांना शिबिराचा विषय, मांडण्याची पद्धत व खेळाचा वापर खूपच आवडला.

विद्यार्थ्यांसह कॉलेजच्या प्राचार्यांसमवेत सर्व शिक्षकांनी या कार्यशाळेत उस्फुर्त सहभाग नोंदवला. संस्थेच्या अनिता पगारे व टीम यांनी या कार्यशाळेचे नियोजन केले.

### 'कॅम्पस मैत्र कारवाँ प्रशिक्षण'
**सोमवार, दि.२१/११/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'सुखदेव माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, इंदिरा नगर, नाशिक' येथे संस्थेच्या अनिता पगारे व टीम यांनी 'जेंडर व इक्वॅलिटी' या विषयावर प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणास ३०० विद्यार्थी उपस्थित होते. सामाजिक लिंगभाव व स्त्री-पुरुष समानता या विषयावर प्रशिक्षण संपन्न झाले.

### 'किशोरवयीन मुलींची बैठक'
**बुधवार, दि.२३/११/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनिर्णय सामाजिक संस्था, पेठरोड, नाशिक येथे किशोरवयीन मुली व महिला यांच्याकरीता 'मासिक पाळी व मुलींचे आरोग्य' या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टीम यांनी प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणात किशोरवयात शरीरात होणारे बदल व मासिकपाळी म्हणजे काय? का येते? कशी येते? व त्यासंदर्भातील सामाजिक समज-गैरसमज आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी इ. विषयाचे प्रबोधन करण्यात आले. या प्रशिक्षणात उपस्थित मुलींनी प्रशिक्षकांना या बाबत विविध प्रश्न विचारुन मनातील शंकाचे निवारण करुन घेतले. फुलेनगर, पेठरोड, पंचवटी येथील वस्तीतील ४० मुली व महिला उपस्थित होत्या.

**‘जग बदलणारे जीनियस’ या विषयावरील व्याख्यान**
**मार्गदर्शक – अच्युत गोडबोले व डॉ. दीपा देशमुख**
**गुरुवार, दि. २४/११/२०१६**

गॅलिलिओ, न्यूटन, आइन्स्टाइन या सर्व शास्त्रज्ञांमध्ये एक समाजगुण आहे, तो म्हणजे अफाट बुद्धिमत्ता असूनही त्यांचे जगणे विक्षिप्त स्वरूपाचे होते. जग बदलणाऱ्या या शास्त्रज्ञांध्ये प्रचंड कुतुहल होते. मी कायमच विद्यार्थी आहे, ही भावना त्यांच्यामध्ये शेवटपर्यंत होती. कुतुहल जागृत ठेवून ध्येयाच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे असून शिकण्याची जिद्द कायम ठेवल्यास प्रत्येक जण जीनियस होईल, असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ व ज्येष्ठ साहित्यिक अच्युत गोडबोले यांनी केले.

महाराष्ट्राचे थोर शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या ३२व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को–ऑप.बँक लि., नाशिक, सारस्वत बँक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट व विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम. यांच्या संयुक्त विद्यमाने ख्यातनाम साहित्यिक अच्युत गोडबोले व लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ.दीपा देशमुख यांचे ‘जग बदलणारे जीनियस’ या विषयावरील व्याख्यान कुर्तकोटी शंकराचार्य संकुल सभागृह, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते त्याप्रसंगी ते बोलत होते.

ते म्हणाले, मी स्वतःला कायम विद्यार्थी समजतो व त्याच भावनेने लेखन करतो. कुतुहल व माणुसकी विसरू नये. हल्लीचे अनेक शिक्षक विद्यार्थ्यांऐवजी परिक्षार्थी घडवतात. का? या प्रश्नाने संशोधनाला चालना मिळते म्हणून विद्यार्थ्यांनी आपले कुतुहल, जिज्ञासा कायम ठेवली पाहिजे. मार्कांपेक्षा विषयावर प्रेम करावे. लहानपणापासून घरात बुजुर्ग गायकांच्या मैफली झाल्या. साहित्यिक, शास्त्रज्ञांचा सहवास घडला. त्यामुळे गणित, विज्ञानाइतकेच साहित्य, संगीत, चित्रकला यावरही प्रेम जडले. विविध विषयांचे कायम आकर्षण राहिले. आयआयटीच्या ग्रुपमुळे विपुल लेखन केले. गुणवत्तेचा, उत्कृष्टतेचा ध्यास घेतला. मोठे ध्येय बाळगून प्रचंड वाचन केले. ‘जीनियस’ या प्रकल्पातील पुस्तके लिहिताना सहलेखिका दीपा देशमुख यांनी खूप मोलाचे सहकार्य केले, असेही श्री. गोडबोले म्हणाले. तसेच मुलांची जिज्ञासा मारू नका, त्यांना प्रश्न विचारू द्या, असा सल्लाही श्री. गोडबोले यांनी शिक्षक आणि पालकांना दिला. केवळ परीक्षेसाठी मुलांनी अभ्यास करू नये, तर सर्व क्षेत्रांतील ज्ञान मिळवावे, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी ‘जीनियस’ पुस्तकांच्या सहलेखिका डॉ. दीपा देशमुख म्हणाल्या, जीनियस पुस्तक प्रकल्प पूर्ण करताना माझे वैयक्तिक आयुष्य बदलून गेले. जगात इतकी थोर माणसं होऊन गेली हे कळल्याने मी भारावून गेले. ही माणसे आपल्याला ‘चला, उठा, कामाला लागा’ असा संदेश देतात. जग गाजवणारे शास्त्रज्ञ, संशोधक हळवे असू शकतात. कारण ते अत्यंत संवेदनशील माणूस असतात. येत्या दोन महिन्यात आमचे पाश्चिमात्य संगीतावरील ‘सिंफनी’ हे पुस्तक दोन भागांध्ये प्रकाशित होईल. जग बदललेले जीनियस ही पुस्तक मालिका तसेच तंत्रज्ञानावर आधारीत १२ पुस्तकांची शृंखला प्रकाशित होईल असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. अच्युत गोडबोले यांचा परिचय सचिव डॉ. मनोज शिंपी यांनी करून दिला तर सन्मान सदस्य कविता कर्डक यांनी केला. दीपा देशमुख यांचा परिचय कोषाध्यक्ष विनायक रानडे यांनी केला तर सन्मान सदस्य ॲड. नितीन ठाकरे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदस्य डॉ. सुधीर संकलेचा यांनी केले. कार्यक्रमास विनायकदादा पाटील, भीष्मराज

बाम, डॉ. कैलास कमोद, आर्किटेक्ट संजय पाटील, मेघा सायखेडकर, हंसराज पाटील, डॉ. मनोज चोपडा, विजय बुऱ्हाडे, प्रा. निशा पाटील, सचिन जोशी तसेच नाशिककर रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'कॅम्पस मैत्र कारवां'**
**गुरुवार, दि.०८/१२/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने एस.बी कॉलेज, शहापूर येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'जेंडर इक्वॅलिटी' या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टीम यांनी प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणात स्त्री-पुरुषामधील निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित फरक समजावून घेण्यासाठी फुगे आणि टाचणीचा खेळ घेण्यात आला. पुढे सिमोन दि बुवायार यांचा जेंडर सोशल कंन्स्ट्रक्शन हा सिध्दांत मांडला. त्यात प्रथम सेक्स आणि जेंडर यातील फरक समजावून देण्यात आला. प्रत्येक मुलीला स्त्री होईपर्यंतचा आणि प्रत्येक मुलाला पुरुष होईपर्यंतचा प्रवास कसा घडविला जातो. कळत नकळत विषमता कशी पेरली जाते, कपडे, शिक्षण, स्त्रीच्या टिपीकल प्रतिमा स्त्री जन्मत:च रडकी, प्रेमळ, समजूतदार, नाजूक इ. नसते तर तिला तसे घडवले जाते. पुरुष जन्मत:च रागीट, धडधाकट, मारणारा नसतो; त्याला घडवले जाते हा सिध्दांत समजावून सांगितला. या प्रशिक्षणास कॉलेजचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'चित्रपट चावडी' 'रॅबिट प्रुफ फेन्स'**
**शुक्रवार, दि. ०९/१२/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'रॅबिट प्रुफ फेन्स' हा चित्रपट दाखविण्यात आला.

ऑस्ट्रेलियातील मुळ आदिवासी आणि स्थलांतरीत ब्रिटीश गोऱ्यांधील संबंधाची आणि त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांची मांडणी करणारा फिलीप नॉईस यांचा हा अत्यंत महत्त्वाचा चित्रपट. ह्या चित्रपटाबरोबर आपण एका ऑस्ट्रेलियन दिग्दर्शकाची चित्रपट त्रयी पहाणार आहोत. फिलीप नाईस हे तसे ऑस्ट्रेलियन व हॉलीवुडचे दिग्दर्शक. दोन्हीही भूमिकात तितकेच यशस्वी आहेत.

रॅबिट प्रुफ फेन्स ही १९३० दशकात घडणारी ३ मुलींची कहाणी आहे. या तिन्ही मुली आदिवासी/गोऱ्या संबंधातून जन्माला आल्या आहेत. त्यातून घडणारे नाट्य या चित्रपटात आहे.

**नॉनव्हेज महोत्सव**
**शुक्रवार, दि. ०९/१२/२०१६ ते रविवार ११/१२/२०१६**

विश्वास को-ऑप बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, सारस्वत बँक, विश्वास लॉन्स, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वास ठाकूर यांच्या संकल्पनेतून शुक्रवार ९ डिसेंबर ते रविवार ११ डिसेंबर २०१६ या कालावधीत 'नॉनव्हेज महोत्सावा'चे आयोजन करण्यात आले होते.

नॉनव्हेज पदार्थातील चटकदारपणा आणि ते बनवण्याच्या पध्दतीतील वेगळेपणाचा आनंद नॉनव्हेज महोत्सवात खवय्यांनी अनुभवला. नॉनव्हेज पदार्थांची एक स्वतंत्र खाद्य संस्कृती आहे आणि त्यातील अनोखा मेळ महाराष्ट्रातील विविध ठिकाणी अजूनही टिकून आहे,

त्याची प्रचिती महोत्सवात आली. नॉनव्हेज पदार्थातील चटकदारपणा व खास तयार केलेल्या मसाल्यांचा वापर ही खासियत येथे अनुभवास आली. तीस हजारांहून अधिक खवय्यांनी महोत्सवाला प्रतिसाद दिला.

नाशिक वेगाने विकसित होत असून त्यात प्रामुख्याने फुड कल्चरची मागणी जोर धरु लागली आहे. अशा महोत्सवातून खवय्यांना नेमके काय हवे असते याची जाणीव विविध स्टॉलवर दिसत होती.

खास आकर्षण म्हणजे सुप्रसिध्द सेलिब्रिटी शेफ पराग कान्हेरे यांनी महोत्सवास भेट दिली व नॉनव्हेज महोत्सवाच्या अभिनव आयोजनाबद्दल कौतुकोउद्गार काढले. ते म्हणाले, 'महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती वैशिष्टपूर्ण असून दर २० मैलावर पदार्थांची चव बदलत असते. सर्वांनी पॅशन म्हणून स्वयंपाक बनविण्याकडे बघितले पाहिजे. प्रत्येक शहरात अशा प्रकारचे महोत्सव आयोजित केल्यास नवनवीन खाद्यपदार्थांची ओळख होईल. पती-पत्नीने एकत्रितपणे स्वयंपाक केल्यास घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल'.

खिसा मुघलाई, अफगाणी बैदा करी, दाल गोश्त, चिकन/ मटन बिर्याणी, अरोमा बिर्याणी, चिकन भुना फ्राय, मेथी पालक स्मोक, हैद्राबादी पध्दतीची हिरवी चिकन बिर्याणी, मटन चॉप, चुलीवरची नॉनव्हेज मिसळ, तांबडा व पांढरा रस्सा, ड्रायफ्राय चिकन-मटन, खर्डा चिकन, ब्लॅक चिकन, मटन लोणचे, मटन चॉप्स, अळणी मटन खिचडा अशा एकाहून अधिक सरस पदार्थांची खवय्यांनी चव घेतली. खाण्यासोबतच हिंदी, चित्रपटातील गाणी आणि त्यांच्या आठवणी रसिकांना भूतकाळाचा आनंद देत होत्या. इन्स्ट्रुमेंटल म्युझिकने सुरांची अलौकीक अनुभूती दिली. नॉनव्हेज महोत्सव यशस्वी होण्यासाठी आयोजक विश्वास ठाकूर, विनायक रानडे, विवेकराज ठाकूर, सचिन शिंदे, शैलेश नाटकर, कैलास पाटील, समीर देशपांडे, वसंत ठाकरे आदींनी मेहनत घेतली.

## 'ग्रंथ तुमच्या दारी-बालविभाग'

**शनिवार, दि.२४/१२/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री. सचिन देशमुख यांच्या सहकार्याने आधारतीर्थ आश्रम (महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे) मु. तुपादेवी पो. अंजेनेरी ता. त्र्यंबकेश्वर येथील आश्रमास ग्रंथपेटी भेट देण्यात आली.

या प्रसंगी बोलतांना ग्रंथ तुमच्या दारी-बाल विभाग योजनेचे समन्वयक विनायक रानडे यांनी सांगितले की श्री. सचिन देशमुख यांनी दिलेल्या या पुस्तकांच्या भेटीमुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना यापुढील आयुष्य जगतांना अवांतर वाचनामुळे व्यवहारज्ञान व संकटाच्या वेळेस धैर्याने सामोरे जाण्याचे बळ मिळेल.

## 'चित्रपट चावडी' 'द क्वाइट अमेरिकन'

**शुक्रवार, दि. १६/१२/२०१६**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'द क्वाइट अमेरिकन' हा चित्रपट दाखविण्यात आला.

प्रसिद्ध कादंबरीकार ग्रॅहॅम ग्रीन यांच्या कादंबरीवर आधारीत 'द क्वाइट अमेरिकन' हा चित्रपट विएतनाम मध्ये घडतो. एकोणिसशे पन्नासच्या दशकात फ्रेंच वसाहतकार आणि कम्युनिस्टांध्ये युद्ध जुंपले आहे. सायगाव स्थित वयस्कर लंडन टाईम्स चा पत्रकार, त्याची तरुण व्हिउतनामी प्रेयसी व अमेरिकन डॉक्टर, जो एका अॅड एजन्सीच्या माध्यमातून तिथे आला आहे यामध्ये

हे कथानक घडते. हा प्रेमाचा त्रिकोण, त्यात खूनाचे प्रकरण व त्याला लाभलेली आंतरराष्ट्रीय राजकारणाची पार्श्वभूमी, हे टिपीकल ग्रीन यांचे रसायन फिलीप नॉईस यांनी त्याच ताकदीने पडद्यावर रंगविले आहे.

**नववर्षाच्या पूर्वसंध्येला**
**गझलनवाज भीमराव पांचाळे यांची मैफल**
**शनिवार, दि. ३१/१२/२०१६**

''अंदाज आरशाचा, वाटे खरा असावा । प्रत्येक माणसाचा तो चेहरा असावा'' असा माणूसकीचा गहिरा रंग आणि सुरांची बरसात घेऊन जगण्यातील माणूसपणाच्या मूल्यांचा शोध घेत काळजाला भिडणाऱ्या एकाहून एक सरस मराठी हिंदी गझलांनी रसिकांना अनोखा आनंद दिला. निमित्त होते, 'विश्वास संकल्प आनंदा'चा उपक्रमातंर्गत नववर्षाच्या पुर्वसंध्येला नव्या संकल्पांची नवी मैत्री, नवी ओळख, आनंदाची जाणीव असलेल्या नवीन वर्षाची सुरुवात ही थोड्याशा आगळ्यावेगळ्या पद्धतीने व्हावी, याकरीताच नववर्षाच्या पूर्वसंध्येला काही चांगले संकल्प घेऊन नवीन वर्ष आपण सर्वच एका वेगळ्या प्रकारे साजरे करावा या संकल्पनेतून 'विश्वास ग्रुप' तर्फे गझलसम्राट भीमराव पांचाळे यांच्या गझल गायनाच्या अनोख्या मैफीलीचे आयोजन रोटरी क्लब ऑफ नाशिक स्मार्ट सिटी यांच्या माध्यमातून विश्वास लॉन्स येथे करण्यात आले होते.

विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आकारला असून कार्यक्रमाचे संयोजक विनायक रानडे होते. सुखदु:खाच्या व्यवस्थापनाची गोष्ट सांगणे म्हणजे गझल अशा आशयाची अनुभूती शब्दसुरांतून प्रकट होत होती. अश्रूंना जर पंख जरासे लावून घेता आले तर दु:ख वाटण्याचा प्रवासही सहज झाला असता त्यासाठी 'जगणाऱ्याला जीवन कळते, पळणाऱ्याला नाही' अशा शब्दात जगण्याची महती गझलसम्राट भीमराव पांचाळे यांनी पेश केली. 'जखमा अशा सुगंधी, झाल्यात काळजाला, केलेत वार ज्यांनी तो मोगरा असावा' यातून जगण्याचा शोध घेता घेता रसिक अंतर्मुख झाले. 'जाओ शिसे का बदन लेके', 'मज नको हे गगन', 'जीवनाला दान द्यावे लागते', 'हा असा चंद्र अशी रात', 'तू नभातले तारे माळलेस का', 'ए सनम आँखो की मेरी', 'भळभळते सांगतेस का', 'उगा भांडतेस', 'कारणे नाहीत मोठी', 'गरीबाच्या लग्नात नवरी: अशा लोकप्रिय गझलांनी मंत्रमुग्ध केले. मराठी गझलेचा श्वास गझलनवाज, भीमराव पांचाळे यांनी आपल्या बहारदार सुरांतून जिवंत केला. गझलेतील शब्दांची स्पंदने आपल्या तलम आणि तरल नजाकतीतून भीमराव पांचाळे यांनी अशी काही पेश केली की, रसिक शहारूनच गेले. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ नाशिक स्मार्ट सिटी, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, श्री पद्मावती केटरर्स, झेलम मसाले, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, नाशिक, सारस्वत बँक, विश्वास लॉन्स याचबरोबर टकले ज्युएलर्स, फ्रावशी ॲकेडमी, श्री साईबाबा हार्ट इन्स्टिट्युट ॲण्ड रिसर्च सेंटर, संकलेचा कन्स्ट्रक्शन्स, एसडब्ल्यूएस फायनान्शियल सोल्युशन्स प्रा.लि. यांचे सहकार्य लाभले. मैफलीचे बहारदार सूत्रसंचलन दत्ता बाळसराफ यांनी केले. भीमराव पांचाळे यांना हार्मो नियमवर साथ जगदीश मिस्त्री, तबला गिरीष पाठक, संतूर अबार अहमद, व्हायोलीन इकबाल वारसी यांनी केली. मेजर कृष्णा खोत, विक्रांत मोहगांवकर, सुनील चित्रे, जयंत जोगळेकर, राहुल भावे, अतुल भावे, सतीश टकले, स्वाती टकले, रतन लथ, डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, विजय संकलेचा, रघुवीर अधिकारी, समीर देशपांडे, वसंत ठाकरे, शैलेश नाटकर आदींनी परिश्रम घेतले.

**'कॅम्पस मैत्र कारवाँ'**

**सोमवार, दि.०९/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने जे.एम. सी.टी. कॉलेज, वडाळा, नाशिक येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जेंडर इक्वॅलिटी या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टीमने प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांचे गट करुन विविध खेळाच्या माध्यमातून जेंडरची संकल्पना समजावून सांगितली. या खेळामध्ये फुगे आणि टाचणीचा खेळ घेण्यात आला आणि नंतर त्या खेळाबद्दल बोलतांना अनिता पगारे म्हणाल्या, फुगे आणि टाचणी हे रुपक आहे. फुगे म्हणजे समाजातल्या स्त्रिया आणि टाचणी म्हणजे समाजातल्या विविध प्रकारची सत्तास्थाने. मग सहभागी विद्यार्थ्यांनी खेळानंतर मांडलेले त्यांचे अनुभव त्या त्या रुपकाशी जोडून वाचल्यानंतर आपण मूल म्हणून किंवा सत्ताधारी म्हणून कसे सत्तेचा गैरवापर करतो यावर चर्चा झाली. सत्ता पैशांची, शारिरीक,पदाची, नावाची, प्रदेशाची, कायद्याची असू शकते. स्त्रियांचे आयुष्य असेच आपण सहज, ऐकून न घेता, स्पर्धक समजून संपवतो याची जाणीव या खेळातून करुन दिली.

**'कॅम्पस मैत्र कारवां'**

**मंगळवार, दि.१०/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने कवीवर्य टिळक वाचनालय, त्र्यंबक नाका, नाशिक येथे जेंडर इक्वॅलिटी या विषयावर संस्थेच्या अनिता पगारे व स्वयंसेवकांची टीम यांनी प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणामध्ये दिशा केणी यांनी ट्रान्सजेंडर म्हणजे काय? त्यांचे विविध प्रकार, त्यांचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, लैगिंक अत्याचार या विषयावर बोलतांना सांगितले की ट्रान्सजेंडर हा गावातील सगळ्यात शेवटाचा/खालचा समाज म्हणून समजला जातो. त्यांना गावामध्ये कोणत्याही शुभ कार्यात सहभागी होता येत नाही. गावाच्या वेशीवर त्यांचे निवास स्थान असते, अशा अनेक व्यथा ह्या समाजात जगताना त्याना भोगाव्या लागतात. ट्रान्स जेंडरचे जीवन तसेच त्यांच्याविषयी समाजात समजले जाणारे गैरसमज यांचे निवारण त्यांनी करुन दिले.

या कार्यशाळेस एम.एस.डब्ल्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबरच इतरांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

**'चित्रपट चावडी' 'डेड काल्म'**

**शुक्रवार, दि. १३/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक फिलीप नॉईस यांचा 'डेड काल्म' हा चित्रपट दाखविण्यात आला.

प्रसिद्ध कादंबरीकार चार्ल्स विलियम्स यांच्या 'डेड काल्म' या कादंबरीवर हा चित्रपट आधारीत आहे. एक विवाहीत जोडपे समुद्रमार्गे जगप्रवासाला निघते. पॅसिफीक महासागरातून त्यांना प्रवास करायचा असतो त्यातून जीवनमरणाच्या शक्यता-अशक्यतांचा संघर्ष समोर येतो. मानसशास्त्रीय घटनांचा अत्यंत लक्षवेधी आणि वेधक शोध पात्रांच्या संवादातून या चित्रपटात येतो.

**‘ग्रंथ तुमच्या दारी–बालविभाग’**
**मंगळवार, दि.२४/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने व रोटरी क्लब ऑफ अंबड नाशिक यांचे सहकार्याने इगतपुरी तालुक्यातील नांदगाव या ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या जिल्हा परिषद शाळेला ग्रंथ तुमच्या दारी–बाल विभाग योजने अंतर्गत ग्रंथपेटी उपलब्ध करुन देण्यात आली.

या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अंबड नाशिकचे श्री. डी.एस. देशमुख, श्री. सुभाष गायकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री. महेश गायकवाड ग्रंथ तुमच्या दारी–बाल विभाग योजनेचे समन्वयक श्री. विनायक रानडे हे उपस्थित होते.

**मिसळ–सरमिसळ महोत्सव**
**गुरुवार, दि. २६/०१/२०१७ ते रविवार दि. २९/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक, विश्वास को–ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयुट, नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, सारस्वत बँक, विश्वास लॉन्स यांचे संयुक्त विद्यमाने मिसळ–सरमिसळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

विविध प्रकारच्या २५ हून अधिक मिसळींचा अस्सलपणा आणि नाविन्यपूर्ण चवींचा आस्वाद घेत ‘मिसळ–सरमिसळ’ महोत्सवात ३० हजाराहून अधिक खवय्यांनी खऱ्या अर्थाने मिसळींचा आस्वाद घेतला.

महाराष्ट्राच्या खाद्यपरंपरेत मिसळ हा कसा जीवनशैलीचा भाग झाला आहे, याची प्रचिती यात प्रत्येकाने घेतली. नाशिकच्या वेगाने विकसित होण्याऱ्या ‘मेट्रो सिटीत’ ‘मिसळ–सरमिसळ’ महोत्सवाला इतक्या मोठ्या प्रमाणावर जनसामान्यांचा प्रतिसाद मिळणे हा खाद्यसंस्कृतीच्या विकासाचाच एक भाग म्हणावा लागेल.

मिसळच्या तऱ्हेतऱ्हेच्या प्रकारांतून चवीचा विलक्षण आनंद घेत खवय्ये मिसळ सरमिसळ महोत्सवाचा आनंद लुटत होते. कॉलेजचे युवक–युवती तसंच कुटुंबियांसह अनेकजण मिसळींचा आस्वाद लुटण्यासाठी आले होते. ‘निखारा दम मिसळ’मधला झणझणीतपणा, ‘गोविंदा मिसळी’सोबतची जिलेबी, ‘यशवंत टी’ चे मिसळीसोबत पेढे, गोडशेव, चाय टपरीचा चहा, उकडीचे मोदक, ‘भरोसा’ची कुल्फी यासारख्या पदार्थांनी महोत्सवात जोरदार रंगत आणली आहे. सप्तश्रृंगी मिसळ, माऊली मिसळ, गजानन मिसळ, विविध प्रकारचे चॉकलेटस् यातून सर्वांचीच चंगळ होत होती.

‘विश्वास संकल्प आनंदाचा’, ‘विश्वास ग्रुप’, ‘विश्वास हॅपीनेस सेंटर’ तर्फे हा उत्सव आयोजित करण्यात आला होता. महोत्सवाची संकल्पना विश्वास जयदेव ठाकूर यांची होती. राहूल भावे यांचे श्री.पद्मावती केटरर्स, झेलम मसाले हे हॉस्पिटॅलिटी पार्टनर्स असून ब्रेव्हरेज पार्टनर ॲरोमा वॉटर होते. ‘मिसळ–सरमिसळ’ महोत्सव यशस्वी करण्यासाठी आयोजक विश्वास ठाकूर, विनायक रानडे, मनेष बुरड, स्वप्निल राका, समीर देशपांडे, विवेकराज ठाकूर, मंदार ठाकूर यांनी प्रयत्न केले.

**‘चित्रपट चावडी’ ‘क्नाईफ ऑन द वॉटर’**
**शुक्रवार, दि. २७/०१/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को–ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘चित्रपट चावडी’ उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक रोन पोलॅनस्की यांचा ‘क्नाईफ ऑन द वॉटर’ हा चित्रपट दाखविण्यात आला.

सुट्टीनिमित्त एक विवाहित जोडपे समुद्रकिनाऱ्यावर फिरण्यासाठी जात असताना रस्त्यात एक अनोळखी तरुण गाडीत बसण्यासाठी त्यांना विनंती करतो आणि त्या तरुणाला घेऊन ते जोडपे समुद्रकिनाऱ्यावर जातात आणि त्यातून सुरु होतो अनोळखी नात्यातला संघर्ष. आणि त्यातून नातेसंबंधाचे अनेक पदर उलगडत जातात. अशा एका विलक्षण नाट्याची जाणीव या चित्रपटात दाखविण्यात आली आहे.

### 'चित्रपट चावडी' 'व्हॅन गॉग-अ ब्रश विथ जिनिअस'

**शुक्रवार, दि.१०/०२/२०१७**

विभागीय केंद्र नाशिक व विश्वास को-ऑप.बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, सारस्वत बँक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट चावडी' उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध दिग्दर्शक फ्रॅन्काईस बरट्रेंड यांचा 'व्हॅन गॉग-अ ब्रश विथ जिनिअस' हा चित्रपट दाखविण्यात आला.

चित्रकार व्हॅन गॉग हा आजच्या आधुनिक चित्रकलेच्या संकल्पनांची पायाभरणी करणाऱ्यांपैकी महत्त्वाचा चित्रकार आहे. 'दृश्याचा माझा अनुभव मी कसा चित्रित करतो हे महत्त्वाचं आहे' या विचारातून व्हॅन गॉगने असंख्य चित्रे काढली. चित्रकलेची अत्यंत विलक्षण शैली आणि मोकळेपणा हे त्याच्या चित्रांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या चित्रकारकीर्दीचा व त्याच्या जीवनाचा वेध या फिल्ममधून घेण्यात आला आहे.

### नाशिक 'रन फॉर पीस' मॅरेथॉन २०१७

**रविवार, दि. १२/०२/२०१७**

पोलीस आयुक्तालय, नाशिक तर्फे आयोजित नाशिक २१ रन फॉर पीस-२०१७ या मॅरेथॉन स्पर्धेत विश्वास को- ऑप बँक लि., नाशिकच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला. रविवार दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी गोल्फ क्लब येथून मॅरेथॉनला सुरूवात झाली, तिथून मायको सर्कल-एबीबी सर्कल-हुंदाई शो रूम-गोल्फ क्लब येथे समारोप झाला.

विश्वास को-ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी 'रन फॉर पीस'चा संदेश दिला. श्री. विश्वास ठाकूर यांनी स्वत: मॅरेथॉन मध्ये सहभाग घेतला. स्पर्धेसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, सारस्वत बँक यांनी ही यात सहभाग नोंदविला. बँकींगबरोबर सातत्याने सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात विश्वास को-ऑप बँक सहभाग घेत असते व योगदान देत असते याच जाणिवेतून 'रन फॉर पीस -२०१७' मधून शांतता व आरोग्यपर जनजागृतीचा संदेश बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने दिला.

बँकेमार्फत विविध प्रकारचे आरोग्यविषयक, अंधश्रद्धा निर्मुलन, मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी, रोज चालण्याचे फायदे, रस्ता वाहतूकविषयक, हृदयरोग टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी, पाण्याची बचत, ध्वनी प्रदूषणपर पोस्टर व शुभेच्छापत्रक प्रकाशित करून बँक लोकसहभाग देत असते. अशा लोक प्रबोधनत्मक जाणिवेतून बँकेची समजाभिमुखता अधोरेखित होते.

# देवराष्ट्रे

## कार्यवृत्त

दि. १-११-२०१६ ते २८-२-२०१७ या कालावधीत जन्मघर स्मारकास ७८२ पर्यटकांना तर एका शाळेच्या ५२ विद्यार्थ्यांनी भेट दिली.

दि. २५ नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण साहेबांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मा. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस सांगली-सातारा विधानपरिषदेचे विद्यमान आमदार श्री. मोहनराव कदम (दादा) याच्या हस्ते फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सर्जे राव यादव प्रतिष्ठान, इस्मालपूरचे अध्यक्ष श्री. सर्जेराव यादव तसेच कडेगाव तालुक्याच्या तहसिलदार अर्चना शेटे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या वेळी बोलताना श्री. कदम म्हणाले, राजकारण, समाजकारण, इत्यादी बाजूला ठेऊन गावातील सर्व लोकांनी या ठिकाणी उपस्थितीत राहिले पाहिजे. चव्हाण साहेबांचे राहणीमान हे सर्वसाधारण माणसांप्रमाणे होते. ते काही एका पक्षाचे नव्हते. त्यामुळे जन्मघरात सर्वांनी उपस्थित राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

सकाळी ८ ते १०.३० पर्यंत कुंडल येथील भजनी मंडळीच्या भजनाचा कार्यक्रम पार पाडला. सुंदर गायन, तलबा वादन, पेटी आणि टाळ आणि मृदुग यांच्या आवाजात कार्यक्रम पार पाडला.

स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांना संगणकाचा वापर करता यावा या उद्देशाने १ डिसेंबर रोजी यशवंतराव प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने देवराष्ट्रे येथे दोन संगणक देण्यात आले.

दि. १०-१-२०१७ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, केंद्र देवराष्ट्रे व यशवंतराव चव्हाण ग्रामविकास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यामाने देवराष्ट्रे येथील यशवंतराव चव्हाण हायस्कूलमध्ये दहावी व बारावी विद्यार्थ्यांसाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता. दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे, ही संधी एकदाच येते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे. त्यासाठी त्याचे मनोबल वाढविण्यासाठी ''परीक्षेला सामोरे कसे जावे'' या विषयावरती तासगाव तालुक्याचे शिक्षणधिकारी श्री. प्रदीपकुमार कुडाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्री. कुडाळकर म्हणाले, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना हे वर्ष महत्वाचे आहे. शिक्षण हा अव्याहतपणे चालू असणारा प्रवास आहे हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावे. मुख्य परीक्षा अगदी जवळ आल्या आहेत. उरलेल्या दिवसाचे वेळापत्रक तयार करून जास्तीत जास्त वेळेचा उपयोग करावा. 'चिंतेपेक्षा चिंतन करा - आणि काळजीपेक्षा काळजी घ्या.' आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे, यश तुम्हाला नक्की मिळेल, असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

## यशवंतराव चव्हाण
## राज्य पारितोषिक पुरस्कारप्राप्त मान्यवर

| सन | पारितोषिक विजेत्याचे नाव | पारितोषिकाचे नाव |
|---|---|---|
| १९९० | मा. तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९६ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १९९६ | मा. अरुण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| २००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| २००२ | 'प्रयोग' परिवार | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २००३ | डॉ. यु. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| २००४ | डॉ. चित्रा नाईक | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २००६ | श्री. भंवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २००७ | श्री. अनिल काकोडकर | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २००८ | प्राचार्या लीला पाटील | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २००९ | श्रीमती किशोरी आमोणकर | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१० | श्री. सा. रे. पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन पारितोषिक |
| २०११ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | सामाजिक एकात्मता विज्ञान-तंत्रज्ञान पारितोषिक |
| २०१२ | मातृमंदिर, देवरुख, रत्नागिरी | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| २०१३ | मा. श्री. गोविंदराव तळवलकर | मराठी साहित्य संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१४ | मा. श्री. शरद जोशी | कृषी-औद्योगिक समाजरचना/व्यवस्था प्रशासन |
| २०१५ | श्रीमती अरुनिमा सिन्हा | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| २०१६ | श्री प्रतापशेठ साळुंखे | ग्रामीण विकास/आर्थिक सामाजिक विकास |

## यशवंतराव चव्हाण
## राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त मान्यवर

| अ. नं. | पुरस्कार प्राप्त मान्यवराचे नाव | वर्ष |
|---|---|---|
| १ | प्राध्यापक मधु दंडवते | १९९५ |
| २ | श्री बियांत सिंग-मरणोत्तर | १९९६ |
| ३ | डॉ. सी. सुब्रमण्यम् | १९९७ |
| ४ | श्रीमती इला भट | १९९८ |
| ५ | श्रीमती आवाबाई वाडिया | १९९९ |
| ६ | श्री. सुंदरलाल बहुगुणा | २००० |
| ७ | डॉ. व्ही. कुरियन | २००१ |
| ८ | डॉ. जयंत नारळीकर | २००२ |
| ९ | श्री. आर. के. लक्ष्मण | २००३ |
| १० | न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर | २००४ |
| ११ | मा. सॅम पित्रोदा | २००५ |
| १२ | मा. श्री. नारायण मूर्ती व सौ. सुधा मूर्ती | २००६ |
| १३ | मा. श्री. आर. के पचौरी व श्रीमती सरोज पचौरी | २००७ |
| १४ | ईस्त्रो - (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) | २००८ |
| १५ | प्रो. यश पाल | २००९ |
| १६ | श्रीमती महाश्वेता देवी | २०१० |
| १७ | एअर चिफ मार्शल श्री. अर्जुनसिंग | २०११ |
| १८ | डॉ. ई. श्रीधरन | २०१२ |
| १९ | श्री. झुबिन मेहता | २०१३ |
| २० | श्री. रतन टाटा | २०१४ |
| २१ | डॉ. विजय केळकर | २०१५ |
| २२ | श्री. नंदन निलेकणी | २०१६ |

## सुवर्णगाथा ५० कायदेमंडळातील ५० वर्षे

### राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा आणि राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार यांच्या कायदेमंडळातील कारकिर्दीला दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी ५० वर्ष पूर्ण होत आहेत. सलग पन्नास वर्ष राज्याच्या व देशाच्या कायदेमंडळात कार्य केलेले मा.खा. शरदचंद्रजी पवार हे एकमेव नेते ठरले आहेत. गेल्या ५० वर्षात एकही दिवस असा नाही, की ते विधिमंडळ वा संसदेचे सदस्य नव्हते. या पाच दशकामध्ये आदरणीय पवारसाहेबांच्या हस्ते अनेकविध निर्णय झाले, अनेक प्रकल्प उभे राहिले. सर्वमान्य माणसाचा विकास केंद्रस्थानी मानून आदरणीय पवारसाहेबांनी सलग ५० वर्षे सातत्याने कार्य सुरु ठेवले आहे. आदरणीय पवारसाहेबांचे हे कार्य व विचार महाराष्ट्रातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्याकरीता पवारसाहेबांच्या कायदेमंडळातील पन्नाशीच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्यावतीने राज्यस्तरीय शालेय निवंध स्पर्धा व राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या निमित्ताने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आदरणीय पवारसाहेबांचे कार्य, त्यांनी वेळोवेळी घेतलेले निर्णय, त्यांनी केलेले लेखन, साहित्य व विचार अभ्यासून त्यांची मते आपल्या निबंधातून व वक्तृत्वातून मांडू शकतील, हा या मागचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा प्रयत्न होता. पुरोगामी व आधुनिक महाराष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्या आदरणीय पवारसाहेबांचे परिवर्तनवादी विचार सातत्याने त्यांच्या लेखनामधून, भाषणांमधून आणि त्यांनी केलेल्या विविध कार्यांमधून आपणास दिसून येतात. महाराष्ट्राच्या भावी पिढीला हे विचार समजावेत, त्यांच्यात ते विचार रुजावेत व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करावे, हा या स्पर्धा आयोजित करण्याचा मुख्य उद्देश होता.

राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेकरता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शाळांमधील आठवी ते दहावी इयत्तेत शिकत असलेले विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांकडून निबंध मागवण्यात आले होते. ८ डिसेंबर २०१६ हा दिवस निबंध पाठविण्याकरीता अंतिम दिवस ठरवण्यात आला होता. या निबंध स्पर्धे त सहभागी स्पर्धकाला मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू यापैकी कोणत्याही एका भाषेत निबंध लिहून पाठवण्याची मुभा देण्यात आली होती. सर्व माध्यमातील व भाषेतील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होता यावे, हा या मागचा महत्वाचा उद्देश होता.

राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत महाराष्ट्रातील ४२ जिल्ह्यात स्पर्धा संपन्न झाली. ही निबंध स्पर्धा कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन गटात घेण्यात आली. कनिष्ठ गटात ११ व १२ वीतील महाविद्यालयीन विद्यार्थी तर वरिष्ठ गट पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये राज्यातील एकूण ६,७८५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

वरील दोन्ही स्पर्धेत जिल्हास्तरावरील विजेत्यांनाही पारितोषिके वाटप करण्यात आली. या पारितोषिकांच्या स्वरूपाचा आणि विजेत्यांचा तपशिल आम्ही आपल्या माहितीसाठी सोबत जोडला आहे. यात दोन्ही जिल्हानिहाय स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या आकडेवारीचा तपशिलही नमूद आहे.

वरील दोन्ही स्पर्धांची अंतिम फेरी गदिमा सभागृह, विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती येथे दि. १३ जानेवारी रोजी पार पडली. याकरीता महाराष्ट्रातील जिल्हास्तरावरील अंतिम स्पर्धेकरीता निश्चित झालेले विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धेत जिल्हास्तरावर चारही भाषेतील प्रथम व द्वितीय आलेल्या राज्यभरातील एकूण १,०८,२३३ विद्यार्थ्यांनी अंतिम फेरीत सहभाग नोंदवला. तर राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये वरिष्ठ व कनिष्ठ गटातून प्रथम, द्वितीय आलेल्या राज्यभरातील एकूण १२१ स्पर्धकांनी अंतिम फेरीत सहभाग नोंदवला. सर्व विद्यार्थी आणि त्यांच्याबरोबर आलेल्या पालक व शिक्षक यांची निवास आणि भोजनाची उत्तम व्यवस्था विद्या प्रतिष्ठान, बारामती यांच्याकडून झाली होती.

अंतिम स्पर्धा पुरस्कार वितरण सोहळा विद्या प्रतिष्ठान, बारामती यांच्या गदिमा सभागृहात दि. १४ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला होता. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार, प्रमुख अतिथी आ. सुनीलजी तटकरे, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे, कोषाध्यक्ष हेमंत टकले या मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके आणि स्मृतीचिन्हे तसेच प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आली.

‘सुवर्णगाथा ५०’ या उपक्रमासाठी श्री. महेश तपासे यांनी प्रमुख समन्वयक ही जबाबदारी पार पाडली. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेकरीता श्री. निरंजन डावखरे यांनी आणि राज्यस्तरीय निबंध स्पर्धेकरीता श्री. संग्राम कोते-पाटील यांनी प्रमुख समन्वयक म्हणून काम पहिले.



## 'सुवर्णगाथा ७०' आयोजित राज्यस्तरीय महाअंतिम फेरी पारितोषिक विजेते
## राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

### १. महविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालय गट

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | विराज मार्के | रु. २५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | किरण देशमुख | रु. १५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | साक्षी गांधी | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | आकाश पाटील | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | नागेश गवळी | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

### २. महविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा कनिष्ठ महाविद्यालय गट

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | विराज मार्के | रु. २५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | किरण देशमुख | रु. १५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | साक्षी गांधी | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | आकाश पाटील | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | नागेश गवळी | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

## राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा

### १. शालेय निबंध स्पर्धा मराठी भाषा

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | अजिक्य धात्रक | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | प्रणोती मोहिते | रु. ७,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | सई वळसे | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | ऋतुजा साबळे | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | सानिका तुम्मेवार | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

## २. शालेय निबंध स्पर्धा  हिंदी भाषा

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | सृष्टी भामरे | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | निकिता वडे | रु. ७,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | समीक्षा मानवटकर | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | ऋतुजा तांबारे | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | निकिता सूर्यवंशी | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

## ३. शालेय निबंध स्पर्धा  इंग्रजी भाषा

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | प्रतिक मोहिते | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | पूजा बोडके | रु. ७,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | मनाली कलादगी | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | श्राव्या शेट्टी | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रियांश वाणीगोता | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

## ४. शालेय निबंध स्पर्धा  उर्दू भाषा

| पारितोषिक क्रमांक | पारितोषिक विजेते | पारितोषिक स्वरूप |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | मुस्तखीम अरीब म. सलीम | रु. १०,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| द्वितीय पारितोषिक | शेख सना अब्दुल आलम | रु. ७,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| तृतीय पारितोषिक | सनाइफत कलिम खान | रु. ५,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | सय्यद शाहेना अन्सार | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | जैनाब सबा आ. काझी | रु. ३,०००/- प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह |

## 'यशवंतराव चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी' दि. २५ नोव्हेंबर २०१६

मा. यशवंतराव चव्हाण यांची ३२ वी पुण्यतिथी शुक्रवार दि. २५ नोव्हेंबर २०१६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई ४०००२१ येथे साजरी करण्यात आली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांनी या समारंभाचे अध्यक्षपद भूषविले. या कार्यक्रमामध्ये 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६' ज्येष्ठ उद्योगपती श्री. प्रतापशेठ दादा साळुंखे, सांगली यांना प्रदान करण्यात आले. तसेच न्यायमूर्ती 'वाय. व्ही. चंद्रचूड पुरस्कार' मुंबई विद्यापीठातून एल. एल. एम. च्या परिक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या श्रीमती नेहा भंडारी यांना श्री. अनिल काकोडकर यांच्या हस्ते वितरीत करण्यात आला. त्याचप्रमाणे या कार्यक्रमात मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'सह्याद्रीचे वारे' या पुस्तकाच्या ऑडिओ सीडीचे प्रकाशनही करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस श्री. शरद काळे व विश्वस्त मंडळ सदस्य, कार्यकारिणी मंडळ सदस्य त्याचप्रमाणे प्रतिष्ठानचे इतर सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

## '७ व्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' दि. २० जानेवारी २०१७ ते २६ जानेवारी २०१७

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पुणे फिल्म फाऊंडेशन, पुणे वे मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दिनांक २० जानेवारी २०१७ ते २६ जानेवारी २०१७ या दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे सातवा 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित करण्यात आलेला होता.  महोत्सवात एकूण ७० ते ७५ विविध भाषेतील व विविध देशातील निवडक चित्रपट दाखविण्यात आले. या महोत्सवाचे उद्‍घाटन शुक्रवार दि. २० जानेवारी २०१७ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ दिग्दर्शक व कलाकार श्री. पंकज कपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या महोत्सवात जगभरातील सर्व भाषांमधील चित्रपटांचा समावेश असून बेल्जिअम, रशिया, चीन, फ्रान्स, अर्जेन्टीना, इझ्राईल, ईराण, तुर्की, चिली आदी देशातील चित्रपट दाखविण्यात आले. महोत्सवात १३ शॉर्ट फिल्म व १६ ॲनिमेशन फिल्म दाखविण्यात आल्या. महोत्सवाची सुरुवात पार्शियन देशातील 'डॉक्टर' या चित्रपटाने झाली. महोत्सवाची सांगता 'थँक्यु फॉर बॉम्बिम' या चित्रपटाने झाली.

महोत्सवात दि. २१ जानेवारी २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संगीत दिग्दर्शक 'जॉर्ज आरिंगडा' यांचा 'म्युझीक इन फिल्मस्' यावर 'मास्टर क्लास' आयोजित करण्यात आला होता. तसेच दि. २२ जानेवारी २०१७ रोजी दिग्दर्शक व कलाकार श्री. आशुतोष गोवारीकर यांचे 'स्मिता पाटील स्मृती व्याख्यान'  अयोजित करण्यात आले होते. या दोन्ही कार्यक्रमांस तरुण युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. या महोत्सवापूर्वी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मुंबई विद्यापीठ यांच्या मार्फत दि. ०९ डिसेंबर २०१६ रोजी कलिना कँपस, मुंबई येथे विद्यार्थ्यांसाठी 'चित्रपट समीक्षण स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी पारितोषिकेही देण्यात आली.

वरील सातही दिवस चित्रपट महोत्सवात तरुण वर्गाचा व ज्येष्ठांचा अतिशय चांगला प्रतिसाद लाभला. यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची वर्तमानपत्रात अतिशय चांगल्याप्रकारे प्रसिध्दी झाली. चित्रपट महोत्सव मुख्य सभागृह व सांस्कृतिक सभागृहात या आयोजित करण्यात आला होता.

**चित्रपट समीक्षण :** वैष्णवी सही, शुभम दिक्षीत, अलका नादगिरे




''सलग ५० वर्षं देशाच्या कायदेमंडळाचं सदस्य असणं ही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी जनतेचा नि:संशय पाठिंबा तर लागतोच; शिवाय देशाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये लक्षणीय योगदानही असावे लागतं. श्री. शरद पवार यांची ही ५० वर्षांची कारकीर्द नुसती डोळ्यांखालून घातली तरी त्यांनी किती विविध क्षेत्रांमध्ये, विविध स्तरांवर महत्त्वाची भूमिका बजावली हे लक्षात येतं, त्यासाठीच्या कष्टाची कल्पना येते.''

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे – भाग १ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| २. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस – विधिमंडळ – भाग २ – संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट – वाय. बी. चव्हाण – खंड १ ते ४ संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन – ना. धों. महानोर | १.०० |
| ५. | सह्याद्री वारे – यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन – प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास – संपादक – वि. स. पागे | ३५.०० |
| ८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन – संपादन : अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन – शरदराव पवार – भाषणसंग्रह – संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा – संपादन : पी. बी. पाटील | |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास संशोधक / लेखक – लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल – डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण – चरित्र – लेखक – अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य – संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाउंटीफुल बनियान – डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र – खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा – (काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई'बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम : वेचक-वेधक – डॉ. वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले – श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना – सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी' – सुप्रिया सुळे | २०.०० |

२८. 'शाळांचे प्रगतिपुस्तक' डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर २००.००

२९. Yashwantrao Chavhan : an Autobiography ३९५.००

३०. यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र – कृष्णाकाठ ३००.००

३१. यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व ५००.००

३२. शिक्षणवृत्ती – डॉ. कुमुद बन्सल २००.००

३३. शिक्षणकट्टा – बसंती रॉय २००.००

३४. वाटचाल ई–शिक्षणाची – बसंती रॉय २००.००

३५. हवामान बदलास आमचे उत्तर १००.००

३६. विचारसूत्रे – संपादन : पद्मभूषण देशपांडे २००.००

३७. पाणीबाणी – प्रभाकर साळेगावकर १६०.००

३८. पर्व–प्रगतीचे परिवर्तनाचे – पद्मभूषण देशपांडे (मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी, ऊर्दू भाषेतही उपलब्ध) खाजगी वितरणासाठी

- डीव्हीडी व ऑडीओ कॅसेट्स
- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांची
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक – श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शक : विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहितीपट, दिग्दर्शक – जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणिवांचा....' लघुपट, दिग्दर्शक – चंद्रकांत कुलकर्णी
- 'कृष्णाकांठ' : ऑडीओ सी. डी. (ध्वनिमुद्रिका)

**चित्रपट**

- यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची : दिग्दर्शक – जब्बार पटेल

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित संकेतस्थळे**

- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे संकेतस्थळ – http://ybchavanpratishthan.org/
- यशवंतराव चव्हाण यांचे समग्र संदर्भ साहित्य – http://ybchavan.in
- धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य – http://dharmanandkosambi.com/
- केतकरकृत महाराष्ट्रीय ज्ञानकोश – http://ketkardnyankosh.com/
- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे समग्र साहित्य – http://virashinde.com/
- इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाकडे उपलब्ध दुर्मिळ कागदपत्रांचे डिजिटायझेशन – http://vkrajwade.com

# YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN

MKCL
Creating a Knowledge Lit World

नवीन

# MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

या सुट्टीत घडवा तुमचे करियर,
होऊया कंप्यूटरचे स्मार्ट यूझर!




Windows 7

Office 2013

९५ लाखांहून अधिक लोकांना
कंप्यूटरचे 'स्मार्ट यूझर्स' बनविणारा कोर्स

**Other Courses**

- MS-Office
- Web Designing
- Advance Excel
- DTP
- Tally Expert

5th Floor, Y.B.Chavan Centre, Gen J.Bhosale Marg, Opp Mantralaya,
Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel No : 022 - 22817975 / 22043617/19 / 9769256343

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## नवमहाराष्ट्र युवा अभियान

# यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा-२०१७

: स्थळ :
**बारामती जि. पुणे**
शनिवार,
दि. १४ जानेवारी २०१७

: शुभहस्ते :
**मा. खा. शरदचंद्रजी पवार**
अध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई



विशेष युवा क्रीडा पुरस्कार — ललिता शिवाजी बाबर



युवा क्रीडा पुरस्कार — दत्तु बबन भोकनळ



युवा क्रीडा पुरस्कार — अभिलाषा शशिकांत म्हात्रे



युवा सामाजिक पुरस्कार — संतोष नारायण गर्जे



युवा सामाजिक पुरस्कार — हेमलता महेंद्र तिवारी



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

# सुवर्णगाथा ५०

कायदेमंडळातील पाच दशके

राज्यस्तरीय महाअंतिम फेरी

बारामती, जि. पुणे

दि. १३ ते १५ जानेवारी २०१७

## मा. खा. शरदचंद्रजी पवार

यांच्या विधीमंडळ व संसदीय कारकिर्दीची अविरत पन्नास वर्षे (१९६७-२०१७)



अभिव्यक्ती नव्या पिढीची!

## राज्यस्तरीय शालेय निबंध स्पर्धा

## राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्त्व स्पर्धा



राज्यभरातून **निबंध स्पर्धेत**
**१ लाख ८ हजार २३३** विद्यार्थ्यांचा
तर **वक्तृत्व स्पर्धेत**
**६ हजार ७८५** विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद














